डांग सेवा मंडळ नाशिक संचलित

# डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे

## ता. कळवण, जि. नाशिक

(Affilliated to Pune University Id. No. Pu/Ns/A/50/1997)



# विजयश्री

२०२४-२५



# ॥ संत साहित्य विशेषांक ॥

डांग सेवा मंडळ, नाशिक

## विद्यमान कार्यकारिणी मंडळ



श्रीम. हेमलताताई विजय बिडकर
अध्यक्षा



श्री. दामु पांडु ठाकरे
उपाध्यक्ष



ॲड. सौ. मृणाल शाम जोशी
सचिव



श्री. प्रभाकर सुपडू पवार
सदस्य



श्री. अरविंद प्रल्हाद देशपांडे
सदस्य



श्री. श्रीकृष्ण रमाकांत चंद्रात्रे
सदस्य



श्री. अनिल लक्ष्मीकांत पंडीत
सेवक प्रतिनिधी

डांग सेवा मंडळ नाशिक संचलित

**डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे, ता. कळवण, जि. नाशिक**

# प्रेरणास्थान



**कर्मवीर स्व. दादासाहेब बिडकर**

स्वातंत्र्य सेनानी व आदिवासी सेवक (१९१०-२००५)



**स्व. डॉ. विजयजी बिडकर**

सचिव, डांग सेवा मंडळ, नाशिक

डांग सेवा मंडळ नाशिक संचलित

# डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे, ता. कळवण, जि. नाशिक

## मा. श्रीमती हेमलताताई बिडकर

अध्यक्षा, डांग सेवा मंडळ, नाशिक

आदिवासी सेवक

प्रेरणास्थान
व
मार्गदर्शक



डांग सेवा मंडळ, नाशिक संचलित

# डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे

ता. कळवण, जि. नाशिक - ४२३५०२ (महाराष्ट्र)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सलग्नित : सलग्निकरण क्र. **I.D. No.:- PU/NS/A/50/1997**
**E-mail : artscollegeabhone@hotmail.com**
**Website : www.vbacscollege.ac.in**

स्थापना: १५ जुन, २०१२

# विजयश्री

## २०२४-२५

## वार्षिक नियतकालिक

## संत साहित्य विशेषांक

प्रकाशक
प्र.प्राचार्य डॉ. एस.के. मगरे

प्रमुख संपादक
प्रा. डॉ. रवींद्र पगार

डांग सेवा मंडळाचे

# डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे

ता. कळवण, जि. नाशिक

वृत्तपत्राच्या नियम ८ (केंद्रीय १९५६) तक्ता ४ प्रमाणे 'विजयश्री' या नियतकालिकाच्या मालकीसंबंधी व इतर तपशिलासंबंधी माहितीचे निवेदन

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे |
| प्रसिध्दीचा काळ | : | वार्षिक |
| मुद्रकाचे नांव | : | सुपर प्रिंटर्स, नाशिक |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| प्रकाशकाचे नांव | : | प्र. प्राचार्य डॉ. सुरेश कचरू मगरे |
| संपादक | : | प्रा. डॉ. रविंद्र मुरलीधर पगार |
| पत्ता | : | डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणा, ता. कळवण, जि. नाशिक |
| मालकी | : | डांग सेवा मंडळाचे, डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणा, ता. कळवण, जि. नाशिक |
| अक्षर जुळणी | : | सुपर प्रिंटर्स, नाशिक |

**डॉ. सुरेश कचरू मगरे जाहीर करतो की, वर दिलेली माहिती बरोबर आहे.**

डॉ. सुरेश कचरू मगरे
प्र. प्राचार्य

# Vision and Mission

## Vision

* To spread and promote education for tribal's.
* To uplift them and bring them in the main stream of society.
* To provide an open access for learning irrespective of caste and creed, region and religion of the community resides in tribal belt.

## Mission

* To reach out to the tribal's and marginalized to provide value-based holistic education and make them responsible citizens.

## Goals and Objectives:

* To impart value based education to all to face the competitive world.
* To build the foundation for lifelong learning.
* To enhance critical and analytical ability to think and act and to develop competence for enhancing employability.
* To organize extension activities for community development focusing on civic responsibilities, social awareness, holistic personality development.

# डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे, ता. कळवण, जि. नाशिक

## महाविद्यालय विकास समिती २०२२-२०२७

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीमती हेमलता विजय बिडकर | अध्यक्षा |
| २) | सौ. मृणाल शाम जोशी | सचिव |
| ३) | डॉ. सुरेश कचरू मगरे | विभाग प्रमुख |
| ४) | प्रा. डॉ. रविंद्र मुरलीधर पगार | शिक्षक प्रतिनिधी |
| ५) | प्रा. डॉ. दिनकर जानकीराम नेरपगार | शिक्षक प्रतिनिधी |
| ६) | प्रा. दिनेश दौलत हळदे | शिक्षक प्रतिनिधी |
| ७) | प्रा. डॉ. श्रीहरी रामचंद्र थोरवत | समन्वयक (IQAC) |
| ८) | डॉ. श्रीमती मिना निवृत्ती पवार | शिक्षक प्रतिनिधी (महिला) |
| ९) | श्री. राजु पंढरीनाथ पगारे | शिक्षकेतर प्रतिनिधी |
| १०) | श्री. दामू पांडू ठाकरे | स्थानिक सदस्य |
| ११) | श्री. चंद्रशेखर विष्णु जोशी | स्थानिक सदस्य |
| १२) | मुख्याध्यापक, जनता विद्यालय अभोणे | स्थानिक सदस्य |
| १३) | श्री. राजेंद्र जगन्नाथ देवरे | स्थानिक सदस्य |
| १४) | डॉ. सुरेश कचरू मगरे | प्र. प्राचार्य (पदसिद्ध सचिव) |

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात
सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक
कर्तृत्ववान व्यक्ती आपल्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा
उमटवून गेल्या. त्यांच्या दु:खद निधनाने त्या त्या क्षेत्रात
कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली.
संस्थेतील काही कर्मचाऱ्यांचेही निधन झाले.
अशा सर्व दिवंगतांना महाविद्यालयातर्फे आम्ही
भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो,
त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत !

विजयश्री नियतकालिक
२०२४-२५

# * प्राचार्य मनोगत *



डांग सेवा मंडळ संचालित डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे विजयश्री हे वार्षिक नियतकालीन वाचकांसाठी प्रकाशित करताना मला विशेष आनंद होत आहे. महाविद्यालयाची स्थापना होऊन जवळपास २८ वर्षे पूर्ण झालेली आहेत तसेच आजचे युग हे जागतिकीकरणाचे आहे. जग बदलत आहे आपणास बदलावे लागणार आहेत. त्यानुसार महाविद्यालयामध्येही अनेक बदल करण्यात आलेले आहेत. महाविद्यालयाने विद्यार्थी केंद्रभूत मानून अनेक अत्याधुनिक सोयी–सुविधांसह नाविन्यपूर्ण जिमखाना, अद्ययावत संगणक लॅब, स्मार्ट बोर्ड प्रोजेक्टर, वायफाय, इंटरनेट उपलब्ध करून दिलेले आहेत तसेच प्राध्यापक वर्गही पारंपारिक अध्यपनाबरोबर डिजिटल अध्यापन करून विद्यार्थी हित जोपासत आहेत.

महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना, कमवा आणि शिकवा योजना उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी तक्रार निवार समिती, रॅगिंग विरुद्ध पथक आणि समिती, महिला तक्रार निवारण समिती इत्यादी माध्यमातून प्रयत्न केले जातात तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, मानसिक विकासाशी संबंधित विविध उपक्रम राबविले जातात.

महाविद्यालयाने नेहमीच सामाजिक उत्तरदायित्वाची जबाबदारी पार पडलेली आहे. महाविद्यालयाने विविध विषयांशी निगडित व्याख्याने, कार्यशाळा, चर्चासत्रे, वृक्षसंवर्धन, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, प्रदर्शने, स्पर्धा, कौशल्य विकास अशा उपक्रमांचे आयोजन करून आपले योगदान दिलेले आहेत. महाविद्यालयाचे 'विजयश्री' हे वार्षिक नियतकालिक विद्यार्थ्यांच्या साहित्यिक अभिरुची बरोबर महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कार्य आपल्यापर्यंत पोहोचवित आहे. ते आपणाला आवडतील अशी अपेक्षा करतो.

महाविद्यालयाच्या विकासात नेहमीच डांग सेवा मंडळाच्या अध्यक्षा मा. हेमलतातार्इ बिडकर, उपाध्यक्ष मा. दामु पांडू ठाकरे, सचिव मा. मृणालताई जोशी आणि सर्व संचालक तसेच महाविद्यालय विकास समितीचे सदस्य श्री. चंद्रशेखर जोशी, सर्व विश्वस्त सदस्य व संचालक मंडळ यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले त्याबद्दल त्यांचे विशेष आभार. महाविद्यालयात सर्व उपक्रमांसाठी सर्व प्राध्यापक, सहकारी, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक तसेच सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवरांचे सहकार्य लाभत आहे त्या सर्वांचे मनःपूर्वक धन्यवाद !

**प्रोफेसर डॉ. सुरेश मगरे**
(प्र. प्राचार्य)



## संपादकीय,

प्रिय विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो,

'विजयश्री' नियतकालीकाचा हा अंक आपल्या वाचनासाठी देतांना मला मनस्वी आनंद होत आहे.

महाविद्यालयीन नियतकालिकात विशिष्ट शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचे प्रतिबिंब उमटलेले असते. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांचे, प्राध्यापकांच्या कर्तृत्वाचे मनोज्ञ दर्शन त्यातून घडत असते. महाविद्यालयातील सर्वच घटकांची दिवसेंदिवस होणारी प्रगती त्यातून दिसत असते. म्हणून महाविद्यालयीन नियतकालिक महत्वपूर्ण ठरत असते.

साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या भावना, विचार, कल्पना यांचा अविष्कार करण्याची संधी मिळते. यासाठीच 'विजयश्री' नियतकालिक प्रसिद्ध केले जाते. हा अंक आम्ही 'संतकवी विशेषांक' म्हणून प्रकाशित करत आहोत. मराठी वाङ्मयाचा प्रारंभ ऐतिहासिकदृष्टा मध्ययुगीन कालखंड समजला जातो, म्हणजे १३ व्या शतकापासून १६ व्या शतकाच्या अंतापर्यंतचे वाङ्मय या कालखंडात समाविष्ट केले जाते. या कालखंडातील ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम इत्यादी वारकरी संप्रदयातील संतकवी रामदासांची स्वतंत्र लेखन शैली यांनी मिळून संत वाङ्मयाचा प्रवाह ओळखला जातो. संतानी आणि त्यांनी निर्माण केलेल्या साहित्यांनी आध्यात्मिक समता प्रस्थापित करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे. भक्ती आणि तत्वज्ञान यांचा सुंदर संगम संतसाहित्यात पहावयास मिळतो. विद्यार्थी लेखकांनी या कालखंडातील संतांचा जीवन व साहित्यविषयक परिचय आपल्याला लेखातून करून दिला आहे.

डांग सेवा मंडळ संस्थेच्या विद्यमान अध्यक्षा श्रीमती हेमलताताई बिडकर, उपाध्यक्ष दामोदर ठाकरे, सचिव सौ. मृणालताई जोशी व सर्व संचालक मंडळ यांना सतत नाविन्याचा ध्यास असतो. आम्हा प्राध्यापकांना, विद्यार्थ्यांना उत्तम आणि नवीन कामासाठी ते सतत प्रोत्साहित करीत असतात आणि सुयोग्य मार्गदर्शनही करीत असतात. त्यांच्या प्रेरणेने, प्रोत्साहनाने आम्हाला काम करण्यासाठी स्फूर्ती मिळत असते.

प्रस्तुत अंकासाठी प्राचार्य डॉ. एस. के. मगरे यांचे मोलाचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मिळाले. नियतकालीक समितीतील सर्व सदस्यांचे अनमोल सहकार्य लाभले. ह्या अंकाचे मुद्रण सुपर प्रिंटर्स, नाशिक यांनी अनेक व्यवधाने सांभाळून अल्पावधित करून दिले, त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी यांचा मी ऋणी आहे.

शेवटी या अंकाला मदत करणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात व्यक्तींचे आभार मानून मी माझ्या संपादकीय मनोगतास पूर्ण विराम देतो.

**प्रा. डॉ. रवींद्र पगार**
कार्यकारी संपादक

डांग सेवा मंडळ नाशिक संचलित

# डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे

## – अनुक्रमणिका –


| अ.क्र. | लेख/कविता | लेखक/कवि | पुष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | प्र.प्राचार्यांचे मनोगत | | |
| | संपादकीय | | |
| १. | संत ज्ञानेश्वर | राहूल भोये | ९ |
| २. | संत जनाबाई | गोविंद बागुल | ११ |
| ३. | संत कान्हीपात्रा | महेंद्र ठाकरे | १४ |
| ४. | संत बहिणाबाई | चेतना गावित | १५ |
| ५. | संत कर्ममेळा | संध्या दळवी | १७ |
| ६. | संत चोखामेळा | माया पालवी | १८ |
| ७. | संत बहिरा जातवेद | धनश्री पवार | २० |
| ८. | संत गोरा कुंभार | राहूल हाडस | २२ |
| ९. | संत मुक्ताबाई | धवळी पवार | २४ |
| १०. | संत सावतामाळी | मालती बागुल | २९ |
| ११. | संत जगमित्र नागा | पुजा मोरे | ३३ |
| १२. | संत तुकाराम | भारती भोये | ३४ |
| १३. | संत नामदेव | निशा भोये | ३७ |
| १४. | संत सेना महाराज | कविता चौरे | ३९ |
| १५. | संत सोयराबाई | प्रसाद पाटील | ४२ |
| १६. | संत एकनाथ | कौशल्या ठाकरे | ४३ |
| १७. | महान समाजसुधारक संत गाडगे बाबा | ज्योत्सना वाघ | ४५ |
| १८. | समर्पित सेवावृत्ती व्यक्तिमत्व : डॉ. विजय बिडकर | प्रा. डॉ. रवींद्र पगार | ४८ |
| १९. | वार्षिक अहवाल | | ५३ |

## ※ संत ज्ञानेश्वर ※

**राहूल भोये**, S.Y.B.Sc.

संत वाङमय निर्माण झाले ते कोणत्याही शुद्ध वाङ्मयीन अशा प्रेरणेतून नव्हे. त्यामागे कोणतेही वैयक्तिक महत्व नव्हते तसेच व्यक्तिगत लाभाची अपेक्षा नव्हती. ज्ञानेश्वरांनी स्थापन केलेल्या भागवत संप्रदाय समाजाच्या सर्व स्तरावरील भक्त सहभागी झाले. आजवर त्यांना माणुस म्हणून प्रतिष्ठा मिळाली नव्हती. असे स्त्री क्षुद्रही या संप्रदायात भक्त म्हणून सामील झाले. आणि त्यांना भक्तीच्या पातळीवर समानतेचा अनुभव झाला. या संतांनी आपल्या देवतांशी भक्त म्हणून संवाद केला आपली सुख–दुःख सांगितली संत मेळ्यात जो आनंद मिळाला तो त्यांना सांगावासा वाटला. भक्तीच्या मार्गावरचा आपला प्रवास कसा होता हे सांगावेसे वाटले. त्यातुनच बहुतेक संताची अभंग रचना झाली.

या सर्व संतामधील पहिले आणि महान संत म्हणजे 'संत ज्ञानेश्वर' त्यांची गरज वाटली ती धर्माचे खरे स्वरूप स्पष्ट करण्याची धर्म, रूढी, प्रथांमध्ये नाही की कर्मठ आचारांमध्ये नाही परमेश्वर एकच आहे. सर्व माणसे समान आहे. उत्तम चरित्रे, शुद्ध मन, माणसाविषयी प्रेम या बळांमुळे व्यक्तिची उन्नती होऊ शकते. त्यासाठी पुरोहिताची यज्ञ यागाची, पशु हत्तेची जरूरी नाही. संतांनी आपले हे विचार समाजा पर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी किर्तने प्रवचने दिली आणि काही ग्रंथ ही लिहली. तसेच अभंग ही रचले. म्हणून संताच्या साहित्यामागे समानतेची, करूनेची भावना समाजापर्यंत पोहोचवण्याची उत्कट प्रेरणा होती असे दिसून येते. भक्तीचा अधिकार/सोपा मार्ग त्यांच्या साहित्याने दाखवला, संसारात राहुनच परमार्थ साधन करावे. असा उपदेश संतांनी केला. भक्तीचा अधिकार सर्वांना आहे असे त्यांनी दाखवून दिले. त्यांनी प्रचाराची माध्यमे ही लोकांना परिचित अशीच वापरली. किर्तन, प्रवचन, भारूडे, गवळणी, स्तोत्रे (स्तुती करणे) यामधून सर्वसामान्यांशी जवळीक साधली. त्यामुळे संत साहित्य लोकप्रिय झाले. परिणामकारक झाले आणि कायम स्वरूपी टिकून राहिले.

मराठीतील आद्य ग्रंथ जरी 'विवेकसिंधू' असला तरी खऱ्या अर्थाने मराठी भाषेची संपन्नता आणि सौंदर्य याचा अनुभव ज्ञानेश्वरांनी प्रथम दिला. भाषेला प्रतिष्ठा मिळवून दिली ते संत पुरूषही होते, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्ठी आणि अनेक प्रकारचे अभंग ज्ञानेश्वरांनी रचले आहेत. त्यांचा पहिला ग्रंथ आहे तो म्हणजे 'ज्ञानेश्वरी'.

'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाला 'भावार्थदीपिका' असेही म्हटले जाते. भगवत गीतेवर ज्ञानेश्वरांनी केलेले हे भाष्य किंवा टीका आहे. 'टीका' म्हणजे

जुन्या वाङ्मय परंपरेतील अर्थ, चर्चा, विवरण, स्पष्टीकरण असा आहे. इ. स. १२९० मध्ये ज्ञानेश्वरीची रचना झाली असावी. भागवद्गीतेची रचना संस्कृत भाषेमध्ये होती. सर्व सामान्य माणसांपर्यंत त्यांच्या भाषेतून पोहोचवावे अशा हेतूने ज्ञानेश्वरांनी गीतेवरील हे भाष्य रचले. ९००० हुन अधिक ओव्यांचा हा ग्रंथ अतिशय रसाळ सर्वांना समजेल अशा दृष्टान्तानी भरलेला एक काव्य ग्रंथ आहे. त्यांनी गीतेचे तत्वज्ञान मराठी भाषेत मांडतांना आपल्या स्वतंत्र प्रतिभेच्या बळावर त्याला नवे रूप दिले. ह्या ग्रथांत जीवनमुल्यांचे इतके अचुन दर्शन आहे की, ज्ञानेश्वरीतील एक-एक ओवी समजून घेण्यासाठी माणसाचे पूर्ण आयुष्य जाईल. असा या ग्रंथाचा गौरव केला जातो.

ज्ञानेश्वरीतील शब्द भांडार मोठे आहे. लोकभाषेतील शब्द व लोकजीवनातील समर्पक दृष्टान्त त्यांच्यामुळे ज्ञानेश्वरीचा सुबोधपणा वाढला आहे. अनेक शब्दांची 'उकारान्त रूपे' ज्ञानेश्वर वापरतात.

''नाद ऐवजी नादवू, वाट ऐवजी वाटवू'' त्यामुळे ओवीची लय वाढती आहे. तेथे आपले पणाने वक्त्याचा श्रोत्यांशी संवाद आहे. तत्वज्ञान आणि काव्य यांचा सुंदर मेळ ज्ञानेश्वरीत पाहवयास मिळतो.

ज्ञानेश्वरीच्या सुरूवातीस ज्ञानेश्वरांनी गणेश वंदन केले आहेत. त्याच प्रमाणे ज्ञानेश्वरीतील 'पसायदान', ज्ञानेश्वरांच्या उदारता मानवतावादी दृष्टीचा या प्रार्थनेतून परिचय घडतो. सर्व कल्याणाच्या भावनेतून विश्वात्मक देवाजवळ ज्ञानेश्वरांनी जे मागने मागितले आहे ते वैयक्तिक लाभाचे नाही, सर्व प्राणी-मात्रांच्या सुखाची कल्याणाची मागणी त्यांनी मागितली आहे. सर्वांच्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात अशी प्रार्थना ज्ञानेश्वर करतात. त्यांनी प्रथमच मराठीतून गीता टीका लिहिली. अवघड श्रेष्ठ, तत्वज्ञान संस्कृत भाषेतच निर्माण होऊ शकते. असा समज तेव्हा सर्वांच्या मनात होता. ज्ञानेश्वरांनी मराठी भाषा ही त्या योग्यतेची आहे. असे सिद्ध केले. मराठी भाषेबद्दलचा अभिमान.

माझा मराठाची बोलु कौतुके
परि अमृतातेही पैजा जिंके

या ओवीतून त्यांनी सांगितला आहे. मराठी भाषेची प्रतिष्ठा, शक्ती आणि सुंदरता याचे दर्शन त्यांनी आत्मविश्वासाने घडविणे मराठी वाङ्मयाला ज्ञानेश्वरांनी ही मोठी देणगी आहे.

''अमृतानुभव'' हा स्वतंत्र तत्वज्ञानात्मक ग्रंथ ओवी छंदात रचलेला आहे. त्यामध्ये शिव-शक्तीचे ऐक्य, प्रथम अज्ञानाचा विनाश आणि नंतर ज्ञानाच्या पलिकडची अवस्था तसेच विश्व म्हणजे चिद्शक्तीचा विकास असल्याची धारणा या विषयीचे विवेचन आहे. केवळ तत्वज्ञानात्मक असा आग्रह ज्ञानेश्वरी इतका सुगम-सोपा नाही. परंतु त्यातील तत्वज्ञान अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे आहे.

ज्ञानेश्वरांची गुरूभक्ती, आत्मविश्वास, विनय आणि वक्तृत्वाची श्रेणी यांचे दर्शन आपणा समोर घडते.

''चांगदेव पासष्टी'' चांगा वटेश्वर या हटयोगी पुरूषाला भक्ती योग ज्ञानेश्वरांनी लिहिलेले पत्र म्हणजे 'चांगदेव पासष्टी'. पासष्ट ओव्यांचे हे लघु काव्य आहे. पत्र रूपाने केलेला संवादासारखे याचे स्वरूप आहे. ज्ञानेश्वरांनी चांगदेवाशी केलेला संवाद तत्वज्ञानाविषयी आहे. वैयक्तिक सु:ख-दु:खा पेक्षा निरनिराळी अशी ही विचारांच्या पातळीवर देव-घेव आढळते. जगामध्ये आपल्याला विविधता आणि भिन्नता दिसत असली तरी शेवटी सर्व गोष्टी अभिन्न आहेत. एकाच चैतन्याची ही विविध रूप आहेत. ज्ञानदेवांनी विविध दृष्टान्त, रूपके वापरून ही अवघड संकल्पना समजावण्याचा प्रयत्न केला आहे.

ज्ञानेश्वरांचे अभंग गेली सातशे वर्ष मराठी माणसांच्या ओठावर खेळत आहेत. केवळ मौखिक परंपरेने आपल्या पर्यंत आल्याने त्यांची भाषा थोडी बदललेली आहे. ती जुन्या तेराव्या शतकातील मराठीपेक्षा आधुनिक वाटते. त्यामुळे अभंग रचणारे ज्ञानेश्वर व अमृतानुभव लिहिणारे ज्ञानेश्वर वेगळे असावे असे ही मत काहींनी व्यक्त केलेले आपल्याला दिसून येते.

* * * * * * * * * * * *

## * संत जनाबाई *

**गोविंद बागुल**, S.Y.B.Sc.

**प्रस्तावना :-**

संतांची भूमी असाही महाराष्ट्राचा उल्लेख केला जातो. त्यात गौरवाचा भाग असेलही पण वस्तुनिष्ठता देखील आहे. विशेषत तेराव्या शतकामध्ये, ज्ञानदेवांच्या शब्दांचा प्रयोग करून सांगायचे झाले तर 'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी' च महाराष्ट्रात नांदत होती.

मराठी संतांना वर्ण, जातींची मर्यादा नव्हती, ब्राह्मणांपासून अतिशुद्रांपर्यंत सर्व जातिजमातींमध्ये संत जन्मले, पुरूषांप्रमाणेच स्त्रियांनीही संतत्व प्राप्त करून घेतले आणि त्या सन्मानास प्राप्त झाल्या, मुक्ताबाई, जनाबाई, सोयरा, निर्मला, बहिणा अशी नावे सहज डोळ्यांसमोर येतात.

या संत कवयित्रींमध्ये जनाबाई हे एक ठळक नांव आहे. जनाबाई आणि मुक्ताबाई या तशा समकालीनच परंतु अद्‌भुततेचे वलय लाभलेल्या मुक्ताबाईंच्या तुलनेत जनाबाईचे सर्वसाधारण स्त्री असणे उठून दिसल्याशिवाय राहत नाही.

संत जनाबाई या संत नामदेवांच्या समकालीन वारकरी संत कवियत्री होत्या. आपले उपास्य दैवत श्री विठ्ठलाशी विविध पातळ्यांवर नाते प्रस्थापित करून त्यांच्याशी संवाद साधणे

हे जनाबाईंचे वैशिष्ट्ये होय.

**जनीचे अभंग लिहीत नारायण**
**करीत श्रवण साधुसंत...**
**धन्य तेचि जनी, धन्य तिची भक्ती,**
**नामदेव स्तुती करीतसे...**

संत जनाबाई या संत कवयित्री म्हणून जनमानसात लोकप्रिय आहेत. महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून स्त्रिया जात्यावर दळण दळताना, कांडताना त्यांच्या ओव्या गातात. गोदावरीच्या तीरावरील परभणी जिल्ह्यातील गंगाखेड हे जनाबाईंचे गाव होय. जनाबाई ह्या पंढरपूरचे वारकरी 'दमा' आणि भगवंतभक्त स्त्री 'करूंड' या दांपत्याची मुलगी होत. आई व वडील पंढरपूरच्या विठ्ठलाचे परमभक्त होते. हे उभयता नियमीत पंढरीची वारी करीत असत.

संत नामदेवांच्या सहवासात जनाबाईंनीही विठ्ठलाच्या भक्तीचा ध्यास घेतला होता. 'दळिता कांडिता तुज गाईन अनंता' असे त्या म्हणत असत. संत नामदेव हेच त्यांचे पारमार्थिक गुरू होते. श्री संत ज्ञानदेव-विसोबा-खेचर - संत नामदेव - संत जनाबाई अशी त्यांची गुरूपरंपरा आहे. संत नामदेवांच्या प्रभावळीतील सर्व संतांना त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले आहे.

***'विठू माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा'***

हा प्रसिद्ध अभंग जनाबाईंचाच आहे. त्यांना संत नामदेवांमुळे सतत संत-संग घडला होता. संत ज्ञानदेवांविषयीही त्यांचा भक्तिभाव अनन्य साधारण होता. 'परलोकीचे तारू । म्हणे माझा ज्ञानेश्वरू' असे त्यांनी ज्ञानेश्वरांविषयी म्हटले आहे. गौऱ्या-शेण वेचतांना, घरातील इतर कामे करत असतांना त्या सतत देवाचे नामस्मरण करत असत.

संत जनाबाईंच्या नावावर असलेले एकूण सुमारे ३५० अभंग सकल संत गाथेत मुद्रित केले आहेत. ह्या शिवाय कृष्णजन्म, थाळीपाक, प्रल्हादचरित्र, बालक्रीडा, हरिश्चंद्राख्यान अशा आख्यानरचना पण त्यांच्या नावावर आहेत. संत जनाबाईंच्या थाळीपाक व द्रौपती स्वयंवर या भावमधुर आख्यानांनी महाकवी मुक्तेश्वरांना (संत एकनाथांचे नातू) स्फूर्ती मिळाली.

विठ्ठलाला लेकुरवाळ्या रूपामध्ये पाहणे, जनाबाईच्या दृष्टीने आनंददायी क्षण आहे. पुढील अभंगातून तिच्या प्रेमळ अनुभूतीचे वात्सल्य प्रगट होते. जनाबाई सांगते, विठ्ठल सर्वांचा आहे. सर्वाभूती आहे.

*विठो माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा ।*
*निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ।।*
*पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर ।।*
*गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ।।*
*बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी ।।*
*जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।।*

विठ्ठलाला मातेच्या रूपात जनाबाईने

पाहिले. या अभंगातून लेकुरवाळा विठ्ठल चितारला गेला आहे. अंगा-खांद्यावर, मांडीवर, कडेवर, हाताला, बोटाला, पुढे-मागे, ईश्वराजवळ सर्व संतांचे स्थान तिने गुंफलेले आहे. ईश्वर सर्व जाती-जमातींच्या संतांना जवळ करतो. हा एक चित्रात्मक अनुभव जनाबाईने अभंगातून मांडला आहे.

येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई ।।
भीमा आणि चंद्रभागा । तुझे चरणींच्या गंगा ।।
इतुक्यासहित त्वां बा यावें ।माझे रंगणी नाचावे।।
माझा रंग तुझिया गुणीं । ह्यणे नामयाची जनी।।

जनाबाईने वरील अभंगातून विठ्ठलाला आर्त भक्तिभावनेने आळविले आहे. 'येग येग विठाबाई' या गेयतापूर्ण रचनेमधुन मनाची भावुकता व्यक्त होते.

जनाबाई म्हणते - 'हे विठाबाई माझ्या पंढरीचे आई तू लवकर लवकर ये चंद्रभागा नदी म्हणजे तुझ्या पदस्पर्शाने निर्माण झालेली गंगाच आहेस. या सर्वासहित तू येऊन माझ्या कीर्तन रंगात नाचावे. विठ्ठल, तुझ्या येण्यामुळे माझ्या कीर्तन रंगाला शोभा येणार आहे. तुझ्या गुण-गायनाने माझे मन निश्चितपणे रमेल तूच माझ्या गुणात रंग भरशील''

संत जनाबाईंची भावकविता ही भगवंताच्या प्रेमाने ओतप्रेत भरलेली आहे. पूर्ण निष्काम होऊन लौकिक, ऐहिक भावना विसरून त्या विठ्ठलाला शरण गेलेल्या आहेत. आत्मज्ञानाचा साक्षात्कार घडण्यूपर्वीच त्या निर्विकार झाल्या आहेत. संत जनाबाईंच्या जीवनातील अनंत अनुभूती त्यांनी त्यांच्या रचनांतून रेखाटल्या आहेत. संत नामदेवांवरील भक्ति-प्रेमभाव, संत ज्ञानदेवांविषयी असलेला उत्कट भाव, संत चोखोबांच्या भावसामर्थ्याचे अनुसरण, तसेच विठ्ठलाविषयीचा भक्तिभाव, त्यांच्या काव्यात ओतप्रेत भरलेला दिसून येतो. वेळप्रसंगी देवाशी भांडायला पण त्या कमी करत नाहीत. तत्कालीन संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत सोपानकाका, संत गोरोबा, संत चोखा मेळा, संत सेना महाराज आदी सत्पुरूषांच्या जीवनाचा, सद्गुणांचा आढावा घेणारी पदयरचना करून संत जनाबाईंनी पुढील पिढ्यांवर एकप्रकारे उपकारच करून ठेवले आहेत. त्यांची भाषा सर्वसामान्य माणसांच्या हृदयाला जाऊन भिडते. संत जनाबाईंचे बरेचसे अभंग नामदेव गाथेमध्ये आहेत.

संत जनाबाई श्री क्षेत्र पंढरपूर येथे महाद्वारी, आषाढ कृष्ण त्रयोदशी शके १२७२ या दिवशी समाधिस्त होऊन पांडुरंगात विलीन झाल्या. (इ. न. १३५०)

* * * * * * * * * * * *

## ✻ संत कान्होपात्रा ✻

**महेंद्र ठाकरे**, F.Y.B.A.

भागवत संप्रदायातील ही कवयित्री ज्ञानेश्वरसमकालीन असावी, असे एक मत आहे. पण तज्ज्ञांच्या मते, तिचा काळ इ. स. १४६८ (श. १३९०) हा असावा. कान्होपात्रा मूळची मंगळवेढे येथील श्यामा गणिकेची कन्या. कुणाही पुरूषाला आपला देह विकण्याऐवजी साक्षात पांडुरंगालाच तिने आपले तनमन वाहून टाकले. म्हणूनच विठ्ठलाचा धावा करताना ती म्हणते,

पतित तू पावना ।
म्हणविसी नारायणा ।।
जरी सांभाळी वचन ।
ब्रीद वागविसी जाण ।।
याती शुद्ध नाही भाव ।
दुष्ट आचरण स्वभाव ।।
मुखी नाम नाही ।
कान्होपात्रा शरण पायी ।।

कान्होपात्रेचा हा अभंग म्हणजे कारूण्य आणि आर्ततेचा कळसाध्याय आहे. विषयत्याग करा आणि नामभक्ती करा, असा उपदेश तिने आपल्या अनेक अभंगांतून केला आहे. 'घ्या रे घ्या रे मुर्खी नाम । अंतरी धरूनिया प्रेम । ऐसी नाममाळा । कान्होपात्रा ल्याली गळा ।।'' असे ती सांगते, 'माझे जीवीचे जीवन । तो विठ्ठल निधान' असे तिने विठ्ठलाचे वर्णन केले आहे. विठ्ठलभेटीविषयीची तिची तळमळ अनेक अभंगांतून व्यक्त झाली असून, देव भेटत नाही म्हणून 'संचित माझे खोटे मन असे ग्वाही । तुज बोल नाही देवराया' असा स्वतःकडे तिने दोष घेतला आहे. संत आणि संतांचे दर्शन ही इतरांप्रमाणेच कान्होपात्रेलाही पर्वणी आहे. संतदर्शनामुळे आपणास झालेला आनंद ती व्यक्त करते. आळंदीला जाऊन ज्ञानेशांच्या समाधीचे दर्शन घेतल्यावर 'धन्य कान्होपात्रा आजी भाग्याची झाली । भेटी झाली ज्ञानदेवाची म्हणोनिया' । असे तिला होऊन गेले.

दीन पतित अन्यायी ।
शरण आले विठाबाई ।।
मी तो आहे यातीहीन ।
न कळे काही आचरण ।।

किंवा 'मज अधिकार नाही । भेटी देई विठाबाई' यांसारख्या अभंगातून आपल्या हीन ज्ञातीचे 'सामाजिक दुखणे' च तिने व्यक्त केले आहे. कान्होपात्रेच्या या साऱ्या अभगांना 'प्रासादिक भावकाव्ये' संबोधून गं. बं. ग्रामोपाध्ये म्हणतात, 'कान्होपात्रेचे अभंग म्हणजे तिच्या भावनांचा स्वच्छ बिलोरी आरसाच आहे.' बेदरचे

बोलावणे आल्यावर

पतित पावन म्हणिसी आधी ।
तरी का उपाधी भक्तामागे ।।
तुझे म्हणवीता दुजे अंगसंग ।
उणेपणा सांग कोणाकडे ।।
सिंहाचे भातुके जंबुक पै नेता ।
थोराचिया माथा लाज वाटे ।।
म्हणे कान्होपात्रा देह समर्पणे ।
करावा जतन ब्रीदासाठी ।

हा तिने केलेला धावा तिची असहायता, शरणागती तर दाखवतोच, पण तिच्या व्रतस्थ आणि उज्वल व्यक्तिमत्वाचे दर्शनही घडवतो. 'नको देवराया । अंत आता पाहू । प्राण हा सर्वथा । फुटो पाहे ।' या अभंगातील 'मोकलीन असा जाहले मी उदास । घेई कान्होपात्रेस हृदयात' हे चरण तिच्या अंतःकरणातील व्याकुळता विलक्षण परिणामकारकपणे प्रकट करतात. 'कान्होपात्रेच्या कारूण्याचे कारण तिच्या अपार्थिव जीवनापेक्षा तिच्या पार्थिव जीवनातच अधिक आहे; ' हे गं. ब. ग्रामोपाध्ये यांचे मत योग्यच आहे. कान्होपात्रेचे काव्य म्हणजे भक्ताच्या उत्कट अनुभूतीचा सात्विक अविष्कार आहे.

* * * * * * * * * * * *

## ✻ संत बहिणाबाई ✻

**चेतना गावीत**, T.Y.B.A.

'बहिणी फडकती ध्वजा'

तुकोबांच्या वाणीचा आणि विचारांचा प्रभाव लोकमानसावर पडत होता. त्यातून प्रेरणा घेऊन अनेकांनी आपले भावविश्व फुलविले होते. त्याचा अविष्कार त्यांच्या काव्यातून होत होता. तुकोबांच्या स्वप्नसाक्षात्काराने काव्य निर्माण झाले बहिणाबाई.

तुकारामांच्या या सुप्रसिद्ध शिष्येचा जन्म इ. स. १५२८ मध्ये झाला. आपल्या जन्मस्थानाचा 'देवगाव माझे माहेर साजणी । वेरूळ तेथोनि पुर्वभागी' असा त्यांनी स्वतःच आत्मचरित्राच्या प्रारंभी उल्लेख केला आहे. वयाच्या तिसऱ्या वर्षीच तीस वर्षीच्या बिजवराशी त्यांचा विवाह झाला. आणि वयाच्या आठव्या वर्षी पित्यासोबत परागंदा व्हावे लागले. प्रवरासंगम, शिखर शिंगणापूर, नीरा नरसिंगपूर, पंढरपूर, रहिमतपूर अशी भ्रमंती करीत हे कुटुंब कोल्हापूरला येऊन स्थिरावले. भ्रमंतीमधील अनेक तिर्थक्षेत्रांच्या पवित्र आणि प्रसन्न वातावरणात बहिणाबाईंचे चित्त रमून जाई भान हरपे, पण काही काळाने पुन्हा त्यांचे मन भलत्याच दिशेला फरफटत नेई. अशा वेळी मनाची जी तडफड होई तिचे चित्र बहिणाबाईनी

आपल्या आत्मचरित्रात उत्कटपणे रेखाटले आहे. बहिणाबाई संसारात मात्र मुळीच रमल्या नाहीत. हरी आणि हरीकथा याकडेच त्यांचे मन धाव घेई. कथाकीर्तनापायी पतीकडून त्यांचा छळही झाला. अशाही स्थितीत आपण स्वतःचा व आपल्या पतीचाही उद्धार कसा केला याचे कथन त्यांनी केले आहे. कोल्हापूरला त्यांना ज्या जयरामस्वामींच्या दर्शनाचा लाभ झाला. त्यांचे व्यक्तिचित्र अत्यंत आदरपूर्वक असे त्यांनी आपल्या अभंगातून रेखाटले आहे. जयरामस्वामीं कडून तुकोबाची कीर्ती आणि अभंगवाणी त्यांच्या कानावर आली आणि त्यांचा छंद बहिणाबाईंना जडला. वयाच्या एकोणिसाव्या वर्षी (इ. स. १६४८ / श. १५७०) त्यांना तुकोबांचा साक्षात्कार झाला. पुढे त्यांनी आपल्या पतीचेही मतपरिवर्तन घडवून 'तळहातावर गगन झेलण्याचा' प्रयत्न करून दाखविला.

बहिणाबाईंच्या आत्मचरित्रातून त्यांच्या वयाच्या तीन ते अठरा या पंधरा वर्षातील अनेक सुखदुःखाच्या आशा-निराशांच्या चित्रपट पाहावयास मिळतो. बहिणाबाईंनी ही आत्मकथा सुमारे ७४ अभंगांतून ओतः प्रोत भरलेली आहे. तुकोबांच्या दर्शनासाठी हेलावणारे त्यांचे अंतरंग आणि प्रत्यक्ष तुकोबांच्या साक्षात्कार झाल्यानंतर 'आनंद हा चित्ता समावेना' अशी सुखावस्था, ही सारी भावस्पंदने या आत्मचरित्रात्मक अभंगांनी अत्यंत हळूवारपणे टिपली आहे. तुकोबांच्या दर्शनामुळे मनाची झालेली अवस्था बहिणाबाई 'बहिणी म्हणे जैसा लोटला समुद्र । हृदयाकाशी चंद्र बोले वाचा ' अशा शब्दांतून व्यक्त करतात. भागवत संप्रदायाचा इतिहास बहिणाबाईंनी एका अभंगात असा सांगितला आहे.

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।
ज्ञानेदेवें रचिला पाया । उभारिले देवालया।।
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार ।।
जनार्दन एकनाथ । खांब दिघला भागवत ।।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।
बहिणी म्हणे फडकती ध्वजा ।
निरूपणा केले वोजा ।।

आजही सर्व वारकऱ्यांच्या तोंडी हा अभंग आहे. बहिणाबाईंचे सर्वात मोठे यश म्हणता येईल 'एवढा एकच अभंग लिहूनही त्यांची कीर्ती अमर व्हावी. इतके त्याचे मोल आहे. असा यथार्थपणे या रचनेचा गौरव केला जातो. त्यांनी लिहिलेले सुमारे चारशे अभंग उपलब्ध असून त्यातील पस्तीस अभंग आपल्या मृत्यूपुर्वी त्यांनी आपल्या मुलगा विठोबा यास सांगितले आहेत. तुकोबांविषयी प्रत्यक्ष माहिती असलेल्या तुकाराम शिष्येचे हे अभंग आहेत.

* * * * * * * * * * * *

## ✻ संत कर्ममेळा ✻

**संध्या दळवी**, T.Y.B.A.

जीवितकाल : इसवी सनाचे चौदावे शतक

कर्ममेळा हा चोखोबांचा मुलगा त्याचा जन्मशक मात्र उपलब्ध नाही घरातल्या वातावरणामुळे व संस्कारामुळे कर्ममेळ्याच्या मनाची घडण ही भक्तिप्रवण होणे स्वाभाविकच होते. जन्मदाते व थोर संत अशा उभय नात्यांनी चोखोबांविषयी त्याच्या मनात अतीव आदर असल्यामुळे अभंगात तो आपली नाममुद्रा चोखियाचा कर्ममेळा अशी करतो सकलसंत गाथ्यात त्याचे सत्तावीस अभंग आहेत. विठ्ठलापुढे तो शरण येत असला तरी आपल्या सारख्या हीन यातीला विठ्ठल कसला प्रसन्न होणार, अशी एकूण अनुभवाने त्याची धारणा झालेली दिसते तो विठ्ठलाला म्हणतो, वाया तोंडपिटी करा कशासाठी । तुमची ते रहाटी कळो आली ।। तरूण वयातला हळवेपणा आणि तडफ या वृत्तीचे मिश्रण त्याच्या स्वभावात आढळते, भावना प्रांजल पण अभिव्यक्ती प्रखर असा प्रकार त्याच्या लेखनात दिसतो. 'मज कोण आहे गणगोत' असे एकाकी हळवेपणाने प्रकट करता करता 'न दिसे तुझी बरी नीत' असेही उद्‌गार त्यांच्या मुखातुन बाहेर पडतात त्यालाच तीव्रतेचा वळसा दिलेली छटा पुढील अभंगात पाहावयास मिळते.

आमुची केली हीन याती ।
तुज का न कळे श्रीपती ।।
जन्म गेला उष्टे खाता ।
लाज न ये तुमचे चिता ।।
आमची घरी भात दही ।
खावोनी कैसा म्हणसी नाही ।।
म्हणे चोखियाचा कर्ममेळा ।
कासया जन्म दिला मला ।।

आपल्याला हिनत्व मिळालेले आहे, त्यामुळे 'तुमच्या संगती काय सुख आम्हा' असे तो विठ्ठलाला ऐकवतो आपल्या अभंगातुन कर्ममेळ्याने उपेक्षिताच्या कैफयतीच देवापुढे मांडल्या आहेत. त्या मांडता मांडता तो देवालाही कैचीत पकडतो प्रांजल भावनेतुन आणि सात्विक संतापातुन प्रकट झालेला बंडखोरपणा हा कर्ममेळ्याच्या अभंगवाणीचा खरा विशेष म्हणता येईल. मराठी दलित कवितेचे पुर्वस्त्रोत शोधावयाचे झाल्यास ते कर्ममेळ्याच्या अभंगवाणीत सापडतील.

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

## ✻ संत चोखामेळा ✻

**माया पालवी**, T.Y.B.A.

चोखामेळा हा मंगळवेढ्याचा राहणारा आणि जातीचा महार होता. त्यांच्या बायकोचे नांव थराबाई व त्यांना एक मुलगा होता. त्यांचे नांव 'कर्ममेळा' हे सर्व कुटुंब मंगळवेढ्यात राहत होते. त्यांच्याच जवळ चोख्याची बहीण निर्मला राहत होती. संसाराच्या त्रासाने व त्यातील अडचणींमुळे संसाराला चोख्याने मन अगदी कंटाळून गेले होते. तो म्हणतो ''एकपुढे एक पडती आपला सरिता न सरत काय करू ?'' अशा तापलेल्या मनाला शांती मिळावी व आराम वाटावा म्हणून चोख्याने अनेक तीर्थयात्रा केल्या पण कोठेही त्याचे मन रमले नाही, तो म्हणतो–

'बहुत हिंडलो । देश देशांतर ।
परी मन नाही स्थिर । झाले कोठे ।
बहुत तीर्थे । फिरो निया आलो ।
मनासवे झालो । वेडगळीच ।।'

असे चोखोबा म्हणतात.

✻ उपास्य दैवत –

पंढरीचा पांडुरंग हेच चोखोबाचे दैवत होते. त्यामुळे त्यांना पंढरीशिवाय कुठेच चैन पडत नाही. ते म्हणतात, ''पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी । प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे ।।''

नामदेववादी संत मालिकेत चोखाबांचे स्थान महत्वाचे होते. ते सर्व संत एकत्र बसून चर्चा करीत प्रसाद ग्रहण करीत.

✻ गुरू परंपरा –

आपल्या संस्कृतीत ब्रम्ह प्राप्तीसाठी सर्वांना गुरू करावेच लागतात. चोखोबांनी सुद्धा नामदेवाना आपले गुरू मानले. नामदेवांनी 'विठ्ठल' या त्रिअक्षरी मंत्राचा उपदेश केला.

''धन्य धन्य नामदेवा । केला उपकार जीवा ।।
माझा निरासिला भेवो । दावीला पंढरीरावो ।।
मंत्र सांगितला सोपा । निवारिले भवताप ।।
माझी कृपेची माऊली । चोखा म्हणे पान्हा घाली ।।''

✻ चोखोबाची अभंगवाणी –

आजकाल कुठलेही पुस्तक एकदा वाचल्यावर परत वाचावेसे वाटत नाही. पण संत वाङ्मय त्यांचे धार्मिक ग्रंथ हे त्यांच्यातील गुणामुळे अमर झाले.

चोखोबाची ही अभंगवाणी त्यांच्या मुखातुन प्रगट झाली आणि अनंत भटांसारख्या महान ब्राम्हणाने ती लिहून घेतली. ज्या काळात स्पृश्य–अस्पृश्यांचा महाभयंकर भेदभाव पाळला जात होता. त्या काळात या अनंत भटाने चोखोबाचे

अभंग लिहून घ्यावीत ही खरोखर अभिमानास्पद गोष्ट आहे. त्या विषयी काही ओव्या प्रचलित आहेत. त्या अशा यावरून आनंद भट हेच चोखोबांच्या अभंगाचे लेखन करणारे आहेत हे समजते. श्री कदमांनी चोखोबांच्या अभंगाचे वर्गीकरण खालील प्रमाणे केली आहे.

✲ पंढरपूर विषयक अभंग –

असा हा विठ्ठल ज्या पंढरपूरला त्या पंढरपूरचे महात्म्य देखील चोखोबा आपल्या अभंगातून व्यक्त करतात.

''पंढरपूरचे सुख नाही त्रिभुवनी ।
प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे ।।
त्रिभुवनी समर्थ ऐसे पै तीर्थ ।
दक्षिण मुखा वाहत चंद्रभागा ।।
सकळ संताचा मुकूलमणि देखा ।
पुंडलिक सखा आहे तिथे ।।
चोखा म्हणे तेथे सुखाची मिरारा ।
ओव्या भाविकांसी अखंड ।।''

सर्वांना सदैव सुखाची मिरारी लाभावी असे पंढरपूर त्या चंद्रभागेच्या तिरी उभे आहे.

✲ आत्मपर –

चोखोबांनी आपल्या काही अभंगातुन आत्मनिवेदनही केलेले आहे. तसे चोखोबा स्वत:विषयी फारच थोडे लिहितात. त्यापैकी हा पुढील अभंग. –

''शुद्ध चोखामेळा । करी नामाचा सोहळा ।।
यातीहिन मी महार । पुर्वी निळाचा अवतार ।।
कृष्णनिंदा घडली होती म्हणोनि
महार जन्म प्राप्ती ।।
चोखा म्हणे विटाळ । आम्हा पूर्वीचे हे फळ ।।''

अशी चोखोबाची श्रद्धा होती कर्माविषयक पुनर्जन्म यावर त्यांची श्रद्धा होती हे यावरून स्पष्ट होते.

✲ बालक्रीडा –

ज्याप्रमाणे अन्य संतांनी विरहिनी लेखन कौशल्य प्रकार वापरून गोकुळाचे वर्णन केले आहे. या काव्यातून गोकुळातीत 'बालक्रीडा' चित्रीत केल्या आहे.

''कवतुक गोकुळी करी गोपाळासी ।
खाय उच्छिटासी दही भात ।।
चोरीतसे लोणी घरोघरी त्याचे ।
खावोनी तयाचे म्हणे नाही ।।
गौळणी गाऱ्हाणी देता माते पासी ।
देखोनी तिचेसी इरपती ।।
सेणोनि गोहाणे जाय यमुने तटी ।
धावे धेनुपाती करी कळा ।।
चोखा म्हणे ऐसे दावोनी लाघव ।
आपुलीसी भावकळतो नदी ।।

✻ नाममहिमा –

चोखोबा हे नामदेवाचे प्रेमळ शिष्य आहेत. नामदेवाप्रमाणेच त्यांनी प्रापांचिकाची सारी कर्तव्य स्वीकारून विठ्ठलाची भक्ती केली. कर्मप्रतिष्ठानी त्यांचा केला. त्यांची भक्ती आहे. असा काहिसी भक्ती आहे. असा काहि तरी आत्मविश्वास ते व्यक्त करतात तर याच 'नामस्मरणात' कितीतरी सामर्थ्य आहे. हे सांगताना चोखोबा म्हणतात.

''नामाचे सामर्थ्य विरा ते अमृत । ऐसी
हे प्रचलित आहे जीव ।।
वेळ जपे आधी ।।
नेम धर्म नलगे साधन । सुख
नारायण जप करी ।।
चोखा म्हणे माजा भरवसा नामाचा ।
श्रेणे काळीकाळाचा भेद नाही ।।

अशा तऱ्हेने विठ्ठल काम नाम आपण जपावे असे सांगून ''सोहळा माझी का । गुंतली गोडीसी । तैवापरी मानसी नाम जपे ।। असे उदाहरण देतात.

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

## ✻ संत बहिरा जातवेद ✻

**धनश्री पवार**, T.Y.B.A.

बहिरा जातवेद जातवेद बहिरा, प. बहिरा पिसा अशा तिनही नावानी या कवीचा उल्लेख केला जातो. बहिरा हे भैरव चे सुलभीकरण असून जातवेद (ज्ञानवेद) हे आडनांव आहे. ( या देह बहिरू नाम जातवेदु में उपनाम ) जातवेद म्हणजे सर्व विद्या जाणणारा – इ. स. १२७४–१२९६ हा याचा जीवनकाल सांगितला जातो. भैरवी टीका हा त्याचा मुख्य व मोठा ग्रंथ आहे.

'भैरवी टीका' ही भागवताच्या दशमस्कंधा वरील आद्य मराठी टीका होय. नव्वद अध्याय आणि २५७५ ओव्या असा या ग्रंथाचा प्रचंड विस्तार आहे. भागवतातील श्लोकांनुसार कवीने टिकालेखन / भाष्यलेखन केलेले असले तरी श्लोकाचा केवळ अर्थ वा स्पष्टीकरण येथे नसून त्यातील काही प्रसंगाच्या आधारे कवी श्रीकृष्ण कथेचा स्वतंत्र विचार करतो. आपण 'श्रीधराच्या मार्गात पाहुनि' चालत, असल्याचे मात्र कवीने म्हटले ग्रंथारंभी, श्रीगणेशा, शारदा, श्रोतेजन, कुलदेवता व गुरू यांना कवी मनोभावे वंदन करतो. आपण तुजपासून वेगळे नाही, मग तुझे वंदन कोणत्या प्रकारे करू, असा प्रश्न कविला गणेशवंदनात पडतो तो म्हणतो.

तुझिया उदरातुनि निघावे । तुजवेगळे देखावे ।
तरि मृगजवळ भक्षावें । भानुतें जेवि ।।
तुज साष्टांग नमस्कार । तरि देहो हा कोठे पसरूं।

जेथे मनाच्या व्यापरू । तुजाचे माजि असे ।।

वेधक व्यक्तिचित्रणाचे आणि नाट्यपूर्ण प्रसंग निर्मितीचे कवी कौशल्य बहिरा जातवेदा जवळ आहे. कंस, देवकी, पूतना, श्रीकृष्ण, रूक्मिणी, यांच्या मुळातील व्यक्तिरेखांत कवीने स्वप्रतिभेने नवे रंग भरून त्यांना व्यक्तिमत्वे प्राप्त करून दिली आहेत.

'देवकीच्या कुशीतला आठवा गर्भ तुझा हंता असेल' अशी आकाशवाणी देवकीच्या वरातीत होते, आणि ती ऐकताच हौसेने तिची वरात काढणारा कंस क्षणार्धात, 'जो हो – कुसिं । तेणे वधावे आम्हांसि । तरि आतांचि मारू हिसी । मग कैची कथा ।।, असे म्हणत भर वरातीत तिलाच ठार मारायला जाणाऱ्या कंसाची मन:स्थिती त्याच्या हालचालीतुन कवीने वेधकपणे चित्रित केली आहे.

कृष्णजन्म म्हणते पंचहाभूतांचाच नवा अविष्कार असल्याचे तात्विक विवेचन कवी करीत असला, तरी हा अविष्कार पार्थिव विश्वात प्रसन्नतेचे उन्मेष कसे निर्माण करतो, याचे कवीने घडविलेले दर्शनही तितकेच ह्रदय आहे. आज कृष्ण जन्मणार म्हणून प्रसन्न होतात, आणि

'कृष्णाचि अद्‌भुते । कर्म जे विख्याते' ती वर्णन करणे हा बहिरा जातवेदाच्या श्रीकृष्ण भक्तीचाच एक भाग आहे.पूतनावध,कलियामर्दन, कंसवध, कृष्णाच्या बालक्रीडा, कृष्ण–रूक्मिणी विवाह हे प्रसंग कवीने विस्ताराने आणि तन्मयतेने चित्रित केले आहेत.

नवव्या अध्यायात मंथन करणाऱ्या यशोधेचे चित्र कवीने रेखाटले आहे. पूतनावध, कालियामर्दन, कंसवध इ. प्रसंग पाहणाऱ्या गौळजनांना कृष्णाच्या अचाट कर्तृत्वाचे कौतुक वाटते यातून प्रकटणारा त्यांचा भक्तिभाव त्यांच्याच मुखातून कवी 'देखोनि म्हणजे गौळीजनु। हा आमुचा कृष्णु लहानु । नेणों हे शक्ति कौठौनु । आलि असे । येवठालि दैत्यांची ढिसाळें । मारिली येणे बाळे । याचें लाघव न कळे । लाघवियासि ।।' अशा शब्दांत प्रकट करतो.

मूळ भागवतात रूक्मिणीविवाहाचा उल्लेख ओझरता येतो. पण त्या आधारे कृष्णाचा पराक्रम व विवाहसोहळा वर्णन करण्यासाठी बहिरा जातवेदाने अडीच हजार ओव्यांचा विस्तार केला आहे. रूक्मिनीचा निर्देश कवीने, 'माता' असा केला आहे.

रूक्मिणी विवाहवर्णनात तत्कालीन चालीरीती, पदार्थ, दागदागिने, स्त्रियांचा साज, शृंगार व नटण्याच्या पद्धती यांचे दर्शन घडते त्या, श्रीकृष्ण दर्शनासाठी साजशृंगार करतात. त्यात दंतपक्ती उटण्यापासून चोळ्या घालण्या पर्यंतचे त्यांच्या साजशृंगाराचे वर्णन आले आहे.

प्रस्तुत टिकालेखनामागील मुख्य भूमिका भक्तीचीच आहे, यात शंका नाही, काही प्रसंगाना तत्वनिरूपणाची झालरही कवी लावतो, या ग्रंथाशिवाय काही अभंगरचनाही बहिरा जातवेदने केली नाही.

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

## ※ संत गोरा कुंभार ※

**राहूल हाडस,** T.Y.B.A.

गोरा कुंभार (इ. स. १२६७ – १३०९ / स. ११८९ – १२३१ )

ज्ञानदेव – नामदेवांच्या भोवती असलेल्या प्रभावळीत गोरोबाकाकांचे स्थान फार वरचे आहे तो संतांच्या अनुभवाचा ठेवा होता. गोरोबांचा परमार्थमार्गावरील अधिकार फार मोठा असल्या मुळे त्यांना सारेजन गोरोबा काका म्हणत. गोरा जुनाट पै जुना । हाती थापटणे अनुभवाचे असे नामदेवांनी त्यांच्याविषयी गौरवोद्गार काढले आहेत. देवाचा शेजार लाभुनही अहंकारी राहिलेल्या नामदेवांचे मडके आपल्या अनुभवाच्या थापटण्याने कच्चे असल्याचे गोरोबांनी सांगितले त्यांचे वीस–एकवीस अभंग उपलब्ध आहेत.

मडकी घडवितांना त्यांचे सतत नामस्मरण चालु असे केशवाचे ध्यान धरूनी अंतरी । मृतिके माजारी नाचते, असे त्यांचे वर्णन केलेले आढळते. कर्मातच ईश्वर शोधण्याचा त्यांचा हा प्रयत्न ज्ञानदेव नामदेवप्रणीत वारकरी संप्रदायाच्या विचारसारणीचा परिपाक म्हटला पाहिजे. रूपाचा दर्पन रूपेविण पाहिला या ज्ञानदेवाच्या अनुभवा प्रमाणेच 'तत्वनासि' चा अनुभव गोरोबांनाही आला होता. आपल्या या साक्षात्काराचा अनुभव.

अंतरीचे गुज बोलु ऐसे काही ।
वर्णव्यक्त नाही शब्द शुन्य ।।
जयजय सनकुन जयज सनकुन ।
अनुढकात जंगट नाद गर्जे ।।
परतल्या श्रुर्ति म्हणती नेती नेती ।
त्याही नादाअंती स्थिर आहे ।।
म्हणे गोरा कुंभार सतावीचे नीर ।
ठेवि निरंतर नामदेव ।।

अशा यौगिक खुणांच्या शब्दांत गोरोबांनी नामदेवाजवळ निवेदीला आहे. जीवनमुक्त होण्याचा हा आनंद व्यक्त करता येत नाही. म्हणून गोरोबा म्हणतात. मुकिया साखर चाखाया दिघाली। बोलता हे बोली बोलवेना म्हणे गोरा कुंभार विठ्ठलमंत्र सोपा । एक वेगळा बापा उच्चारी रे । असा नामाचा महिमा त्यांनी आपल्या अभंगातुन सांगितला आहे. सगुणासंगे निर्गुणाची भेट होऊनही

निर्गुन रूपडे सगुणाचे बुंथी ।
विठ्ठल निवृत्ती प्रवृत्ति दिसे ।।

असे ते सांगतात उच्च पारमार्षिक अनुभवाच्या आनंदासोबतच ईश्वराशिवाय जन्म व्यर्थ जात असल्यामुळे पाश्चात्ता पग्धतेचेही प्रवाह गोरोबांच्या अंभगातुन वाहत असतात.

जन्मा येऊनिया काय केली करणी ।
व्यर्थ शिणविली जननी ।।
नाही गेला तिचा शीण ।
ऐसा झालो अपराधी ।
क्षमा करा कृपानिधी ।।

अशी उत्कट अवस्थाही त्यात कधी कधी पहावयास मिळते.

देवा तुझा मी कुंभार । नासी पापाचे डोंगर

ऐसा संतप्त हो जाती । नासी पापाचे डोंगर म्हणे कृपा भगवताची । गोरा कुंभार मागे हेचि ।।

हा त्यांचा अभंग वैशिष्ट्यपूर्ण असा आहे. गोरोबांच्या अत्यंत साध्या अशा अभंग रचनेत संपन्न आणि सात्विक असा ज्ञानानुभव साढविला आहे.

हरिभक्त गोरा कुंभार –

सोपानदेव, विसोबा खेचर, नामदेव अशी परंपरा असुन नाथपंथीयांचा योगमार्ग तेराव्या शतकात भक्तिमार्गाकडे झुकलेला दिसतो. याच भक्त मार्गात रममाण झालेला नामदेवांच्या प्रेमातील आणखी एक संत म्हणजे गोरोबाकाका यांचा जन्म ११८९ मधील सर्व संतमंडळात वयाने वडील होते. म्हणून यांना सर्वजन गोरोबाकाका म्हणून संबोधत यांचे सैराग्य श्रेष्ठ असुन त्यात भक्तिचा ओलावा असे माती तुडवितांना त्यांचे चित्त सदैव श्रीहरिचा चिंतनात दंग असे.

विठ्ठलाचे नाम स्मरे सर्वकाळ नेत्री वाहे जळ सद्‌गदीत । कल्लालाचे वंशी जन्माले शरीर। तो गोरा कुंभार ।

असा या गोरोबाकाकांचा गौरव झालेला आहे तेरढोकीच्या या भगवद्‌भक्ताची व नामदेवांची मोठीच जिव्हाळ्याची मैत्री होती संत परीक्षक म्हणुन प्रसिद्ध असलेल्या याच गोरोबांनी नामदेवांना सावध केले व नंतर नामदेव विसोबा खेचरांकडे गेले. नामदेवांना सावध करणारा 'जुनाट जुना परब्रम्ह म्हातारा, म्हणजे गोरक्षणाच असे एक मत अलीकडे पुढे आले आहे. गोरोबाचे काही थोडे अभंग प्रसिद्ध आहेत. 'देवा तुझा मी कुंभार । नाशी पापांचे डोंगर', म्हणे गोळा कुंभार सहज जीवन मुक्त । सुखरूप अद्वैत नामदेवा ।' 'म्हणे गोरा कुंभार नाही रूपरेखा । तेंचि तुझे मुख नामदेवा ।' 'म्हणे गोरा कुंभार नाही रूपरेखा। तेंचि तुझे मुख नामदेवा ।' केशवाचे ध्यान धरूनि अंतरी । मृतिकेमाझारी नाचतेसं इत्यादी ओळींतुन गोरोबांच्या मनातील नामदेवा विषयीचा भाव व्यक्त झाला आहे. अंतरीचे गुज बोलु ऐस काही । वर्ण व्यक्त नाही शब्द शुन्य मज रूप नाही नाव सांगु काई । झाला बाई काही बोलु नये, निर्गुणाचे भेटी आलो, सगुणासंगे । तव झालो प्रसंगी गुणातील इत्यादी वचनातुन गोरोबांची आत्मप्रतीची लक्षात येण्यासारखी आहे.

गोरा कुंभार – संतकवी पंढरपुरच्या विठ्ठलाचे भक्त संत मंडळीत वयाने सर्वाहुन वडील हे पंढरपुराहुन ५०–६० मैल दुरू असलेल्या तेरढोली या गावी राहत यांना संत आणि रामी अशा दोन बायका होत्या. गृहस्थाश्रमी असले तरी वृत्तीने ते विरक्त राहिले याचा आध्यत्मिक अधिकारी मोठा होता. नामदेव परमार्थाने कच्चे की पक्के हे ठरविताना गोरोबा काकांचाच शब्दप्रमाण मानला गेला, यांची समाधी तेरढोकीस आहे.

गोरोबांची उपलब्ध काव्यरचना अगदीच अल्प आहे त्यांचे २० अभंग सकलसंतगथेत

आवटे यांनी छापले आहेत. काही पद्यरचना समर्थ वागदेवता मंदिर धुळे येथील झांजतुन सापडले गोरोबांना अद्वैता साक्षात्कार सहजतेने धडे, हा जो त्यांना पारमार्थिक परमालाभ झाला होता. त्याचे स्वानुभवपुर्ण वर्णन ते आपल्या अभंगातुन घडवितात.

उदा. – निर्गुनांचे भेटी आलो नये । या साक्षात्कारानुभुतीचे वर्णन त्यांनी नामदेवाजवळ एका अभंगरूपाने केले आहे ते म्हणतात. अंतरीचे गुज बोलु ऐसे काही । वर्ण व्यक्त नाही. शब्द शुन्य । जय जय झनकुट जयजय बनकुट । अनुहात जंगर नाद गर्जे ।। परतल्या श्रुनी म्हणती नेती नेती त्याही नादा अंती स्थिर आहे ।।

म्हणे गोरा कुंभार सत्रावीचे नीर । सेवी निरंतर नामदेवा विदेह मुक्तास्थिती ती हीच. तिच्या मध्ये परमेश्वराची प्रचिती येते. वरील अभंगातील अनुहात नाद व सतावीचे नीर या योगाविषयक खुणा लक्षणीय आहेत.

गोरोबाच्या काव्यात विषयांचे किंवा भाव भावनांचे वैविध्य फारसे नाही, अदैत साक्षात काराची अनुभूतीच केवळ त्यांच्या अभंगातुन प्रगट झाली आहे. त्यामुळे या अभंगातील आशय थोडा दुर्बोध होतो. पण ज्ञानेश्वरांनी प्रतिपादलेल्या ज्ञानोत्तर भक्तीचा मार्गच गोरोबांनी स्वीकारलेला असल्याने त्यांच्या अभंगावरील हे अध्यात्माचे आवरण किंचित दुर केल्यानंतर त्याच्या काव्याचे खरे दर्शन घडते

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

## ✻ संत मुक्ताबाई ✻

**धवळी पवार**, T.Y.B.A.

(१२७७ किंवा १२७९–१२९७)

ज्ञानेश्वरांची धाकटी बहीण आणि मराठी संत कवयित्री. आईचे नाव रूक्मिणी विठ्ठलपंत कुलकर्णी आणि वडिलांचे नाव विठ्ठलपंत कुलकर्णी आहे.

ज्ञानदेवादी चारी भावडांच्या जन्मकाळा संबंधी मतैक्य नाही. मुक्ताबाईचा जन्म एका मतानुसार १२७७, तर दुसऱ्या मतानुसार १२७९ ठरतो. पहिल्या मतानुसार तिला एकूण वीस वर्षांचे आयुष्य लाभले होते व दुसऱ्या मतानुसार मृत्युकाळी ती अठरा वर्षांची होती. मुक्ताबाई हिचा जन्म इंद्रायणी तिरी वसलेल्या आळंदीच्या गावाजवळ अश्विन शुद्ध प्रतिपदा शुक्रवार शके १२०१ म्हणजेच इ. स. १२७९ मध्ये आई वडिलांचे मूळगाव औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील आहे.

निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई या भावडांना पोरवयातच त्यांच्या स्वजातीयांनी संन्याशी म्हणून वाळीत टाकुन त्यांची विटंबना केली, पण हे सारे भोग सोसत ह्या चारही भावंडांनी ब्रह्मविद्येची अखंड उपासना केली. आपल्यानंतर आपली मुले तरी सुरळीत राहतील अशा आशेने विठ्ठलपंत व रूक्मिणी यांनी निर्दयी समाजाने दिलेल्या देहांत प्रायश्चित शिरसावंदय मान्य करून त्रिवेणी संगमात देहविसर्जन केले.

मात्र देहत्यागानंतर या अनन्य साधारण कुटूंबाच्या गृहिणीपदाची पाळी मुक्ताबाईवर पडली. ती तितक्याच समर्थपणे तिने उचलली आणि खेळण्या – बागडण्याच्या बालवयातच मुक्ताई प्रौढ गंभीर, सोशिक समंजदार, निरागस वयात जीवनाच्या वास्तव सत्याकडे आणि कठोर स्वरूप पाहण्याचे प्रगल्भ प्रौढत्व तिच्यात आलेले होते.

मुक्ताबाईंनी आपल्यापेक्षा मोठ्या भावडांना मायेची पाखर दिली. सावरले व प्रसंगी जागरूक करण्यासाठी आत्मीयतेने फटकारले देखील संतांनी एकमुखाने, मुक्ताबाईचा, ज्ञानाधिकार मान्य केला. मुक्ताबाईचे गुरू म्हणजे तिचेच मोठे बंधु संत निवृत्तीनाथ ज्यांना मुक्ताबाईने दिला ते म्हणजे विसोबा खेचर आणि हटयोगी चांगदेव हे होते. मुक्ताबाई त्यांच्या समकालीन समाजाचे उग्र कठोर वास्तव अनुभवले आणि ते जीवन संघर्षाकडे पाठही फिरविली. त्यांच्या वाणीत सांसारिक सुख दुःख पीडांचा प्रतिसाद नाही. सारे जीवनच संत मंडळीतील श्रेष्ठांना देखील आपल्या आध्यात बळावर स्पष्टोक्तीच्या सुरात जागविले आहे. आई वडिलांचे देहान्त प्रायश्चितांमुळे मोठ्या भावंडांची प्रपंचाची जबाबदारी तिच्यावर येऊन पडली. तरीसुद्धा न डगमगता न घाबरता तिने ती हसत मुखाने पार पाडली. तीनही भावंडांची माया तिच्यावर होतीच. मुळ माया आदीशक्तीच असल्यामुळे छोटा सोपान सांभाळीत तिने प्रपंचही नेटकेपणाने सांभाळला निवृत्ती – ज्ञानेश्वरांनी मागुन आणलेली माधुकरी ही चारही भावंडे खात.

✻ अभंग रचना –

मुक्ताबाईच्या नावावर हरिपाठाचे धरून अवघे ४२ अभंग मिळतात. संख्येने मुक्ताबाईची अभंगरचना जरी थोडी असली तरी काव्यगुणांनी ती समृद्ध आहे. या सर्वच अभंगातुन जाणवणारे मुक्ताबाईच्या प्रतिभेने घेतलेले पारमार्थिकाचे उड्डाण वाचकांना स्तिमित करून सोडते यात शंका नाही.

त्यातुन मुख्यतः भक्ती दिसली तरी योगमार्गाच्या खुणाही आढळतात. पंढरी महात्म्य, नाम महात्म्य, संतसमागम या विषयावर तिची अंभगरचना आहे.

'नाममंत्रे हरि निजदास पावे ।
ऐकोणी घ्यावे झडकरी ।'

असा ती नामाचा महिमा सांगते. सगुण आणि निर्गुण या कल्पनांच्या पलिकडे जाण्याचे सामर्थ्य मुक्ताबाईंच्या ठिकाणी आहे. म्हणून

'निर्गुणाची सेज । सगुणाची बाज ।
येथे के शिराज । पहुडले ।।'

अशी कल्पना ती करू शकते.

✻ योग मार्गाचे अभंग –

योगमार्गाचा अनुभव सांगणारे काही कुट अभंगही तिने लिहिले आहेत.

मुंगी उडाली आकाशी । तिने गिळीले सुर्याशी
थोर नवलाव झाला । वांझे पुत्र प्रसविले ।
विंचु पाताळाशी जाय । शेष माया वंदी पाय

माशी व्याली घार झाली । देखोन मुक्ताई हासली।

हा मुक्ताईचा अभंग तिच्या कुट रचनेचे चांगले उदाहरण आहे.

मुक्ताईच्या काही ओव्यांतुन योगमार्गाचेही दर्शन होते. डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे तिचे हे अभंग म्हणजे एक 'अध्यात्मिक अंगाईगीतच' आहे.

''पहिली माझी ओवी ।
परतुनी पाहिले ।
दृष्टीने देखिले ।
निजरूपी।।''

या मुक्ताईच्या ओव्यातुन योगमार्गच दिसतो. मुक्ताईच्या काव्यात तिच्या जीवनाचे व प्रतिभेचे अनेक पैलु उठुन दिसतात. अंधपणामुळे वाया जात असलेल्या या मुक्ताईला निवृत्तीराजाने सावध केले व त्यामुळे ''मुक्तपणे मुक्त मुक्ताई पैरत । हरिनाम स्मरत सर्वकाळ'' अशी तिची अवस्था होती. तिच्या अभंगात योगाच्या खुणा आहेत. अधात्माची उंची आहे. साक्षात्काराचे पडसाद आहेत हे सर्व खरे, पण आपल्या दृष्टीने त्यातील हृदयाची हळुवारता व भावनेची मार्दवता मनास मोहुन टाकणारी आहे. तसे पाहिल्यास तिचा स्वभाव सोपानदेवा प्रमाणेच थोडा परखडच दिसतो. चांगदेव इतकी वर्षे जगुनही 'कोरा तो कोराच' हा प्रसिद्ध अभिप्राय तिच्याच तोंडचा आहे. आपल्या सगुण भक्तिचा अहंकार बरोबर घेऊन तो नामदेव ज्ञानदेवादिकांच्या भेटीस आळंदीस आला तेव्हा.

''अखंड जयाला देवाचा शेजार
काय अहंकार गेला नाही ।।''

ही स्पष्टोक्ती तिच्याच तोंडुन निघालेली आहे. पण तिच्या या स्पष्टोक्तेपणाने एका ठिकाणी थोडे निराळे वळण घेतले आहे.

✻ ताटीचे अभंग –

एकमेकांना धरून राहताना माधुकरी मागायला गेल्यावर लोकांचे कडु बोल ऐकूण एका दिवशी समाजावर रागावलेले ज्ञानेश्वर झोपडीचे दार बंद करून बसतात. त्यावेळी परकारातली मुक्ताबाई मोठी होऊन ज्ञानी भावाला ''ताटीचे अभंग'' म्हणून व्यवहारज्ञानाचा उपदेश करते. त्यांना समाजाकडे डोळे उघडे ठेवुन पाहण्याची विनंती करते. तिचा हा लडिवाळपणा पाहुन ज्ञानेश्वर आपला समाजावरचा राग, संताप, चीड विसरतात आणि ताटीच्या बाहेर येतात.

''योगी पावन मनाचा ।
अपराध जनाचा
विश्वरागे झाले वन्ही ।
संत सुखे व्हावे पाणी ।।''

अशी परोपरीने समजुत घालुन मुक्ताईने आपल्या अकरा अभंगातुन ज्ञानेश्वरांना हळुवारपणाने विनंती केली आहे. ज्ञानी भावाचा रूसवा काढण्यासाठी त्याला पुरूषार्थाचा खजिना उलगडून दाखवितांना त्या म्हणतात.

''संत जेणे व्हावे ।
जग बोलणे सोसावे

तरीच अंगी थोरपणा ।
जयानाही अभियान ।
थोरपणे जेथे वसे ।
तेथे भुतदया असे ।''

असा उपदेश करण्याचा अधिकार वयाने लहान असलेल्या मुक्ताईचाच हा उपदेश सामान्य, लौकिक पातळीवरच न वावरता अध्यात्मिक उंची गाठतो कारण 'ताटी' हे केवळ झोपडीचे दार नाही तर, आत्मसाक्षात्काराच्या मार्गामधील ती विशिष्ट स्थितीच आहे. जणु मुक्ताबाईच्या कौटुबिक अधिकाराप्रमाणेच आधात्मिक अधिकारही प्राप्त झालेला, ज्ञानाधिकारही मिळालेला दिसतो.

✲ मुक्ताबाईने नामदेवांचे कानउघडणी केलेले अभंग –

'मुक्ताई चिंतेने मुक्त जाली' किंवा मुक्ताईचे चित्त निरंतर मुक्त' यासारखे आत्मप्रत्ययाचे उद्‍गार त्यांच्या अभंगामधुन उत्कटपणे दिसुन येतात. संत मंडळीमधील वयाने ज्येष्ठ असणाऱ्या नामदेवांची मुक्ताबाई फटकळपणाने कानउघडणी करते. परखडपणे सवाल करून विचारण्यामधुनच मुक्ताबाईमधील स्पष्टवक्ती स्त्री आणि तिखट वाणीची धारही लक्षात येते.

''झालीसी हरिभक्त तरी आम्हा काय ।
आतुली ती सोय न ठाऊकी ।''

नामदेवाप्रमाणेच तापी नदीच्या काठावर चांगदेव योगी राहात होते, अशा हटयोग्यास श्री ज्ञानेश्वर मुक्ताबाईंकडून गुरूपदेश घेण्याची सूचना करतात. 'मुक्ताबाईंने चांगा घेतलासे पोटा' याच्या योगाने तिच्या अंतः करणाचे मार्दवही दिसून येते.

✲ 'आत्मबोध' अभंग –

मुक्ताबाईंच्या अभंगविश्वाची वाटचाल ज्ञानेश्वरांच्या अभंगामधुन जाणारी आहे. ज्या कुटुंबात मुक्ताबाई लहानची मोठी होते, त्यांचे स्वरूपच अनन्यसाधारण आहे. जरी अविवाहीत बहीण भावंडाचे कुटुंब असले तरी कुटुंबातील एकमेव स्त्री म्हणून विशेष जबाबदारी पडुन अकालीच समजस आणि प्रौढ बनलेली स्त्री मनही दिसते. बंधुभावापेक्षा अध्यात्मज्ञानाचे निगडीत झालेली मने असल्यामुळे मुक्ताबाईच्या कवितेचा, 'आत्मबोध' हा प्रमुख विषय आहे. त्यात विविध कल्पनांची भरारीही दिसून येते.

''मुंगी उडाली आकाशी ।
तिने गिळीले सुर्यासी ।
थोर नवलाव झाला ।
वांझे पुत्र प्रसवला ।।
विंचु पाताळासी जाय ।
शेष वंदी त्याचे पाय ।
माशी व्याली धारझी ।
देखोनि मुक्ताई हसली ।।''

अशा प्रकारची कुटरचनाही केलेली आढळून येते. त्यांच्या अभंगावर निवृत्ती, ज्ञानदेवांची छाप पडली आहे. त्यांना कर्तेपणाचा डौलही प्राप्त झालेला आहे.

✻ हरिनामाची गोडीचे अभंग –

हरिनामाची गोडी त्यांच्या अभंगातून दिसते.

'' नाम मंत्र आम्हा हरी रामकृष्ण
दिननिशी प्रश्न मुक्ति मार्ग ।।
एक – तत्व धरी हरिनाम गोड ।
येर ते काबाड विषय ओढी ।''

या सर्वच कार्यामधुन, काव्यामधुन 'अवघाचि संसार केला आम्ही गोड' अशीच भावना दिसून येते. त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेची प्रखरता, विचारांची भव्यता आणि उत्तुंग कल्पनेची दिव्यताही अनुभवायला मिळते. स्वभावत:च विरक्त आणि मुक्त असणाऱ्या मुक्ताबाईचे काव्य म्हणजे अलौकिक आनंदाचा सहजमधुर शब्दाविष्कारच आहे. स्त्रीत्वाचे मार्दव, कोमलता त्यात आहे.

✻ हिंदी पदे –

मुक्ताबाईंनी मराठी अभंग रचनेबरोबरच काही हिंदी पदेही रचले. दाजी ओंक यांनी मुक्ताबाईचे एक हिंदी पद संकलित केले आहे ते असे –

वाहवा साहेबजी । सदुरूलाल गुसाईजी
लाल बीज मो उदीला काला, औढ पिठसो निला।
पीत उन्मनी भ्रमर गुंफा रस झुला बाला ।
सहस्त्र दल मो अलख लिखाये, आज लौपर माना ।
जहां तहा साधु, दसवा आप ठिकाना ।
सद्‌गुरू चेले दोनो बराबर, येक देश मो भाई ।
एकसे ऐसे दरसन पायो महाराज मुक्ताई ।

ज्ञानदेवांनी आणि सोपानदेवांनी एका मागोमाग एक अशा समाध्या घेतल्या तेव्हा निवृत्तीनाथ आणि मुक्ताई व्यथा – व्याकुळ झाले. मुक्ताई अबोल व उदासी बनली. दु:खी कष्टी अवस्थेत मुक्ताबाई महाराष्ट्रातील तापी तीरावर मेहुण येथे आल्या. वैशाख वद्य दशमी शके १२१९ या दिवशी मुक्ताबाई वैकुंठवासी झाल्या. संत नामदेव महाराजांनी समाधीचे हृदय वर्णन केले आहे.

कडाडली वीज निरंजनी जेव्हा ।
मुक्ताबाई तेव्हा गुप्त झाली ।
वैकुंठी लक्ष घंटा वाजती एक घाई ।
झाली मुक्ताबाई स्वरूपाकार ।
एक प्रहर झाला प्रकाश त्रिभुवनी ।
जेव्हा निरंजनी गुप्त झाली ।
गेले निवारूनी आकाश आभुट ।
नामा म्हणे कोठे मुक्ताबाई ।

ज्ञानदेव – भगिनी मुक्ताबाईचे मराठी संत मंडळातील स्थान अनंत सर्व प्रकारच्या प्रतिकुलतेला प्रतिकार करण्याचा ज्ञानदेवादी भावंडातील मुक्ताबाई यांचा आध्यात्मिक अनुभव थोर होता.

ज्ञानेश्वरवादी भावंडातील स्वाभिमान, प्रतिकार यांचे सजीव रूप मुक्ताबाई होय.

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

## ❊ संत सावता माळी ❊

**मालती बागुल**, F.Y.B.A.

ज्ञानदेव-नामदेव यांचा समकालीन असणारा सावता माळी हा मुळचा पंढरपुरजवळील अरणभेंडी या गावाचा शके ११७२ ते १२१७ (इ. स. १२५० ते १२९५) हा त्याचा काळ त्यांच्या वडिलांचे नाव परसुळा तर आईचे नांव नागिताबाई. शेतीवर उदरनिर्वाह करणारे हे दांपत्य धार्मिक गोष्टीकडे ओढा असणारे होते; पोटासाठी शेतात कामधंदा करीत असतांनाच जेव्हा मोकळा वेळ मिळेल तेव्हा हरि भजन करणे ही त्यांची वृत्ती होती परोपकारी, स्वभाव, अध्यात्मिक वृत्ती भगवद्भक्ती ही या कुटुंबाची खासियत होती. गावात सर्वांना त्यांच्या विषयी आदर आपुलकी आणि जिव्हाळा वाटत होता. गावातील सर्व लहानथोरांशी ते प्रेमळपणाने वागत होते. अशा वातावरणात सावता वाढला भगवद्भक्तीची परंपरा असलेल्या घरात जन्म झाल्यामुळे लहानपणा पासून त्याचाही ओढा अध्यात्मिक गोष्टीकडे असणे स्वाभाविकच होते.

वयात येताच जनाबाई भावनशी या मुलीशी त्यांचा विवाह झाला पण प्रपंचापेक्षा दोघाचेही मन परमार्थातच होते. देहभान विसरून पांडुरंगाच्या नामस्मरणात बुडून जाणे, आले गेलेल्यांच्याकडे दुर्लक्ष होणे. या गोष्टी त्याच्या दैनंदिन जीवनात सतत घडत असत. याचे एक धार्मिक उदाहरण त्यांच्या चरित्रात आढळते. एकदा सावता भजनात अगदी तल्लीन होऊन गेला होता. त्याच वेळी त्याच्या सासरची मंडळी घरी आली पाहुने घरात येऊन बसले. तरी सावताचे लक्ष त्यांच्याकडे गेले नाही. आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करावे विचारपुस करावी याचे भान त्याला राहिले नाही. आपल्या माहेरच्या पाहुण्यांची झालेली ही उपेक्षा सावत्याच्या पत्नीला जिव्हारी लागली. पतीचे वर्तन तिला मनोमनी खटले. स्वाभाविकच जनाबाई पतीवर रागावली तेव्हा पत्नीची समजुत काढण्यासाठी त्याने उपदेशपर अभंग लिहिला आहे तो अतिशय महत्वाचा आहे. सावता माळीच्या अतुट भक्तीची आणि मानसिकतेची यावरून पुरेपुर प्रचिती येते, तो लिहितो.

प्रपंची असुनि परमार्थ साधावा ।
वाचे आठवावा पांडुरंग ।।
उच्च नीच काही न पाहे सर्वथा ।
पुराणीच्या कथा पुराणीचा ।।
घटका आणि पळसाधी उतावीळ ।
बा उगातो काळ जाऊनेदी ।।
सावता म्हणे कांते जपे नामावली ।
ह्रदय कमळी पांडुरंगी।।

पंढरीच्या विठ्ठलावर सावता माळ्याची निस्सीम भक्ती होती. पांडूरंगाच्या स्मरणात तो

प्रत्येक दिवस घालवायचा; त्याच्या मनात विठ्ठलाचे रूप कसे सामावलेले होते. या दृष्टीने त्यांचा पुढील अभंग पाहण्यासारखा आहे.

विठ्ठलाचे रूप अतर्क्य विशाल ।
हृदयकमळ मंत्रसिद्ध ।।१।।
दिगंबर मुर्ती गोजरी सावळी ।
तोडे पाया वाळी मनगटी ।।२।।
कटीवर हात, हाती पध्य शंख ।
पुष्पकळी मोख अंगुलीत ।।३।।
सावता माळी म्हणे शब्दब्रह्मसाचे ।
नामेविठ्ठलाचे कलियुगी ।।४।।
व्यवसाय हाच विठ्ठल ।

आपल्या व्यवसायातच विठ्ठल पाहण्याची वृत्ती बऱ्याच मराठी संताच्या ठिकाणी आढळते. सेना न्हावी, नरहरी सोनार, गोरा कुंभार किंवा सावता माळी यांनी या दृष्टीने केलेली रचना पाहिल्यास याची प्रचिती येते. ''आम्ही वारीक – वारीक । करू हजामत बारीक ।। असे सेना न्हावी म्हणतो.

संत सावता महाराज म्हणजे, तत्कालीन संत मंडळातील एक प्रगल्भ आणि प्रतिभावंत व्यक्तिमत्व होते. आयुष्यभर ते विठ्ठलाच्या भक्तीत रमुन गेले विठ्ठलाची उपासना म्हणजे उत्कट भक्तीची जोपासना ही इतरांप्रमाणेच त्यांचीही धारणा होती.

आपल्या कर्तव्यकर्मावर निष्ठा ठेवणारे आणि संबंध व्यवसायच हरिरूप मानणारे एक थोर संत प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म शके १९७२ मध्ये झाला. आपल्या बागेचे वा मळ्याचे कामे हे श्रीहरीच्या सेवा बुद्धीने करीत असत. ''कांदा मुळा भाजी । अवघी विठाई माझी ।। अशी त्यांची निष्ठा होती. जात कोण तीही असो एकनिष्ठतेने श्रीहरीला भजल्यावर कोणताही दोष उरत नाही. हे सावता माळी यांच्या उदाहरणा वरून पटते. 'स्नान नाही संध्या नाही । जातीकुळ संबंध नाही ।। तरी श्रीहरीस आपण सतत हृदयात बाळगले असल्याचा उचित असा अभिमान यांनी प्रकट केलेला आहे.

नामस्मरणाच्या जोरावर कळिकाळाच्या मस्तकांवर सोट्या मारण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. भक्ताच्या मार्गात साऱ्या मुक्ती लोळण घेत येतील असा यांचा विश्वास होता. वैकुंठीचा देव आणुया कीर्तनी विठ्ठल गाऊन नाचो रंगी ।। सुखाचा सोहळा करूनी दिवाळी । प्रेमे वनमाळी चित्ती धरू ।। असे त्यांच्या सगुण भक्तीचे रूप होते. आपली जाती भिन्न असल्यामुळे आपल्यात आंधुता वाढली नाही, याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. समयासी सादर व्हावे । देव ठेवीले तैसे रहावे ।। असा एक मोठा व्यावहारिक उपदेशाचा अभंग त्यांनी लिहिलेला आहे. 'का गा रूसलासी कृपाळु बा करी । तुजविण दुसरी भक्ती नेणे ।। असा एक गोड अभंग त्यांनी

नामदेवाच्या करूनेस शोभेल अशा पद्धतीने प्रकट केला आहे. दीन रंक पापी दीन माझी मती । सांभाळ श्रीपती अनाथनाथा ।। असा सामाजिक पुकारही सावतामाळी त्यांच्या अभंगातुन दृष्टीस पडतो. आपल्या हीन यातीबद्दल परमेश्वराने क्षमा करून आपल्यावर कृपा करावी असे सांगतांना सावतामाळी एका अभंगात म्हणतात 'भली केली हीन याती । नाही वाढली महंती ।। जरी असतां ब्राह्मण जन्मातरी हे अंगी लागते कर्मा ।। स्नान नाही संध्या नाही । याती–कुळ संबंध नाही ।। सावता म्हणे हिन याती । कृपा करावी श्रीपती ।। गोरा कुंभार काय किंवा सावता माळी काय यांच्या आयुष्यातील चमत्कारापेक्षा त्यांच्या अभंगातुन प्रकट होणारी सामाजिक जाणीव आणि भक्तीची तीव्रता यांचेच मोल अधिक मानावे लागेल. याच श्रेष्ठ आधारावर सावता माळी कधी–कधी नामदेवाप्रमाणे परमेश्वरावर रागावतही.

नको तुझे ज्ञान नको तुझा मान ।
माझे आहे मन वेगळेचि ।।
नको तुझी मुक्ती नको तुझी भक्ती ।
मज आहे विश्रांती वेगळीच ।।

कोणती ही विश्रांती ? त्यांनीच म्हटले आहे

चरणी ठेऊनि माथा विनवितसे सावता ।
ऐका पंढरीनाथा विज्ञापना ।।

सावतामाळ्याचे दोन महत्वाचे अभंग येथे देण्यासारखे आहेत.

१) नामाचिया बळें न भिऊ सर्वथा ।
कळिकाळाच्या माथा सोटे मारू ।।१।।
वैकुंठाचा देव आणु, या किर्तनी ।
विठ्ठल गाऊनि नाचे रंगी ।।२।।
सुखाचा सोहळा करून दिवाळी
प्रेमे वनमाळी चित्ती धरू ।।३।।
सावता म्हणे ऐसा भक्तीमार्ग धरा ।
तेणे मुक्ती हारा वोळंगती ।।४।।

२) आमुची माळियाची जात ।
शेत लावु बागाईत ।।
आम्हा हाती मोट नाडा ।
पाणी जाते फुलझाड ।।
शांती शेवंती फुलली ।
प्रेम जाईजुई व्याली ।।
सावताने केला मळा ।
विठ्ठल देखियेला डोळा ।।

हरिस्मरणात स्वत:ला पूर्णपणे हरवुन बसणारा हा संत त्याने आपल्या व्यवसायातच विठ्ठल पाहिला आणि सारे जीवन विठ्ठलमय करून टाकले. सकल संतगाथेमध्ये त्यांचे बरेच अभंग उपलब्ध आहेत 'सावता सागर प्रेमाचा आग' असे नामदेवांनी त्यांचे वर्णन केलेले आहे. 'आमुची माळ्याची जात । शेत लावु बागाईत ।। आम्हा हाती मोट नाडा । पाणी जाते फुलझाडा ।। असे आपल्या याती विषयी समाधान व्यक्त

करून त्यांनी भक्तीचे फुलझाड फुलवले. 'कष्ट करिता जन्म गेला । तुझा विसर पडिला' अशी आपल्या मनातील रूखरूख विठ्ठलाजवळ व्यक्त करून माळी सावता मागे संतान । देवा करी गा नि:संतान ही प्रार्थना हे करतात, 'मागणे ते आम्हा नाही हो कोणासी । आठवावे संतासी हेची खरे । पुर्ण भक्त आम्हा ते भक्ती दाविती । घडावी संगती तयशीच' या अभंगातुन त्यांनी संतसहवासाची अपेक्षा केली आहे, तर 'नामाचिये बळे न भिऊ सर्वथा । कळिकाळाच्या सांगतात. आपला सारा व्यवसाय विठ्ठलमय झाल्याचा त्याचा आनंद

कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।।
लसुण मिरची कोथंबिरी ।
अवघा झाला माझा हरी ।।
मोट नाडा विहिर दोरी ।
अवघी व्यापिली पंढरी ।।
सावता म्हणे केला मळा ।
विठ्ठलपायी गोविला गळा ।।

या अभंगातुन व्यक्त झाला आहे, हीन यातीत जन्माला आल्याचा वाटण्याएवजी सावतांना आनंदच वाटतो. हे त्यांच्या मनाच्या मोठेपणाचे जसे लक्षण आहे तसे तत्कालीन सामाजिक, धार्मिक स्थितीतील विषमतेचे बोलके उदाहरण आहे. सावता बुवा म्हणतात.

भली केली हीन याती ।
नाही वाढली महंती ।।
जरी असता ब्राह्मण जन्म ।
तरी हे अंगी लागते कर्म ।।
स्नान नाही संध्या नाही ।
याती कुळ संबंध नाही ।।
सावता म्हणे हीन याती ।
कृपा करावी श्रीपती ।।

अत्यंत साधी प्रेमळ वाणी या उत्कृष्ट भावनावेग ही त्यांच्या अभंगाची वैशिष्ट्ये होत.

✻ कर्मकाण्डाला ठाम विरोध –

जरी सावता मंडळीच्या जीवनातील काही चमत्कारांच्या उल्लेख येत असला तरी त्याच्या विचारातील दुसरी बाजु ही तितक्याच उत्कर्षाने प्रकट झालेली आहे. विठ्ठलाच्या भक्तीसाठी कर्मकाण्डची गरज नाही हे पटवुन देतांना ते म्हणतात.

''साधनाची आटाआटी ।
कायसा पाठी लावित ।।१।।
एक तुमचे नामाचि पुरे ।
हेचि पुरे समाधान ।।२।।

यावरून विठ्ठलाच्या भक्तीसाठी कोणत्याही साधनसामग्रीची गरज नसुन केवळ नामस्मरण पुरेसे आहे असे तो स्पष्ट शब्दात बजावतो यातुन पोथ्या – पुराणातुन आणि मंत्रतंत्राची निरर्थकताही प्रकट होते, पुराणीच्या कथा पुराणीच असे म्हणतान्हाही त्यांची हीच भुमिका

लक्ष्यात येते. जप-तप करत बसण्यापेक्षा विठ्ठलाचे नामस्मरण करणे, फक्त पुरेसे आहे. हे सांगतांना आपल्या अभंगात ते सांगतात.

जप-तप क्रिया धर्म साधना ।
वावुगे बंधन उपाधिचे ।।१।।
जेणे काय घडे समाधान सर्वथा ।
वावुगाची झीज, व्यथा होत आहे ।।२।।
सावता म्हणे सारं कंठी धरा नाम ।
नको दुजा नेम वावुगाची ।।३।।

अंधश्रद्धेवर अशा प्रकारे प्रहार करणारा सावता माळी समतेचा आणि मानवतेचा विचार आपल्या अभंगातुन प्रकट करतांना आढळतो.

* * * * * * * * * * * *

## * वेळ *

**मालती बागुल**, F.Y.B.A.

वेळ फार हळू येते,
जेव्हा आपण तिची उत्कंठेणे,
वाट पाहत असतो.
वेळ खुप लवकर येते,
जेव्हा आपल्याला उशीर होतो.
वेळ खुप कमी असतो,
जेव्हा आपण खुप आनंदी असतो.
वेळ जाता-जात नाही,
जेव्हा आपल्याला वेदना होतात.
प्रत्येक वेळी आपल्या येत,
नाही सोयीप्रमाणे
म्हणून रहा कायम आनंदाने

## * संत जगमित्र नागा जोगा *

**पुजा मोरे**, F.Y.B.A.

नामदेवांशी समकालीन समजल्या गेलेल्या अशा आणखी काही संतांची आपणास भेट घ्यावयाची आहे. योग्यता मोठी, पण उपलब्ध माहिती थिटी आणि परिचित कर्तृत्वाची झेपही छोटी, यामुळे ही भेट अर्थातच धावती राहणार आहे. यातली पहिली भेट 'जगमित्र नागा' यांची हे परळी वैजनाथचे रहिवासी ब्राह्मण यांचे गुरू नागस्वामी गुरूबद्दल आदर दाखविण्यासाठी आपल्या नावापुढे नागा हे पद त्यांनी जोडलले यांचा उदरनिर्वाह भिक्षेवर चाले, एकदा काही दृष्ट लोकांनी या जगमित्राचेही घर जाळले. ईश्वराने जगमित्रांचे व त्यांच्या घरातल्या माणसांचे या आगीत रक्षण केले. वरचे खोपटे जळाले. हा ईश्वरी कृपेचा आपला अनुभव जगमित्रांनी एका अभंगांत नोंदलेला आहे. ''अग्नी जाळे तरी न जळे प्रल्हादु । हृदयी गोविंदु म्हणोनिया ।। अग्नी जाळी तरी न जळती गोपाळू । हृदयी सीतावर म्हणो निया ।। जगमित्रासंबंधी आणखीही एक हकीकत सांगितली जाते. ती अशी की हे प्रतिष्ठानचे राहणारे द्रव्याचा व्यवसाय करणारे. कालांतराने यांचे ग्रह फिरले इतके की यांच्या हाती भिक्षापात्र आले. संसाराचा असा कटू

अनुभव आल्यानंतर ते भक्तिमार्गाकडे वळले महाराष्ट्र सारस्वतकारांनी जगमित्रासंबंधी तिसरेच मत मांडलेले आहे. ते म्हणतात की,

जगमित्र किंवा जगमैत्र हे उपनाव असुन या जगमैत्रांकडे मुठे खोऱ्यातील मौजे पिंरगुट येथील कुलकर्णी पद होते व अनेक शतके हे जगमित्रांचे कुटुंब महाराष्ट्रात नांदत होते, ही गोष्ट लक्षात आणखी म्हणजे या कवीचे नाव नागेश व उपनाव जगमैत्र असावे असे वाटते. ''पौराणिक दृष्टान्त देऊन ईश्वरविषयक सिद्धान्त मांडण्याच्या जगमित्रांच्या हातोटीचा केलेला गौरव यथार्थ आहे. पाहा ''कृष्ण लोणी खाया गेला । येऊनि गोपीने धरिला ।। मायापाशी घेऊनि आली । तेथे कृष्णा पाहती जाली ।। येथे कृष्णा तेथे कृष्ण ।। जिकडे तिकडे अवघा कृष्ण ।। ऐसे आश्चर्य गे माये । जगमित्र नागा पाहुनि धाये ।। इतर संतांप्रमाणे जगमित्रा चाले ।। भक्ती देवाची करावी । भेदद्रष्टी हे सोडावी ।। ''असा संदेश आहे.

* * * * * * * * * * * *

## * संत तुकाराम *

**भारती भोये**, F.Y.B.A.

तुकारामांचा जीवनपरिचय –

तुकाराम हे एकनाथांच्या नंतरचे भागवत संप्रदायातले श्रेष्ठ असे संतकवी सतराव्या शतकात रामदासांच्या आणि शिवाजीराजांच्या काळातच ते होऊन गेले. त्यांचा जन्म आणि मृत्यु त्यांच्या निश्चित वर्षांबद्दल अभ्यासकांमध्ये मतभेद असले तरी सर्वासाधारणपणे इ. स. १६०६ ते १६४९ असा त्यांचा जीवनकाळ मानला जातो.

त्यांचा जन्म देहु गावी झाला. वाणसामानाचा त्यांचा व्यवसाय होता. त्यांचे वडील वोल्होबा आणि आई कनकाई. त्यांना सावजी नावाचा एक मोठा भाऊही होता. त्यांचे घर वारकऱ्याचे होते. वडील धार्मिक वृत्तीचे आणि भाऊ अतिशय विरक्त ! व्यवसायाची जबाबदारी तुकारामांवर होती. त्यांचाही संसार होता. पत्नी होती. मुले होती, तुकारामांची दोन लग्न झाली. पहिले लग्न तेराव्या वर्षी आणि दुसरे लग्न सतराव्या वर्षी झाले.

मात्र प्रपंचाचे सुख तुकारामांना फारसे लाभले नाही. त्यांचे वडील मरण पावले पाठोपाठ आईचे निधन झाले. धंदाही फारसा चालेनासा झाला इ.स. १६२९–३० मध्ये महाराष्ट्रात फार मोठा दुष्काळ पडला. तुकारामांच्या व्यवसायाला

आणि प्रपंचाला फार मोठा फटका बसला. त्यांचा मोठा भाऊ सावजी याची पत्नी स्वर्गवासी झाली. सावजी संसारातुन उठून पुर्ण विरक्त झाला. तुकारामांची पहिली पत्नी मरण पावली. मुलगा मरण पावला, गुरेढोरे विकावी लागली. अन्नान्नदशा आली.

भयंकर हलाखीच्या आणि उपासमारीच्या अवस्थेत तुकारामांना दु:ख सहन होईना. त्यांचे मन त्या दु:खाने हळुहळु संसारापासुन दुर जाऊ लागले. त्यांना ईश्वरभक्तीची गोडी लागली. व्यवसाय आणि संसार यांच्यापासून त्यांचे मन पूर्ण उडाले. कर्जदारांचे दारात धरणे आणि पत्नीचे त्यांना पुन्हा-पुन्हा संसारात ओढणे या दोन्ही गोष्टींचा परिणाम त्यांच्यावर होईना.

देहुजवळच्या भंडाऱ्याच्या डोंगरावर ते एकटेच विठ्ठलनाम घेत राहत. त्यांनी ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ यांचे अभंग आळवले. ग्रंथ अभ्यासले. भजन-किर्तनाला प्रारंभ केला. असे म्हणतात की, स्वप्नामध्ये त्यांना बाबाजी चैतन्य नावाच्या साधुपरूषाने गुरूमंत्र दिला. नामदेवांनी त्यांना स्वप्नात येऊन अभंग करण्याची स्फुर्ती दिली. तुकारामांनी स्वत:च अभंगामध्ये याची नोंद केली आहे.

तुकाराम हे देहुचे वाणी राहिले नाहीत. हळुहळु ते संतपदाला पोहोचले. त्यांचा परामार्थातला अधिकार वाढला अनेक शिष्य मिळाले. त्यामध्ये ब्राह्मण होते. शुद्र होते आणि बहिणाबाईंसारख्या स्त्रियाही होत्या.

तुकारामांना देहू गावी सनातन वर्गाकडून प्रथम त्रास सोसावा लागला. त्यांच्या अभंगाच्या वह्या बुडवल्या आणि पुन्हा त्या तरंगुन जशाच्या तशा वर आल्याची एक चमत्कारकथा सांगितली. जाते. तुकारामांना होणारा समाजनिंदेचा त्रास आणि त्यांच्या अभंगाचे सामर्थ्य या दंतकथेने सुचवला आहे, असे म्हणायला हरकत नाही. शिवाजी महाराज यांची भेट झाली होती की नव्हती अजूनही हे विद्वानांच्या मतभेदाचे विषय आहेत. तुकारामांचे निर्वाण हाही बहुजन समाजात दंतकथेचा विषय झाला आहे.

तुकारामांचे अभंग -

तुकाराम रूढ अर्थाने शिकलेले नव्हते. मात्र संत परंपरेतील साहित्य त्यांच्या परिचयाचे होते. तुकारामांचे व्यक्तिमत्व एकीकडे दुष्ट प्रवृत्तींवर हल्ला करण्या इतके कणखर आणि दुसरीकडे भक्तीने भारलेले, अतिशय मृदू असे होते. त्यांच्या अभंगाची शैली तशीच आहे. परखडही आहे आणि हळुवारही आहे. 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णूदास । कठीण वज्रासी भेदू ऐसे' असे तुकारामांनी स्वत:चे वर्णन केले आहे. तुकारामांच्या अभंगातुन त्यांचे मन प्रगट होते. समाजातील सर्व अनिष्ट प्रथांचा घातक रूढींचा ते निषेध करतात. जातिभेद त्यांना मान्य नाही. सर्व माणसे सारखी आहेत; असे ते पुन्हा-पुन्हा सांगतात. केवळ जन्म उच्च वर्णामधला, म्हणून दुसऱ्यांवर अन्याय

करणारी माणसे, समाजात पोकळ डौल मिरवणारी माणसे, लबाड आणि ढोंगी साधु यांच्यावर तुकाराम हल्ला चढवितात, अमंगल, अनिष्ट अशा सर्व गोष्टींवर आघात करणे आणि शुद्ध, मंगल, कल्याणकारी अशा भक्तीचा मार्ग दाखविणे, असे दुहेरी कार्य तुकारामांच्या अभंगानी केले आहे. तुकारामांचा देव हा दुर देवळामध्ये नाही. त्यांनी समाजातील दीनदुबळ्यांची सेवा करणाऱ्या, त्यांना आपले म्हणणाऱ्या संतसज्जनांमध्ये देवाचे रूप पाहिले आहे.

'जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे–जो आपुले
तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा'

असे त्यांनी एका अभंगात म्हटले आहे.

तुकारामांच्या मनात भक्तीच्या वाटेवर चाललेला संघर्ष, लोभ–मोहावर मात करण्याची त्यांची धडपड, मनाने शुद्ध आणि मुक्त होण्याचा त्यांचा ध्यास, तसेच विठ्ठलाच्या म्हणजे ईश्वराच्या भेटीने त्यांच्या मनाला होणारा अपार आनंद त्यांचे अनुभव तुकारामांनी अभंगामधुन सांगितले आहे. त्यांना प्रत्यक्ष असा कोणीही गुरू नव्हता. भक्तीच्या मार्गावर त्यांचा प्रवास स्वत:च्या बळाने घडला. त्यांनी माणसाचे सामाजिक जीवन शुद्ध असावे म्हणुन आग्रह धरला आणि मन निर्मळ असावे असाही उपदेश केला. तुकारामांच्या अभंगातील शब्दकळा लवचिक आहे. जसा अनुभव असेल तशी ती बदलते. दांभिकपणावर हल्ला करताना शस्त्रा सारखी तिखट होते. फटकळ होते आणि सज्जनांचे गुण वर्णन करताना मेणाहुन मऊ होते.

तुकारामांनी माणसाचे अंतर्बाह्य जीवनच अभंगा मधून प्रकट केले. भागवत संप्रदायाचा पाया ज्ञानेश्वरांनी घातला पण तुकारामांनी त्यावर कळस चढवला असे म्हटले जाते.

तुकारामांनी माणसाच्या वैयक्तीक चारित्र्याच्या शुद्धते बरोबरच त्याचे सामाजिक चारित्र्यही शुद्ध असावे असा आग्रह धरला. अनेक देवदेवता, त्यांची अर्थशुन्य पुजा, भलभलत्या उपासणेच्या पद्धती, अंधश्रद्धा, देवाच्या नावाने चालणारे ढोंग आणि अन्याय, जातिव्यवस्थेमुळे वाढणारी विषमता अशा अनेक सामाजिक दोषांवरती फार त्वेषाने प्रहार केले. माणसांमधील सात्विक, सुजाणता, चांगुलपणा जागे केले पाहिजे, पण त्याचबरोबर त्याची दृष्टबुद्धी, अन्यायकारक वृत्ती, आंधळी भक्ती यांचाही नाश केला पाहिजे. अशा भावनेने तुकारामांनी अभंगरचना केली आहे.

तुकारामांचे कार्य हे भागवत संप्रदायासाठी फार महत्वाचे ठरले. समाजाची नैतिक उन्नती व्हावी या तळमळीने केलेले कार्य सर्वसामान्य माणसाला इतके प्रभावित करणारे होते की, 'ज्ञानोबा – तुकाराम' हा त्यांचा मंत्रघोषच बनला.

* * * * * * * * * * * *

# ❊ संत नामदेवांचे साहित्य आणि कार्य ❊

**निशा भोये**, F.Y.B.A.

नामदेवांचा जीवन परिचय –

नामदेवांचे जीवन आणि कार्ये अतिशय उद्‌बोधक अशा प्रकारचे आहे. आपल्या दीर्घ आयुष्यात नामदेवांनी भक्तीचे भागवतधर्मी तत्वज्ञान समाजाच्या सर्व थरांमधील सामान्य माणसांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले. महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरही त्यांनी भक्तिसंप्रदायाच्या विस्तार केला. त्याच्या जीवना विषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही. पण समकालीन संतांच्या विशेषत: जनाबाईच्या अभंगावरून, त्याचप्रमाणे स्वत:च्या नावावर नोंदल्या गेलेल्या आत्मचरित्र अभंगावरून नामदेवांच्या आयुष्याविषयी काही माहिती मिळू शकते.

नामदेवांचा जन्म इ. स. १२७० मध्ये झाला. इ. स. १३५० पर्यंत ते जगले असावेत. एकूण ८० वर्षाचे दीर्घ आयुष्य त्यांना लाभले. परभणी जिल्ह्यात नरसी बामणी या गावी त्यांचा जन्म झाला. दामाशेटी हे त्यांचे वडील, आईचे नांव गोणाई, नामदेव जातीने शिंपी होते. त्यांचे घर पंढरपुरच्या विठ्ठलाच्या भक्तीत रंगलेले होते. ते वारकऱ्याचे घर होते. म्हणुन नामदेवांवर लहान पणापासून भक्तीचे संस्कार झाले होते.

नामदेवांच्या विठ्ठलभक्तीबद्दल अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत. नामदेव श्रेष्ठ भक्त होते यात शंका नाही. त्यांच्या भक्तीचे मोठेपण पटवण्यासाठी नाना प्रकारच्या दंतकथांचा जन्म झाला आहे.

नामदेवांचा ज्ञानेश्वरांशी आणि त्यांच्या परिवारातील संतमंडळींशी संबंध आला. त्यामुळे त्यांची भक्तीची दृष्टी बदलली. विसोबा खेचर हे नामदेवाचे गुरू त्यांच्या उपदेशाने नामदेवाच्या भक्तीला योग्य दिशा मिळाली. नामदेव नंतर ज्ञानदेवाच्या परिवारातलेच एक संत झाले.

नामदेवांची अभंगगाथा –

नामदेवांच्या नावे कोणतीही प्रदीर्घ ग्रंथरचना नाही कोणतेही तत्वज्ञानात्मक ग्रंथ किंवा भाष्ये त्यांनी लिहिलेली नाहीत. त्याची रचना अभंगाच्या स्वरूपाची आहे.

नामस्मरण आणि कीर्तन ही दोन माध्यमे संतविचारांच्या प्रसारासाठी नामदेवांनी वापरली आणि अतिशय लोकप्रिय केली. लोकांमध्ये रूजलेली, त्यांना जवळची वाटणारी आणि सुबोध अशी ही प्रसाराची माध्यमे होती. नामदेवांनी कीर्तनाची गोडी वाढवणारे अभंग मोठ्या प्रमाणावर रचले. ते अतिशय सोपे आणि रसाळ होते. पाहता पाहता ते लोकांच्या मुखात घोळू लागले.

हरीपाठाचे अभंग, आत्मचरित्रात्मक अभंग, ज्ञानेश्वरांचे चरित्र सांगणारी तीन अभंगमय प्रकरणे इतर स्फुट अभंग आणि हिंदी पदरचना एवढे वाङ्मय नामदेवाच्या नावावर आहे.

नामदेवाचे स्फुट अभंग म्हणजे प्राचीन मराठी मधील पहिली भावकविता आहे. या कवितेतला भाव अर्थातच भक्तीचा भाव आहे. पण भक्तीच्या विविध आणि मधुर अशा छटा नामदेवांच्या अभंगामध्ये पाहायला मिळतात. विठ्ठलाचा विरह, त्यांच्याविषयी ओढ, त्याच्या भेटीमध्ये सामावलेले अपुर्व असे सुख, यांचे वर्णन नामदेवांनी मोठ्या उत्कटेने केले आहे. विठ्ठलमय होऊन गेलेल्या आपल्या मनाची स्थिती वर्णन करतांना ते म्हणतात.

तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल । देव विठ्ठल देवपुजा विठ्ठल ।। माता विठ्ठल पिता विठ्ठल । बंधु विठ्ठल गोत्र विठ्ठल ।। गुरू विठ्ठल गुरूदेवता विठ्ठल । निधन विठ्ठल निरंतर ।। नामा म्हणे मज विठ्ठल सापडला । म्हणोनी कळिकाळा पाड नाही ।।

नामदेवांच्या अभंगांमध्ये भक्तीची आर्तता आहे. जिव्हाळा आहे. गुरूबद्दलचा आदर आहे. पंढरपुरसारख्या देवस्थानाविषयी आपलेपणा आहे. तिथे विठ्ठलाच्या चरणाशी सारेजण समान आहेत. आई आणि मुल असे देव आणि भक्तीचे नाते आहे. नामदेव या सर्व भावना अभंगामधुन तळमळीने बोलुन दाखवतात.

देव दगडामध्ये नाही. तो माणसाच्या मनामध्ये आहे असा नामदेवांचा अनुभव आहे. या मनामधल्या देवाची भक्ती करायची तर मन निर्मळ हवे, भाव शुद्ध हवा, साधे देवाचे नाव घेत राहणे पुरे आहे. संन्यासाची आणि वनात तपश्चर्या करण्याची जरूरी नाही. नामदेवांचे भक्तीच्या वाटेवरचे हे अनुभव त्याच्या अभंगांमध्ये उतरले आहेत.

नामदेवांची शैली अगदी सोपी साधी आहे. उपमा आणि अलंकारांनी ती भरलेली नाही. सुबोध, गोड, शब्द, ओघवती रचना आणि भक्तीप्रेमाचा गोडवा यामुळे हे अभंग सर्वांना सहज समजतील असे आहेत.

कधी शब्दांची आवर्तने करत, तर कधी रोजच्या जीवनातील अनुभवांची उदाहरणे देत नामदेव आपला भाव दुसऱ्यांपर्यंत पोहोचवतात. नामदेवाच्या नावावर असलेल्या आत्मपर अभंगांमधून त्यांच्या मनाची तळमळ विठ्ठलभेटी साठी रात्रंदिवस लागलेल्या ध्यास आणि अखेर विठ्ठलचरणी लाभलेली कृतार्थता व्यक्त होते.

ज्ञानेश्वरांचे चरित्र वर्णन करणारे आदि, तीर्थावळी आणि समाधी अशा तीन प्रकरणांत विभागलेले अभंग त्याच्या नावावर आहेत. यापैकी समाधीचे जे अभंग आहेत ते अतिशय करूण आणि शोकाने भरलेले आहेत. ज्ञानेश्वराच्या समाधीमुळे व्याकुळ झालेल्या संतमंडळाची मन: स्थिती नामदेवांनी अचुक वर्णन केली आहे. हृदय हेलावून टाकणारा तो प्रसंग वर्णन करतांना नामदेवांचे हळुवार शब्द, नेमके दृष्टान्त आणि भावनेच्या लहान लहान छटा यांच्यामुळे तो डोळ्यासमोर प्रत्यक्ष उभा राहतो.

सर्व संतकवींमध्ये नामदेवाचे अभंग अधिक उत्कट भावभक्तीच्या अनेक छटा व्यक्त करणारे असे आहेत. सोपे आणि गोड आहेत.

त्यांच्या हिंदी रचनेचे संपादन अलीकडच्या काळातच झाले आहे. डॉ. भागीरथ मिश्र आणि डॉ. मौर्य यांनी नामदेवांची हिंदी पादावली संपादित केली आहे. तिच्यामध्ये २३० हिंदी पदे आणि १३ सांख्या यांचा समावेश आहे.

शिखाचा धर्मग्रंथ 'गुरूग्रंथसाहिब' यामध्येही नामदेवांच्या काही पदाचा समावेश आहे. ही पदे 'मुखबानी' म्हणून प्रसिद्ध आहेत. सगुणसाकार, परमेश्वराचे रूपवर्णन त्यात कमी असुन बहुतेक पदे ही निर्गुण रूपातील परमेश्वरा विषयीची आहेत. महाराष्ट्रात नामदेवांची मराठी अभंगवाणी जशी लोकप्रिय आहे, तशी हिंदी भाषीक प्रदेशात नामदेवाची हिंदी पदावली लोकप्रिय आहे.

कीर्तन आणि नामस्मरण ही दोन प्रभावी माध्यमे नामदेवांनी वापरली आणि भक्तीचा विचार त्यांच्याद्वारे लोकांपर्यंत पोहोचवला. म्हणून 'नाचुन किर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' असे म्हणतात. भागवत संप्रदायात कीर्तन लोकप्रिय झाले ते नामदेवांमुळे कीर्तनाला उपयोगी असे साहित्यही संतांनी आपोआपच निर्माण केले. लोकजीवनाशी संबंधित अशा अनुभवांचे पहिले काव्य, नामदेवांनी लिहिले आणि त्याच्या कार्यामधुन प्रेरणा घेऊन इतर संतांनी आपापल्या अनुभवांचे भांडार अभंगांमधुन खुले केले.

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

## ✻ सेना महाराज ✻

**कविता चौरे**, F.Y.B.A.

हे मूळचे जबलपूरजवळील नांदुगडचे, तीर्थाटन करता करता ते महाराष्ट्रात येऊन गेले, जाता पंढरीसी सुख वाटे जीवा । आनंदे केशवा भेटताचि हा आपला आनंद ते अनेकदा व्यक्त करतात. स्वत:स ते विठोबारायाचे दूत म्हणवितात.

विटेवरी उभा । जैसा लावण्याचा गाभा ।।
पायी ठेऊनिया माथा । अवघी वारली चिंता ।।
समाधान चिंता । डोळा श्रीमुख पहाता ।
बहुजन्मी केला लाग । सेना देखे पांडुरंग ।।

अशा शब्दात विठ्ठलाच्या रूपदर्शनाच्या आनंद ते प्रकट करतात. निवृतिनाथांना व ज्ञानदेवांना त्यांनी गुरूस्थानी मानले असल्याचे त्यांच्या अभंगावरून दिसते. संताचा उल्लेख 'मायबाप कृपावंत' असा ते करतात. कधी कधी तर करिसी खटपटी । पोटासाठी आटापाटी । नाम घेता विठोबाचे । काय तुझ्या बाचे जाते । असा परखड सवालही त्यांनी विचारला आहे. मुखी नाम नाही । त्याची संगती नको पाही । हे नाममहिम्याविषयीचे त्यांचे उदगार फारच स्पष्ट आहेत. 'घेता नाम विठोबाचे । पर्वत जळती पापांचे ' हा त्यांचा अभंग प्रसिद्ध आहे. सामाजिक नीतिपरही काही अभंग त्यांनी लिहून तत्कालीन साधुसंतांच्या ढोंगीपणावर (धर्मांचे थोतांड करून

भरी पोट । भार्या मुले मठ मजा करी ) टीका केली आहे 'आम्ही वारिक वारिक । करू हजामत बारीक । हा त्यांच्या व्यवसायातील विठ्ठल रूपतेचा अभंग प्रसिद्ध आहे. त्यांनी काही गौळणी ही लिहिल्या आहेत. सेनांनी या गौळणींत राधाकृष्णाचे प्रेम विशेष वर्णिले असून त्यांतील गोपी–कृष्ण व गोपी यशोदा यांचे संवाद चुरचुरीत आहेत.

राधा म्हणजे यशोदा सुंदरी
चोरटा शिंदळ तुझा मुरारी
आम्हा ठाऊक मुरारी
हा न करीं ते करी काय सांगु तो

राधेने कृष्णाबद्दल केलेल्या तक्रारीमधील परब्रह्माची जाण करून देणारा ध्वनी उल्लेखनीय आहे. सेनामहाराजांच्या काही गौळणी मात्र उत्ताणपणाकडे झुकतात.

तेराव्या शतकातील या संतमेळाव्यात अठरा पगड जातींचे संत एकदिलाने विठ्ठलाच्या भक्तीत रंगून गेले होते. यांतील आणखी एक प्रसिद्ध संत म्हणजे सेना न्हावी हे होत. यांच्या चरित्रा संबंधी विश्वसनीय माहिती उपलब्ध नसली तरी हे उत्तरेकडील हिंदी–भाषी संतकवी पंढरीच्या विठोबाच्या प्रेमात सापडून मराठीत उत्तम प्रकारची अभंग रचना करताना दिसतात. जबलपूरजवळील बांधोगड येथील राजाच्या पदरी हे सेवेस होते. मातृभाषा हिंदी असली तरी यांची पंढरीची वारी नित्य असल्यामुळे यांना मराठी भाषा इतर साधुसंतांच्या संगतीने अवगत झाली असावी. यांच्या नावाने उपलब्ध असलेले दोन–अडीचशे अभंग सापडतात. राजाची सेवा करता करता काही चमत्कार होऊन त्यांना उपरती झाली, ती त्यांनी एका अभंगात व्यक्त केली आहे. करिता नित्यनेम । रायें बोलविले जाण । पांडुरंगे कृपा केली । राया उपरती झाली ।। मुख पाहता दर्पणी । आंत दिसे चक्रपाणी कैसी झाली नवलपरी । ताटीमाजी दिसो हरी ।। रखुमादेवीवर । सेना म्हणे मी पामर ।। या शब्दांत सेनांनी आपल्या आयुष्यातील एक महत्वाचा प्रसंग सांगितलेला आहे. 'आम्ही वारिक वारीक । करू हजामत बारीक ।। हा यांचा एक प्रसिद्ध असा रूपकात्मक अभंग आहे. चौवर्णा देऊनी हात । सेना राहिला निवांत ।। यातील चारहि वर्णांना 'हात देण्याचा उल्लेख लक्षणीय आहे. सेना यांचे अभंग सोपे आणि म्हणूनच हृदयाचा ठाव घेणारे असे आहेत. उदार तुम्ही संत । मायबाप कृपावंत ।। या अभंगात सेनांनी संताचे ऋण मान्य केले आहे. करितां परोपकार । त्याच्या पुण्या नाहीं पार ।। करिता परपीडा । त्याच्या पाप नाही जोडा ।। या अभंगात सेनांनी संताचे ऋण मान्य केले आहे. करितां परोपकार । त्यांच्या पुण्या नाहीं पार ।। करिंता परपीडा । त्यांच्या पाप नाही जोडा ।। अशी सुटसुटीत नीतिवचनेही

त्यांच्या अभंगातून मिळतात. त्यांनी आपल्या जातिबांधवांनाही नेटका असा उपदेश केला आहे. प्रतिपाळावे धर्मासी व्यवहारासी न सांडावे ।। असे त्यांच्या उपदेशाचे सार आहे. करूनियां स्नान । मुखी जपा नारायण ।। मागुती जाण । शिवो नये धोकटी ।। अशी सूचना त्यांनी आपल्या जातिबांधवांना केली आहे. गौळणी विरहिणी त्र्यंबकेश्वर, आळंदी, सासवड असेही त्यांच्या अभंगाचे विषय आहेत. शिव तो । निवृत्ती । आदिमाया मुक्ताई ।। ब्रह्मा तो सोपान । विष्णु ज्ञानदेव पाही ।। असे ज्ञानोवादी भावंडांचे स्तवन त्यांनी केले आहे. 'श्रीज्ञानराजे केला उपकार । मार्ग हा निर्धार दाखविला ।। ज्ञानेश्वरांनी कोणता मार्ग दाखविला तर अविनाश पंढरी भूमीवरी पेठ । प्रत्यक्ष वैकुंठ दाखविले ।। अशी त्यांची ज्ञानदेवांवर पंढरीवर निष्ठा आहे.

सेनांचे अभंग वाचताना, हा कवी परभाषक आहे. अशी कल्पना सुद्धा येत नाही. नामदेवांचा जिव्हाळा त्यांच्या अभंगातून प्रतीत होतो. विटेवरी उभा । जैसा लावण्याचा गाभा ।। पायी ठेवूनिया माथा । अवधी वारिली चिंता ।। अशा सोप्यात व प्रसादपूर्ण वाणीने सेनांनी मराठीचे काव्यभांडार सुशोभित केले आहे. मोक्ष आणि मुक्ती हें तो तुम्हांस आवडती ।। एका नामावांचूनि काही । नसे आवडी आम्हां पाही ।। हा नामदेवादी संताचा भाव त्यांच्या अभंगातून प्रकट झालेला आहे. लेकराची आळी मायबापापुढे । पुरवी लाडिंकोडे लळे त्याचे ।। अशा ओळींवरील नामदेवांची छाप स्पष्ट आहे. हा न्हावियाचा सेना अनेक बाबतीत नामदेवांच्या परिवारात वेगळा दिसणारा आहे. टळोनि गेले प्रहर तीन । काय निजला झांकोनि लोचन ।। असा एक 'वासुदेव ही त्यांनी लिहिलेला आहे. सोडिल्या शिदोरी । काला 'करी दहीभात ।। हा काल्यावरील त्यांचा अभंग नामदेव परिवारात शोभणारा असाच आहे.

* * * * * * * * * * * *

## * आई मायेचा सागर *

**कविता चौरे**, F.Y.B.A.

आई ही मायेचा सागर
दुधाची घागर
समृद्धतेचा जागर असते
आई ही भाजीलं मिठ
पाहिली विद्यापीठ
हक्काचे व्यासपीठ असते.
आई ही पावसाच्या धारा
थंडगार वारा
मायेचा उभारा असते
आई हि आईच असते
नसते सांभाळणारी दाई
ती असल्यावर कळत नाही
अन नसल्यावर मिळत नाही.

* * * * * * * * * * * *

## ✻ संत सोयराबाई ✻

**प्रसाद पाटील**, S.Y.B.Sc.

संत परंपरेने महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक जीवनाला नवे वळण दिले. या परंपरेतील एक महत्त्वाचे व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे संत सोयराबाई. संत सोयराबाई या वारकरी संप्रदायातील थोर स्त्री–संत असून त्या संत चोखामेळा यांच्या पत्नी होत.

साधारणपणे इ.स. पंधरावे–सोळावे शतक हा त्यांचा काळ मानला जातो. जातिभेद, अस्पृश्यता व स्त्रीदास्याने ग्रस्त असलेल्या समाजात त्यांनी आपल्या अभंगांद्वारे समता, मानवता व भक्तीचा संदेश दिला.

संत सोयराबाईंचे जीवन अत्यंत कष्टमय होते. महार समाजात जन्म झाल्यामुळे त्यांना समाजाकडून सतत अपमान, तिरस्कार व अन्याय सहन करावा लागला. स्त्री असल्यामुळे त्यांच्या दुःखात आणखी भर पडली. परंतु या सर्व प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी विठ्ठलभक्तीचा मार्ग सोडला नाही. विठ्ठल हेच त्यांचे सर्वस्व होते. संसारातील दुःख, समाजाचा छळ आणि आत्मिक वेदना त्यांनी आपल्या अभंगांतून व्यक्त केल्या.

सोयराबाईंच्या अभंगांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील प्रांजळपणा व अनुभवाची खरीखुरी अनुभूती. त्यांच्या अभंगांतून जातिभेदाविरुद्धचा स्पष्ट निषेध दिसून येतो. ईश्वरापुढे सर्व माणसे समान आहेत, ही भूमिका त्यांनी ठामपणे मांडली. समाज देहाला अपवित्र मानतो; पण मनातील भक्तीच खरी पवित्रता आहे, असा विचार त्यांनी वारंवार व्यक्त केला. त्यांची भाषा साधी, बोली स्वरूपाची असून ती थेट मनाला भिडणारी आहे. त्यांच्या अभंगांमध्ये विठ्ठलाला उद्देशून केलेली आर्त हाक, शरणागती आणि आत्मसन्मान यांचे सुंदर दर्शन घडते. उदा.

'अवघेचि विश्व एक झाले, एका जनार्दनी भरल' या अभंगातून त्या विश्वात्मक ऐक्याची भावना व्यक्त करतात. तसेच,

'देह जरी अपवित्र म्हणती, मन माझे पंढरी' या ओळीतून समाजाच्या अपमानास उत्तर देताना आत्मगौरवाची जाणीव दिसते. संत सोयराबाईंचे साहित्य हे केवळ भक्तिपर नसून सामाजिक जागृती करणारे आहे. त्यांनी आपल्या अभंगांतून स्त्रीमनाची वेदना, दलित समाजाचे दुःख आणि मानवी समानतेचा विचार मांडला. म्हणूनच त्या केवळ संतच नव्हे तर समाजसुधारक म्हणूनही ओळखल्या जातात. मराठी संत–साहित्यातील त्या एक प्रभावी व निर्भीड आवाज आहेत. निष्कर्षतः, संत सोयराबाई यांचे जीवन म्हणजे संघर्षातून जन्मलेली भक्ती आणि दुःखातून उमटलेली समतेची जाणीव होय. त्यांच्या अभंगांनी समाजातील भेदाभेदांना आव्हान दिले आणि माणुसकीचा मार्ग दाखवला. आजच्या काळातही त्यांचे विचार तितकेच उपयुक्त व प्रेरणादायी आहेत. त्यामुळे मराठी संत परंपरेत संत सोयराबाई यांचे स्थान अनन्यसाधारण आहे.

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

# संत एकनाथ यांचे जीवन व साहित्य

**कौशल्या ठाकरे**, S.Y.B.A.

महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनावर संतपरंपरेचा खोलवर प्रभाव पडलेला आहे. मध्ययुगीन काळात समाज अंधश्रद्धा, जातिभेद आणि कर्मकांडात अडकलेला असताना संतांनी आपल्या विचारांनी समाजाला नवी दिशा दिली. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम आणि समर्थ रामदास यांनी भक्तीच्या माध्यमातून समाजजागृती केली. या परंपरेतील एक अत्यंत महत्त्वाचे संत म्हणजे संत एकनाथ महाराज. त्यांनी भक्ती, ज्ञान, कर्म आणि समाजप्रबोधन यांचा सुंदर समन्वय साधून मराठी साहित्य आणि समाजजीवन समृद्ध केले.

संत एकनाथ यांचे जीवनचरित्र संत एकनाथ महाराजांचा जन्म इ. स. १५३३ मध्ये पैठण येथे झाला. पैठण हे त्या काळातील धार्मिक व सांस्कृतिक केंद्र होते. संत एकनाथ हे प्रसिद्ध वारकरी संत भानुदास महाराजांचे पणतू होते. त्यामुळे भक्तीपरंपरेचे संस्कार त्यांना लहानपणा पासूनच मिळाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्यामुळे त्यांच्या जीवनात दुःख आले; परंतु या दुःखातूनच वैराग्य, सहनशीलता आणि करुणा या गुणांचा विकास झाला. संत एकनाथांचे गुरु जनार्दन स्वामी होते. दौलताबाद येथे त्यांच्या मार्गदर्शनाखाली संत एकनाथांनी वेद, उपनिषदे, भगवद्गीता, भागवत पुराण, योगशास्त्र आणि वेदांत यांचा सखोल अभ्यास केला. ते उच्च कोटीचे विद्वान असूनही त्यांनी विद्वत्तेचा गर्व केला नाही. संस्कृतसारख्या क्लिष्ट भाषेऐवजी त्यांनी मराठी भाषेचा स्वीकार करून अध्यात्म सामान्य माणसापर्यंत पोहोचवले.

संत एकनाथ हे गृहस्थ संत होते. त्यांनी पत्नी गिरिजाबाई यांच्यासह संसार स्वीकारला. संसार करत असतानाही त्यांनी साधना, भक्ती आणि समाजकार्य यांचा आदर्श घालून दिला. त्यांचा स्वभाव अत्यंत शांत, नम्र आणि सहनशील होता. लोकांकडून होणारे अपमान, टीका किंवा उपहास ते शांतपणे सहन करत आणि क्षमेचा आदर्श घडवत.

जातिभेद, अंधश्रद्धा, कर्मकांड आणि ढोंगीपणा यांना संत एकनाथांनी तीव्र विरोध केला. सर्व मानव समान असून ईश्वर सर्वांच्या अंतःकरणात वास करतो, हा त्यांचा ठाम विश्वास होता. इ. स. १५९९ मध्ये पैठण येथे त्यांनी समाधी घेतली. संत एकनाथांचे साहित्य मराठी साहित्याच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्यांच्या साहित्यात भक्ती, ज्ञान, वैराग्य, नीती आणि समाजप्रबोधन यांचा सुंदर संगम आढळतो.

'एकनाथी भागवत' हा त्यांचा सर्वात महत्त्वाचा ग्रंथ आहे. हा भागवत पुराणाच्या अकराव्या स्कंधावरील मराठी टीका आहे. या ग्रंथातून त्यांनी भक्ती आणि ज्ञान यांचा समन्वय

साधला. संस्कृत भागवताचा गूढ आशय त्यांनी सोप्या, ओघवत्या आणि रसाळ मराठीत मांडला, त्यामुळे सामान्य जनतेला तत्त्वज्ञान समजणे सोपे झाले. 'भावार्थ रामायण' हा त्यांचा आणखी एक महत्त्वाचा ग्रंथ आहे. वाल्मिकी रामायणावर आधारित या ग्रंथात त्यांनी रामकथेच्या माध्यमातून आदर्श जीवनमूल्ये, कर्तव्यनिष्ठा, नीती, भक्ती आणि समाजधर्म यांचा संदेश दिला. या ग्रंथाची भाषा सरळ, भावपूर्ण आणि लोकाभिमुख आहे.

'रुक्मिणी स्वयंवर' या काव्यात कृष्ण-रुक्मिणी विवाहाची कथा भक्तीपूर्ण शैलीत मांडलेली आहे. या काव्यात भक्तीबरोबरच शृंगार, नीती आणि सामाजिक मूल्ये यांचा सुंदर समतोल साधलेला दिसतो. संत एकनाथांनी मोठ्या प्रमाणावर अभंग, भारुडे आणि गवळणी रचल्या. अभंगांमधून त्यांनी आत्मज्ञान, भक्ती आणि वैराग्य व्यक्त केले. भारुडांमधून रूपकात्मक व उपरोधिक शैलीत समाजातील दोष, अंधश्रद्धा, जातिभेद आणि ढोंग यांवर प्रहार केला. गवळणींमधून कृष्णभक्ती लोकभाषेत आणि भावपूर्ण पद्धतीने मांडली.

संत एकनाथांचे विचार व तत्त्वज्ञान

संत एकनाथांच्या विचारांचा केंद्रबिंदू म्हणजे मानवता. ईश्वरभक्ती म्हणजे केवळ पूजा-पाठ किंवा कर्मकांड नव्हे, तर शुद्ध आचरण, प्रेम, करुणा आणि सेवा होय, असे ते मानत. भक्ती आणि ज्ञान यांचा परस्परविरोध नसून ते एकमेकांना पूरक आहेत, हे त्यांनी आपल्या साहित्यांतून स्पष्ट केले.

मराठी साहित्याला दिलेले योगदान

संत एकनाथांनी मराठी भाषेला ज्ञानभाषेचा दर्जा मिळवून दिला. संस्कृत ग्रंथांचे मराठीकरण करून त्यांनी अध्यात्म सामान्य जनतेपर्यंत पोहोचवले. त्यांच्या साहित्यामुळे वारकरी संप्रदाय अधिक व्यापक आणि वैचारिकदृष्ट्या समृद्ध झाला. पुढील काळातील संत तुकाराम आणि समर्थ रामदास यांच्यावर संत एकनाथांच्या विचारांचा खोलवर प्रभाव पडलेला दिसतो.

संत एकनाथ महाराज हे मराठी संत परंपरेतील एक महान संत, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांच्या जीवनात भक्ती, ज्ञान, करुणा आणि समाजसेवा यांचा सुंदर संगम दिसून येतो. त्यांनी आपल्या साहित्य आणि आचरणातून समाजाला समता, सदाचार, मानवता आणि आत्मज्ञानाचा मार्ग दाखवला. म्हणूनच संत एकनाथ महाराजांचे जीवन व साहित्य आजही समाजासाठी प्रेरणादायी असून मराठी संस्कृतीत त्यांचे स्थान अढळ आणि अजरामर आहे.

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

## ❊ महान समाजसुधारक : संत गाडगे बाब ❊

**ज्योत्सना वाघ**, F.Y.B.A.

आदर्श आचरण व किर्तन याद्वारे बहुजन समाज व मागासवर्गीयामधील अंधश्रद्धा तसेच शिक्षणाविषयी आपुलकी व प्रेम निर्माण करण्या करीता ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले असे महान संत गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी महाशिवरात्रीच्या दिवशी शेवगांग, जि. अमरावती येथे झाला. त्यांचे संपूर्ण नांव डेबुजी झिंगराची जानोरकर होते. त्यांच्या आईचे नांव सखुबाई होते. गाडगेबाबा परीट समाजातील होते. त्यांचा पुर्वापार व्यवसाय कपडे धुण्याचा असला तरी त्यांचे वडील सधन शेतकरी होते. त्यांचे वडील जितके कष्टाळू तितकेच अंधश्रद्धाळू होते. त्यांच्या समाजात देवाच्या नैवेद्यापासून ते पाहुण्यांच्या पाहुणचारात दारू व मांस असायचे , हीच त्यांची धर्मपरंपरा असे. अशातच त्यांच्या वडीलांना दारूचे व्यसन जडले. दारू व्यसनामुळे त्यांचे वडील आजाराने ग्रासले. अशातच त्यांजी जीवनज्योत मालवली. त्यामुळे घर, दार, शेतीवाडी, पैसा सर्वच गमावून बसले. त्यांची सर्व शेती हरिलाल लड्डा नावाच्या सावकाराने हीरावून घेतली. तेव्हा त्यांच्या आईवर फार मोठे संकट आले. घरदार नसल्यामुळे छोट्या डेबूला घेवून राहण्याचे मोठे संकट त्यांच्या आईवर आले. डेबुला घेवून त्य मुर्तीजापूर तालुक्यातील दापुरा या त्यांच्या माहेरी आल्या. डेबू, चंद्रभानजी मामा यांच्या घरी मोठा होऊ लागला. मामाच्या घरी आलो. म्हणजे आश्रीत आहोत; हट्ट न करता जे देतील ते खाले पाहिजे. जे सांगतील ते काम केले पाहिजे. प्रत्येकाचा शब्द ऐकला पाहिजे. आपले वय खेळण्याचे असले तरी खेळण्याचा, खाऊचा, नव्या चांगल्या कपड्यांचा हट्ट करता कामा नये ही जाणीव त्याला बालपणीच निर्माण झाली त्यामुळे डेबू कोणतेही काम आनंदाने व उत्साहाने करायचा. मामाकडे भरपूर गुरे ढोरे, शेत बरीच होती. घरात भरपुर काम होते. कामाची सवय असल्याकारणाने डेबुला सांगितलेले कोणतेही काम आनंदाने करायचा. पहाटे उठून गोठा व अंगण झाडून स्वच्छ करायचा. जनावरांसाठी वैरण तोडणे, त्यांचे शेण गोळा करणे अशा सारखी कामे आवडीने करत असे. अनेकदा पहाटे उठून दळणासाठी आईला मदत करीत असे.

श्रमशक्ती बरोबरच गाडगेबाबांना आणखी तीन शक्तिची जन्मतः देणगी लाभली होती. त्यांच्या जवळ तल्लख स्मरणशक्ती व सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि तितकीच सशक्त ग्रहणशक्ती होती. शिक्षणाने त्या शक्तीचा विकास झाला असता खरा, पण ते त्यांच्या नशिबात नव्हते.

डेबुची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्यामुळे शाळेत जाता आले नाही. मात्र डेबूजीने अनुभवाच्या शाळेत शिकून त्याची भरपाई केली. तो निसर्गच्या शाळेत मनापासून रमला. माणसाच्या दुनियेत तो अनुभव गोळा करीत भटकला, प्राणी, पशू , पक्षी आणि पिके यांच्या संगतीत त्याने जगण्यासाठी उपयोगी पडणारे ज्ञान संपादन केले. स्वामी विवेकानंदांनी आपल्या हितचिंतकांनाजी शेकडो पत्रे पाठवीली त्यातील एका पत्रात ते म्हणतात. अनुभव हाच या जगात सर्व श्रेष्ठ शिक्षक आहे. तसेच हास्य आणि अश्रू या दोन गोष्टीमुळे आपणाला खरे शिक्षण मिळते. स्मरण निरीक्षण आणि ग्रहण यांची उपजत देणगी लाभलेल्या डेबुजीने विवेकानंदांना अभिप्रेत असलेले शिक्षण शेताची नांगरट करत असतानाच साध्य केले होते. निसर्ग आणि शेतीच्या सहवासातून ते आनंदहास्य अनुभवत होते.

**किर्तनकार संत गाडगे बाबा :**

समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजूती, अनिष्ठ रूढी परंपरा दुर करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. यासाठी त्यांनी किर्तनाचा अवलंब केला. आपल्या किर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञान, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका. व्यसनांच्या आहारी जाऊ नका. देवधर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका. जातीभेद व अस्पर्शता पाळू नका असे ते किर्तनातून सांगत असत. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ग्रामीण भाषेचा (वऱ्हाडी बोलीचा) उपयोग करीत असत. संत तुकारामांना आपले गुरू मानत. संत तुकारामांच्या अभंगाचा वापर त्यांनी आपल्या किर्तनात केलेला आहे. एका दिवशी किर्तन चालू असतांना टपालवाल्याने तार आणुन बाबांना त्यांच्या एकूलत्या एक मुलाच्या मृत्युची बातमी सांगितली. बाबा किर्तनात तल्लीन झाले होते. बाबा क्षणभर शांत झाले ! मग एका क्षणातच त्यांनी निर्विकार मुद्रेने ते मोठ्यांनी म्हणाले ''मेले ऐसे कोट्यानु कोटी काय रडू एकासाठी'' एकुलत्या एका मुलाचे दुःख गिळून ते पुन्हा किर्तनात दंग झाले. या अशा क्षणातून ते बरेच पारखले गेले. ते स्वतःकरीता कधीच जगले नाहीत. संपूर्ण जीवनभर त्यांनी किर्तनाद्वारे लोकजागृतीचा मार्ग अवलंबला. ''गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला'' हे गाडगेबाबांचे आवडते भजन होते. आचार्य आत्रे गाडगेबाबांबद्दल म्हणतात. ''सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पहावे रानात तर गाडगेबाबांना पहावे किर्तनात,'' बाबांनी आपल्या किर्तनातून सर्वसामान्यांचे शोषण, काळाबाजार, व्यापारी वर्गाद्वारे होणारी शेतकऱ्यांची व मजूरांची लुट या गोष्टीवर भरपूर प्रकाश टाकला. दीनदुबळ्याची सेवा हे त्यांच्या

जीवनाचे व्रत होते. भुकेलेल्याना अन्न, तहानलेल्यांना पाणी, बेकारांना काम, उघड्यानागड्यांना वस्त्र, रोग्याना औषधोपचार, गरीब मुलामुलीकरीता शिक्षणाची सोय, प्राण्यांना अभय यातच खरा धर्म आहे असे ते समजत, यालाच ते ईश्वराची सेवा समजत होते.

**लोकहिताची कामे :**

संत गाडगेबाबांनी त्यांचे संपूर्ण जीवन सर्वसामान्य गरजू लोकांसाठी खर्ची केले. बाबांनी धनिकांकडून देणग्या स्विकारल्या. त्या पैशातून बाबांनी गोरगरीब जनतेसाठी रूग्णालये बांधली, नाशिक, देहू, आळंदी व पंढरपूर या धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या, अनेक नद्याकाठी घाट बांधले, शैक्षणिक संस्था उभ्या केल्या. अतिशय गरीब, अनाथ व अपंग लोकांसाठी अन्नछत्राची व्यवस्था केली, कुष्टरोग्याची सेवा केल. बाबा स्वच्छतेची पुजक होते. ते ज्या ठिकाणी जात, तेथील परिसर झाडून स्वच्छ करीत, स्वच्छ आणि सुंदर परिसरातच देव असतो ही बाबांची धारणा असे, बाबांजवळ सतत एक खराटा असायचा, बाबांचा वेष अत्यंत साधा असायचा, अंगावर गोधडीवजा फाटके कपडे आणि हातात एक फुटके गाडगे असायचे. त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणू लागले. ते ज्या गावात जात तो गांव झाडून स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात त्यांनी स्वत: सातत्याने सक्रिय राहून जिवापाड प्रयत्न केले.

बाबांनी संन्यास स्विकारल्यानंतर भरपूर तिर्थाटन केले, अनेक ठिकाणी भ्रमण केले, परंतू लोकसेवेचे वृत्त सोडले नाही. कोणी कुठे अडचणीत सापडलेला असल्यास त्याला स्व:त होऊन मदत करायचे, फळाची अपेक्षा न ठेवता आपल्या वाटेने निघून जायचे.

महाराष्ट्रात संतपरंपरेबाबत, 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' असे म्हटले जाते. 'महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ' असे गौरवोद्‌गार आचार्य अत्रे यांनी संत गाडगेबाबांबद्दल काढले आहेत. लोकसेवेच्या या धकाधकीच्या प्रवासातच या महापुरूषाचे अमरावतीजवळ वलगांव येथे पेढी नदीच्या किनारी दि. २० डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले. 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' या भजनाचा प्रचार व प्रसार करणाऱ्या, सर्वसामान्यांची दृढ श्रद्धा असणाऱ्या संत महापुरूषाची समाधी अमरावती येथे आहे. महाराष्ट्र शासनाने अमरावती विद्यापीठाला 'संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ' असे नामकरण करून त्यांच्या कार्याचा सन्मान केला.

* * * * * * * * * * * *

## ✻ समर्पित सेवावृत्ती व्यक्तिमत्व – डॉ. विजय बिडकर ✻

**प्रा. डॉ. रवींद्र पगार**

आदिवासींची वेठबिगारी, आर्थिक पिळवणूक, शिक्षणाबद्दल अनास्था थांबविण्यासाठी डांग सेवा मंडळ संस्थेची स्थापना २३ जून १९३७ मध्ये थोर स्वातंत्र्यसैनिक आदिवासी सेवक, दलित मित्र कर्मवीर दादासाहेब बिडकर यांनी केली. दादासाहेबांनी गोरगरीब आदिवासींच्या झोपडीपर्यंत ज्ञानगंगा पोहोचविण्याचा ध्यास मृत्यूपर्यंत म्हणजे वयाच्या ९५ व्या वर्षापर्यंत सदैव मनाशी बाळगला. या महनीय व्यक्तिमत्वाचे १२ मार्च २००५ रोजी निधन झाले.

दादासाहेब बिडकर यांच्या निधनानंतर संस्थेच्या कारभाराची धुरा डॉ. विजय बिडकर यांच्या खांद्यावर आली. डॉ. विजय बिडकर यांचा जन्म १ एप्रिल १९४१ रोजी सटाणा येथे झाला. त्यांचे पहिली ते अकरावीपर्यंतचे शिक्षण सटाणा येथील मराठा हायस्कूल येथे झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांनी नाशिक येथील आर. वाय. के. महाविद्यालयात विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. उपजत अभ्यासू वृत्तीमुळे इंटर सायन्सला उत्तम गुण मिळाले. वैद्यकीय सेवेच्या आवडीमुळे पुढे ते १९६२ मध्ये पुणे येथील टिळक आयुर्वेद महाविद्यालयात वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी दाखल झाले. १९६७ मध्ये बी. ए. एम. एस. पदवी प्राप्त केली. आदिवासी सेवेचे बाळकडू लहानपणापासूनच मिळाल्यामुळे त्यांनी वैद्यकीय सेवा मोठ्या शहरी भागात न करता १९६७ मध्ये पेठ सारख्या अतिदुर्गम आदिवासी भागात सुरू केली. त्याकाळी पेठ परिसरात वैद्यकीय सेवेची अतिशय गरज होती. वैद्यकीय सेवेच्या माध्यमातून समाज सेवा व डांग सेवा मंडळाच्या माध्यमातून शिक्षण सेवा त्यांनी एकाच वेळी सुरू केली.

१९६८ मध्ये ते उच्चशिक्षित हेमलता यांच्याशी विवाहबद्ध झाले. हेमलता बिडकर शासकीय आरोग्य सेवेत नर्सिंग क्षेत्राशी निगडीत होत्या. पेठ सारख्या अतिदुर्गम भागात दोघां पती–पत्नीने आदिवासींच्या सेवेकरिता स्वत:ला झोकून दिले. डॉ. विजय बिडकर यांनी कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न करता रात्रंदिवस आदिवासी बांधवांची सेवा हे ब्रीद मानून कार्यरत राहिले. 'जे जे आपणासी ठावे ते ते दुसऱ्याशी द्यावे' या समर्थ रामदासांच्या उक्तीनुसार त्यांनी आरोग्य शिक्षणावर अनेक भाषणे दिली, लेख लिहिले, सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. अनेक आरोग्य शिबिरात मार्गदर्शन व उपचार केले. अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम केले. 'गरिबांचे डॉक्टर हा नावलौकिक मिळवला.

वाचनाच्या व्यासंगामुळे पेठ येथे सार्वजनिक वाचनालयाची स्थापना केली. पर्यावरणाच्या बाबतीत ते अतिशय सजग होते. आज संस्थेच्या प्रत्येक शाळा, महाविद्यालयात वृक्षरूपी नंदनवन फुललेले दिसते ते सर्व डॉ. विजय बिडकर यांच्या दूरदृष्टीमुळेच. जीवनाच्या विविध क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले.

डॉ. विजय बिडकर वैद्यकीय सेवा करीत असतानाच डांग सेवा मंडळ संस्थेच्या विकासासाठी सचिव म्हणूनही भरीव योगदान दिले. त्यांच्या आधुनिक नावीन्यपूर्ण कल्पनेमुळे संस्थेच्या विकासाचा आलेख उंचावत गेला. पेठ येथील दादासाहेब बिडकर वरीष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. पुढे त्यांनी अभोणा, उंबरठाण येथे वरिष्ठ महाविद्यालये सुरू केली. डॉ. विजय बिडकर व हेमलता बिडकर यांच्या अथक प्रयत्नांमुळे डांग सेवा मंडळाच्या आजमितीला ०५ इंग्लिश मीडियम स्कूल, ०७ आश्रमशाळा, ११ वसतीगृहे, ०५ माध्यमिक शाळा, ०४ कनिष्ठ महाविद्यालये, ०४ वरिष्ठ महाविद्यालये सुरू झाली.

कर्मवीर दादासाहेब बिडकर यांच्या निधनानंतर संस्थेची संपूर्ण धुरा डॉ. विजय बिडकर यांनी समर्थपणे घेतली. सडेतोडपणा, बहुश्रुत वाचनाचा व्यासंग, धैर्याला सामोरा जाणारा स्वभाव, प्रसिद्धीपराङमुख, दूरदृष्टी व नवीनतेचा स्वीकार यामुळे डांग सेवा मंडळाने कात टाकली. नवीन अद्ययावत इमारती व परिपूर्ण ग्रंथालये उभी राहिली. सुसज्ज नवीन इमारती उभारण्यावर त्यांनी भर दिला. संस्थेचे सर्व धोरणात्मक निर्णय त्यांच्या संमतीशिवाय होत नसत. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत निर्मला लोककल्याण प्रबोधनी नाशिक संस्थेने त्यांना ‘निर्मला’ पुरस्काराने सन्मानित केले. पेठ तालुक्यात आदिवासी रूग्णांची नि:स्पृह आरोग्य सेवा करणारे डॉ. विजय बिडकर यांचे ०४ ऑक्टोबर २०१७ रोजी दु:खद निधन झाले. दादासाहेबांनंतर त्यांची पोकळी भरून काढणारा हा समाजसेवक हरपल्यामुळे डांग सेवा मंडळाची अपरिमित हानी झाली. डॉ. विजय बिडकर आज आपल्यात नसले तरी त्यांच्या पत्नी डांग सेवा मंडळाच्या अध्यक्षा हेमलता बिडकर, त्यांच्या कन्या संस्थेच्या सचिव सौ. मृणाल जोशी, त्यांच्यामागे खंबीरपणे उभे असलेले उपाध्यक्ष दामोदर ठाकरे व इतर पदाधिकारी, संस्थेचे सर्व सेवक हे डॉ. विजय बिडकर यांचे कार्य पुढे चालू ठेवून त्यांचा समाजकार्याचा नंदादीप असाच तेवत ठेवला आहे.

***

## ✻ धुम्रपान जो कोणी करी ✻

धुम्रपान जो कोणी करी
तो मग जाई मरणाच्या द्वारी ।।धृ।।
तोड जळते गाल बसते
तंबाखुंचा घेता फुफके
हाड वाळते रक्त नासते
वंशाचा दिवा होईल का सोन्या परी ।।१।।
त्यांना सांगा, त्यांना बोला
काका, मानाना कळवा
प्रेम करा या संसाराला
सोडा तंबाखुच्या व्यसनाला ।।२।।
आगमन झाले २१ व्या शतकापरी
गाव-गाव अन् शहरो शहरी
धुम्रपान दिस हा १ जानेवारी
आरोग्याची ज्योत लावा दारोदारी ।।३।।
धुम्रपान जो कोणी करी
तो मग जाई मरणाच्या द्वारी ।

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

## ✻ अंधश्रद्धा ✻

आंधळीच श्रद्धा आणि आंधळे रिवाज ।
युगे युगे जपतो आहे आंधळा समाज ।।धृ।।
देव्हाऱ्यात दगडोबाची भक्ती भावे पुजा
माणसात माणसाने केला भाव दुजा
जप-तप करतो कोणी पढतो नमाज ।।१।।
सत्य काय सांगत असता, आजचे विज्ञान
चंद्रग्रहणात वेडे, करतात स्थान
जाईनाथ बाई करा किती ही ईलाज ।।२।।
पिंडदानासाठी ठरतो, कावळाच बाप
गंगामध्ये न्हाता म्हणती जाई सारे पाप
बह्मपुत्रा हस्ते घेती सर्व काही काज
मानतात देवाजीने केले चार वर्ण
वर्ग व्यवस्थेचे, त्यावर चढवून स्वर्ण
किर्तनात दृष्टीताने सांगे, महाराज
धर्म कर्म कांडावरती, करताच हल्ला
दुखावल्या भावना या, करितात गिल्ला
राम देश, एकतेला हेचि धोकेबाज

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

## ✻ गीत ✻

बाळ्या येड्या रताळ्या खाऊ नकोरे गुटखा
होईल टिबी कॅन्सर नाही यातून सुटखा
बाळ्या येड्या रताळ्या खाऊ नकोरे गुटखा
बाळ्या येड्या रताळ्या खाऊ नकोरे गुटखा
गुटख्यामुळे तुझे रे होतील भलतेच हाल
जीभ ही सडेल सारि सडतील गोरे गाल
बाळ्या येड्या रताळ्या खाऊ नकोरे गुटखा
होइल टिबी कॅन्सर नाही यातून सुटखा

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

## * यशाच्या १० पायऱ्या *

**राहुल भोये**, S.Y.B.Sc.

यशासाठी प्रत्येक कामात एकाग्रता व काम करण्याच्या पद्धतीमधील रचनात्मक (क्रीएटिव्हीटी) या दोन गोष्टी फार महत्वाच्या ठरतात. तुम्ही एखादे काम किती मन लावून व इतरांपेक्षा कोणत्या वेगळ्या प्रकारे करता या गोष्टींवर तुमचे यश अवलंबून असते. नोकरीत प्रगती करण्यासाठी स्वत:मधील स्किल्स सतत वाढवत राहणे आवश्यक असते.

असे म्हटले जाते की, यशाची धुंदी डोक्यात जाऊ देऊ नये व अपयशासमोर मस्तक झुकवू नये या दोन्ही प्रसंगी माणसाची खरी परिक्षा होते.

**१) तुमचे ध्येय हे सुस्पष्ट असावे –**

तुम्ही कोण आहात, काय आहात, तुम्हाला नेमके काय करावयाचे आहे, तुमची इच्छा काय आहे. जर या सर्व गोष्टी तुमच्या मनात स्पष्ट असतील तर तुमची यशाची पहिली पायरी सुनिश्चित होते. एकदा का तुमचे निश्चित ध्येय ठरले की, त्यासाठी तुम्ही लायक आहात का असा विचार करा व त्या ध्येयासाठी आवश्यक असणारी जास्तीत जास्त कौशल्ये व स्किल्स अंगी बाणवून घेण्यासाठी कामाला लागा. आजचे जग स्पर्धेचे आहे. इतरांपेक्षा वेगळे ठरण्यासाठी तुमच्यातही काही तरी विशेष गुण असलेच पाहिजेत.

**२) शिकणे कधीच थांबवू नका –**

जीवनात प्रत्येकाने शिकण्याची प्रक्रिया शेवटच्या श्वासापर्यंत निरंतर चालू ठेवणे महत्वाचे ठरते. जेव्हा तुम्ही नव्या गोष्टी शिकण्याचे बंद करता तेव्हा तुमची प्रगती ठप्प होते. आपले काम एक आव्हान मानून ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करा.

**३) स्वत:मधील स्किल्स वाढवीत जा –**

तुमचे कम्युनिकेशन स्किलही उत्तम असणे आवश्यक असते, या बरोबरच सध्याच्या जेट युगातील नवनव्या तंत्रज्ञानाची अद्यावत माहिती असणे व त्या माहितीचा व्यवहारात उपयोग करून घेण्यासाठी तुमचे ज्ञान सतत अपडेट करीत राहणे फाय गरजेचे आहे. लक्षात ठेवा थांबला तो संपला सतत काही तरी भरीव काम करत राहा.

**४) धैर्य सोडू नका –**

नोकरी शोधताना बऱ्याच अडचींचा सामना करावा लागतो. अशा वेळी निराशा झटकून धैर्य कायम राखणे महत्वाचे ठरते. धैर्य व सकारात्मक विचारसरणी या द्वारे नोकरी वा व्यवसाय यात तुम्ही नक्कीच यशस्वी होऊ शकता.

**५) स्वत:चे नेटवर्क उभारा –**

सोशल साईटसच्या माध्यमातून लोकांशी संपर्क वाढवा. यामुळे तुमचे नेटवर्क मजबूत बनेल. या नेटवर्कचा फायदा तुम्हाला चांगली नोकरी शोधण्यासाठी वा व्यवसायात पुढे जाण्यासाठी गुडविल म्हणून नक्कीच होईल वेगवेगळ्या साईट्स सर्च करीत राहा व नवनव्या नोकरी व्यवसायाच्या संधी शोधत राहा.

**६) प्रवासही महत्वाचा आहे –**

प्रवासामुळे नवे जग, नवे विचार, कामाच्या पद्धती बघायला मिळतात स्वप्ने हे तरूणांचे भांडवल असते. तुमच्या स्वप्नांमध्ये प्राण ओता.

**७) साहस –**

असे म्हणतात की, धोका पत्कारल्याशिवाय यश मिळत नसते. यासाठी साहस बाळगण्याची गरज असते. जेव्हा कमी वेळेत जास्त काम करून दाखवायचे असते तेव्हा हे साहसच तुमच्या मदतीला धावून येते.

**८) स्वत:ची लायकी वाढवीत राहा –**

यशासाठी सर्वात महत्वाचे म्हणजे त्यासाठी लायक बनणे, तुमच्या योग्यतेतच जर काही त्रुटी वा दोष असतील, तर तुमची प्रगती रोखली जाते यासाठी सतत प्रयत्न करीत राहा कधीही हार मानू नका.

**९) दबाव सहन करण्याची सवय –**

जॉबमध्ये जेव्हा तुम्ही वरच्या पोस्टवर जाता व व्यवसायात नवी नवी शिखरे गाठता, तेव्हा तुमच्यावर कामाचा व जबाबदारीचा वाढतो दबाव येत असतो. तुमच्या मार्गात अडथळे आणण्यासाठी तुमचे शत्रू टपूनच बसलेले असतात या अडथळ्यांवर मात करून व वाढत्या दबावाला तोंड देऊन पुढे जायला शिका.

**१०) सतत अभ्यास –**

तुमच्या यशाची कहाणी ही जर तुम्ही तुमच्या कार्यक्षेत्राचा सतत अभ्यास केला तरच यशस्वी होऊ शकते, तुम्ही स्वत:च्या कार्यक्षेत्रा बद्दलची जेवढी जास्त माहिती मिळवाल तेवढी तुमच्या यशाची शक्यता जास्त वाढती राहिल. तुमच्या कार्यक्षेत्रातील सर्व घटना, होणारे बदल व नवनवे तंत्रज्ञान या सर्व गोष्टींची माहिती घ्या व शिकतही राहा

रात्र नाही स्वप्न बदलते
दिवा नाही वात बदलते
मनात अशा असावी जिंकण्याची
कारण नशीब बदलो न बदलो
पण वेळ नक्कीच बदलते !

* * * * * * * * * * * *

# वार्षिक अहवाल

२०२४–२०२५

## ✻ मराठी विभाग – वार्षिक अहवाल (२०२४–२५) ✻

**डॉ. विजय बिडकर महाविद्यालय अभोणे येथे मराठी विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले.**

दि.०५/०७/२०२४ कळवण महाविद्यालयात मुलाखतीसाठी विषय तज्ज्ञ म्हणून काम केले.

दि. २२/०७/२०२४ डांग सेवा मंडळ कार्यालयात मराठी विषयाच्या प्राध्यापक निवडीसाठी विषय तज्ज्ञ म्हणून काम केले.

दि.०५/०७/२०२४ 'बेटी बचाव बेटी पढाव' याअंतर्गत निबंध स्पर्धा घेण्यात आली.

दि.०५/०७/२०२४ डॉ. जे. डी. पवार फार्मसी महाविद्यालयात आयोजित नॅक संदर्भात चर्चासत्रात सहभाग घेतला.

दि. ०८ ऑगस्ट २०२४ रोजी मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन दिंडोरी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. तुकाराम भवर यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. आर. एम. पगार यांचा ऑक्टोबर २०२४ मध्ये रिसर्च पेपर पब्लिश झाला.

दि. १३/०९/२०२४ हरसुल महाविद्यालयात आयोजित इंटरनॅशनल कॉन्फरन्स मध्ये सहभाग घेतला.

दि. २७/०९/२०२४ स्वच्छता अभियान अंतर्गत निबंध स्पर्धा घेण्यात आली.

दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी वाचन प्रेरणा दिनानिमित्त पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

दि. १०/०१/२०२५ मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त सार्वजनिक वाचनालय अभोणे व मराठी विभागाच्या वतीने निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली.

दि. २७/०२/२०२५ मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त निबंध स्पर्धा व कार्यक्रम घेण्यात आला.

दि. ०३/०१/२०२५ डॉ. आर. एम. पगार यांनी ऑनलाइन इंटरनॅशनल सेमिनार मध्ये सहभाग घेतला.

दि. ०८/०३/२०२५ डॉ. आर. एम. पगार यांनी नॅशनल वेबिनारमध्ये सहभाग घेतला.

सार्वजनिक वाचनालय अभोणे व डॉ. विजय बिडकर सार्वजनिक वाचनालय चणकापूर यांच्याशी मराठी विभागाचा सामंजस्य करार MOU करण्यात आला.

महाविद्यालयात डॉ. विजय बिडकर आंतर महाविद्यालयीन निबंध स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी निबंध पाठवून सहभाग नोंदविला.

मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रवींद्र पगार व प्रा. किरण गायकवाड यांनी विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय सेमिनार मध्ये सहभाग घेऊन संशोधन पेपरचे वाचन केले. तसेच यूजीसी मान्यता प्राप्त रिसर्च जर्नल मध्ये संशोधन पर पेपर पाठविले त्यांची ते प्रकाशिततही झाले आहेत.

**प्रा. डॉ. रवींद्र पगार** – मराठी विभाग प्रमुख

✻✻✻

## * विज्ञान विभाग वार्षिक अहवाल २०२४-२५ *

डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात अभोना येथील विज्ञान विभाग २०२१-२२ पासून कार्यरत आहे. महाविद्यालयात विज्ञान हा विषय विशेष स्तरावर शिकवला जातो. तसेच पदवीधर स्तरावर देखील विज्ञान विषय शिकवला जात असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विभागाचे विशेष प्रयत्न आहे. विज्ञान विभागाने २०२४-२५ या वर्षात यशस्वीपणे विविध उपक्रम राबविते. विद्यार्थ्यांनचा सक्रीय सहभाग आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे विभागाची शैक्षणिक गुणवत्ता वाढली आहे.

१) दिनांकः १४/०८/२०२४ विज्ञान विभागातंर्गात महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना (NEP-2020) च्या प्रमुख वैशिष्ट्याची माहिती देणे, धोरणाची गरज, उपयोग आणि त्याचा शिक्षण क्षेत्रावर होणारा परिणाम याची स्पष्ट समज देणे.

२) दिनांक: ०६/०९/२०२४ रोजी विज्ञान विभागातंर्गात महाविद्यालयात विज्ञान मंडळाचे उदघाटन करण्यात आले. विज्ञान विभागाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची आवड निर्माण करणे, प्रयोगशीलता वाढवणे आणि वैद्यानिक दृष्टीकोन विकसित करणे हा आहे. या वर्षी विभागाने विविध उपक्रम स्पर्धा आणि जैवविविधता या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले व विद्यार्थाचा सहभाग सुनिश्चित केला.

३) दिनांक : १९/०९/२०२४ रोजी विज्ञान विभागातंर्भात महाविदयालयात रानभाज्या प्रदर्शनचे आयोजित करण्यात आले. रानभाज्या हे ग्रामीण जीवनाचा एक महत्वाचा भाग आहेत. त्यामध्ये औषधी गुणधर्म, पोषणमूल्य आणि स्थानिक लोकजीवनाशी असलेली यनिष्ट नाळ लक्षात येता विद्यार्थ्यांना रान भाज्यांची माहिती व्हावी आणि त्यांचे संवर्धन व्हावे या उद्देशाने महाविद्यालयात रानभाज्या प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

४) दिनांक : २०/०९/२०२४ रोजी विज्ञान विभागातंर्गात महाविदयालयात स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. विज्ञान विभागा मार्फत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ २० सप्टेंबर २०२४ रोजी महाविद्यालयात विजयश्री सभागृहात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन

विज्ञान विभागाने केले.

५) दिनांक : ०३/०१/२०२५ रोजी विज्ञान विभागातंर्गात महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालायचे प्राचार्य डॉ. एस. के. ममरे. सर व विभाग प्रमुख एव. आर. राजभोज यांनी सावित्रीबाई फुले यांचा त्यांचे कार्य व महत्व आणि विचार त्याच बरोबर जीवन परिचय करून दिला.

६) दिनांक : २१/०१/२०२५ रोजी विज्ञान विभागातंर्गात महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) जनजागृती कॅम्पस टूर या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सावत्रीबाई फुले पुणे विद्यापीठा नुसार डॉ. विजय बिडकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे येथे महाविद्यालयाच्या परिसरात केंम्पूस टूर या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात सर्वे शाखेच्या विषया संबंधीत पोस्टर प्रदर्शन अस्वण्यात आले कॅम्पूस टूर साठी महाविद्यालयीन परिसरातील जनता विद्यालय व कनिष्ट महविद्यालय अभोणे येथील एकूण २०० विद्यार्थ्यांनी मेट दित्ती.

७) दिनांक : २८/०२/२०२५ रोजी विज्ञान विभागातंर्भात महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा करण्यात आला. दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी भारतात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित कळवण महाविद्यालय येथील प्रा. डॉ. चंदना इंगळे मॅडम यांनी सी. व्ही. रमन यांच्या खडतर प्रवासाचे वर्णन करून विज्ञानाला कशा प्रकारे वारसा मिळवून दिला या बद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

८) दिनांक : ०८/०३/२०२५ रोजी विज्ञान विभागातंर्भात महाविद्यालयात ''महिला दिन'' प्रेरणेचा एक दिवस. महाविद्यालयात जागतीक महिला दिनानिमित्त येथील विद्यार्थिनी अश्विनी भालेराव हिने नेट व सेट परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल तिवा सन्मान करण्यात आला. यावेळी अश्विनी भालेराव यांनी नेट व सेट परीक्षेसाठी घेतलेले परिश्रम व स्वतः अभ्यासासाठी कोणत्या पुस्तकाचा अभ्यास केला याबदल त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**प्रा. हर्षदा राजभोज**

विज्ञान विभाग प्रमुख

***

## DEPARTMENT OF HISTROY

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Dr. S. R. Thorwat | Professor | M. A. (Hist.), M. A. (Indo.) M. Phil., SET. | 24 Years | Full Time Permanent |
| Smt. L. K. Bagul | Asst. Prof. | M.A. (Hist.) Bed.<br>M.A. Marathi YCMOU<br>June - 25 First Class<br>**एकूण गुण ८२२/११००**<br>७४.७३ | 8 Year | Transfer Abhona coll. |

**Dr. S. R. Thorwat - Publication**

**1) Article**

✻ आदिवासी समाज संविधानिक तरतुदी आणि विकासाची चिकित्सा

✻ महाराष्ट्रातील १८५७ चा पेठ (नाशिक) मधील देवाजी राऊत संघर्ष

✻ Ass-curse Stone (Gadhegal) The Rethinking as a Warrior Stone

✻ सरदार पटेल आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, कर्तुत्व आणि तत्वज्ञानाचा तौलनिक अभ्यास

**2) Book-YCMOU**

✻ सिनेमा आणि क्रिकेट ✻ स्वातंत्र्याचा लढा

✻ राष्ट्रीय चळवळीचे विभिन्न आयाम

**3) Deliverd Lecture**

✻ Social Science, Inauguration ✻ Career Personality Dev.

✻ Fort Conservation

**4) Attending Program**

✻ शरद पाटील यांचे विचार ✻ IKS Teaching Workshop

**5) Dept. Activites**

✻ शिवजयंती व्याख्यान ✻ शिवजयंती रांगोळी व निबंध स्पर्धा

**६) शैक्षणिक सहल आयोजन**

✻ ओंकारेश्वर, इंदोर, उज्जैन.

**7) Work Committee**

✻ IQAC-NAAC

✻✻✻

## ※ अर्थशास्त्र विभाग– वार्षिक अहवाल २०२४–२५ ※

डॉ. विजय बिडकर कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात अभोणा येथील अर्थशास्त्र विभाग १९९७–९८ पासून कार्यरत आहे. महाविद्यालयात अर्थशास्त्र हा विषय विशेष स्तरावर शिकवला जातो. तसेच पदव्युत्तर स्तरावर देखील अर्थशास्त्र विषय शिकवला जात असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विभागाचे विशेष प्रयत्न आहे. शैक्षणिक वर्ष २०२४–२५. अर्थशास्त्र विभागाचे काही उल्लेखनीय उपक्रम खालील प्रमाणे आहे.

१) लोकनेते डॉ. जे. डी. पवार फार्मसी कॉलेज मानूर मधील NEP 2020 जनजागृती व अंमलबजावणी या कार्यशाळेत दिनांक ०५/०७/२०२४ रोजी सक्रिय सहभाग डॉ. सुरेश के. मगरे यांनी सहभाग घेतला.

२) डांग सेवा मंडळ नाशिक मध्ये आयोजित सहाय्यक प्राध्यापकाच्या मुलाखतीसाठी अर्थशास्त्र विषयासाठी विषय तज्ञ म्हणून दि. २२/०७/२०२४ रोजी डॉ. सुरेश के. मगरे यांनी कामे पाहिले.

३) अर्थशास्त्र आणि वाणिज्य विभागामार्फत दि. ०८/०८/२०२४ रोजी अर्थशास्त्र आणि वाणिज्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला.

४) डॉ. सुरेश के. मगरे यांची CAS अंतर्गत दि. २४/०८/२०२४ रोजी Professor Academic level 14 वर पदोन्नती करण्यात आलेली आहे.

५) मा. अध्यक्षा हेमलता ताई बिडकर डांग सेवा मंडळ नाशिक यांनी दिनांक ०६/११/२०२४ पासून डॉ. विजय बिडकर महाविद्यालयाचे प्रभावी प्राचार्य म्हणून डॉक्टर सुरेश के. मगरे याची नेमणूक करण्यात आली.

६) IEA - Annual Conference 2024 जयपुर राजस्थान मध्ये दि. २९–३०–३१ डिसेंबर २०२४ रोजी Research Paper Presented On (Cyber Crime & Online Transaction - Challenge & Solution) By Dr. Suresh K. Magare.

७) दि. १२/०२/२०२५ रोजी आदिवासी सेवा समिती नाशिक संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मानूर येथे NSS विभागाच्या वतीने आयोजित डॉ. सुरेश के. मगरे यांनी मूल्य शिक्षण अंतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळेत व्याख्यान दिले.

८) KVNNSPI चे कला व वाणिज्य महाविद्यालय दिंडोरी येथे Research Methodology -nd Research project या विषयावर व्याख्यान दि. ०४/०३/२०२५ रोजी डॉ. सुरेश के मगरे यांनी दिले.

**डॉ. एस. के. मगरे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

***

## वाणिज्य विभाग वार्षिक अहवाल : २०२४–२५

शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या कालावधीत वाणिज्य विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक व विद्यार्थी केंद्रित कार्यक्रम व उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आले. तसेच प्राध्यापकांनी ज्ञानवृद्धीसाठी विविध कार्यशाळांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. खाली या सर्व कार्यक्रम व उपक्रमांचा संक्षिप्त आढावा दिला आहे.

**⁕ विद्यार्थ्यांसाठी आयोजित कार्यक्रम :**

**१. वाणिज्य मंडळ उद्घाटन सोहळा –**

दिनांक ८ ऑगस्ट २०२४ रोजी वाणिज्य विभागाच्या वतीने वाणिज्य मंडळाचा उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास विभागप्रमुख, शिक्षकवृंद, विद्यार्थी प्रतिनिधी व मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमामधून शैक्षणिक वर्षातील विभागाच्या उपक्रमांची सुरुवात झाली.

**२. प्रथम वर्ष बी.कॉम. विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ –**

दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी प्रथम वर्ष बी. कॉम. वर्गातील नवीन विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांद्वारे नवागतांचे स्वागत केले. विभागप्रमुख, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २0२0 पोस्टर प्रदर्शन –**

दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर माहितीपूर्ण पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन केले. या प्रदर्शनात विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे पोस्टर्स विद्यार्थ्यांनी तयार केली. या प्रदर्शनाला महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, मान्यवर व विद्यार्थ्यांनी भेट दिली व विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

**प्राध्यापकांचा कार्यशाळांतील सहभाग :**

**१. कार्यशाळेतील सहभाग–**

लोकनेते डॉ. जे. डी. पवार कॉलेज ऑफ फार्मसी, मानूर येथे दिनांक ५ जुलै २०२४ रोजी आयोजित 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 जागृती व अंमलबजावणी' या कार्यशाळेसाठी वाणिज्य विभागाच्या प्रा. डी.एम. भोये, प्रा. आर. एस. चव्हाण व प्रा. एस. पी. महाले यांनी उपस्थिती दर्शविली.

**२. कार्यशाळेतील सहभाग –**

दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी श्री गुरुगोविंद सिंग इंजिनिअरिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, नाशिक येथे आयोजित 'स्टार्टअप अॅण्ड इनोव्हेशन सेल' या कार्यशाळेसाठी वाणिज्य विभागाच्या प्रा. डी. एम. भोये यांनी उपस्थिती दर्शविली.

वरील सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. या उपक्रमांद्वारे त्यांच्यात संघटन क्षमता, सृजनशीलता व सादरीकरण कौशल्ये विकसित होण्यास मदत झाली. या यशस्वी कार्यक्रमांद्वारे वाणिज्य विभागाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

**प्रा. देवयानी भोये**
वाणिज्य विभाग प्रमुख

***



**।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।**

# स्वर्गीय डॉ. परशराम वाघेरे

**(प्राचार्य, डॉ. विजय बिडकर महाविद्यालय, अभोणे)**

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियमित कार्यक्रम अहवाल (वर्ष–२०२४–२५)

डांग सेवा मंडळ नाशिक संचालित डॉ. विजय बिडकर कला वाणिज्य व विज्ञान महाविदयालय अभोणे ता. कळवण जि. नाशिक येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या १५० विदयार्थी संख्येच्या एककास विद्यापीठाने मंजुरी दिलेली आहे. एकूण ६८ मुले व ८२ मुली यांची निवड करण्यात आली. २३ जुलै २०२४ पासून राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित हस्ते नियमित कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना व तिचे उद्दिष्टे समजण्यासाठी उदबोधन शिबिर आयोजित करण्यात आले. विभागामार्फत आणि उपक्रम राबविण्यात आले.

दि. २६/६/२०२४ रोजी आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे देण्यात आले.

दि. १२/८/२०२४ रोजी 'हर घर तिरंगा' या उपक्रमा अंतर्गत अभोणे गावातून रॅली काढण्यात आली.

दिनांक ८/८/२०२४ रोजी 'एक पेड मा के नाम' या उपक्रमांतर्गत सामाजिक वनीकरण विभाग यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना ५०० फळझाड वृक्ष रोपांचे वाटप करण्यात आले.

दि.०८/०८/२०२४ रोजी 'जागतिक आदिवासी दिनानिमित्त प्रा. तुकाराम अवर यांचे 'आदिवासी संस्कृती' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

दि. १७/९/२०२४ स्वच्छता हीच सेवा' या उपक्रमांतर्गत रॅली काढण्यात आली. तसेच ग्रामीण रुग्णालय अभोणा येथील परिसराची स्वच्छता करण्यात आली.

दि.२४/९/२०२४ राष्ट्रीय सेवा योजना वधोपन दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे विद्यार्थ्यांना सांगण्यात आली.

दि. २७/९/२०२४ रोजी 'बेटी बचाव, बेटी पढाव' या उपक्रमांतर्गत निबंध स्पर्धा घेण्यात आली.

दि.२५/१०/२०२४ मतदार जागृती कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मतदान

करण्यासंबंधी जाणीव जागृती करण्यात आली

दि. २६/११/२०२४ रोजी संविधान दिवसा निमित्त प्रा. दिनेश हळदे यांचे 'संविधानाची ओळख' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

दि.१/१२/२०२४ रोजी 'जागतिक एड्स दिवस' निमित्त प्रा. डी.डी. हळदे यांचे 'एड्स जाणीव जागृती' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

दिनांक २३/१/२०२५ डॉ. अर्चना तोडे यांचे 'लिंग समानता' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. फेब्रुवारी २०२५ या महिन्यात 'संविधान गौरव महोत्सव' अंतर्गत निबंध स्पर्धा व संविधान वाचन कार्यक्रम घेण्यात आले. तसेच प्रा. डी.डी. हळदे यांच्या 'संविधानाची ओळख' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

दि. ८ मार्च २०२५, 'जागतिक महिला दिन' साजरा करण्यात आला. या सर्व कार्यक्रमांबरोबरच महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण, परिसराची स्वच्छता, रेली, प्लास्टिक मुक्त महाविद्यालय परिसर इत्यादी उपक्रमही राबविण्यात आले.

## विशेष हिवाळी श्रमसंस्कार

### शिबिर अहवाल

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मार्गदर्शनाखाली डांग सेवा मंडळाचे डॉ. विजय बिडकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे, ता. कळवण, जि. नाशिक राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर हे "Youth for any Bharat youth for digitial literacy" हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून चणकापूर ता. कळवण, जि. नाशिक या गावात दि. ०६/०१/२०२५ ते दि. १२/०१/२०२५ या कालावधीत यशस्वीरित्या संपन्न झाले. शिबिरात ३५ मुले व ४० मुली सहभागी झाल्या. दि. ०६/०१/२०२५ रोजी शिबिराचे उद्घाटन ग्रामपंचायतीचे प्रशासक प्रणव हिरे यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रामीण रूग्णालय अभोणा

यांच्या सहकार्याने अनेमिया तपासणी (४० विद्यार्थिनी) शिबिराचे आयोजन करण्यात आले. वैचारिक प्रबोधन अंतर्गत डॉ. एस. आर. थोरवत (दुर्ग संवर्धन) डॉ. एस. के. मगरे (आर्थिक साक्षरता) नरेश नावकर (वनसंवर्धन) दीपक सोनवणे (कृषी साक्षरता) डॉ. आर. एम. पगार (आपत्ती व्यवस्थापन) डॉ. एम. एन. पवार (युवा सबलीकरण) डॉ. डी. जे. नेरपगार (व्यक्तिमत्व विकास) प्रा. डी. डी. हळदे (पर्यावरण संवर्धन) यांनी मार्गदर्शन केले.

स्वयंसेवकांनी श्रमदानाच्या माध्यमातून खालील कामे केली.

१) हुतात्मा स्मारक परिसराची स्वच्छता.

२) ग्राम स्वच्छता केली.

३) वृक्षारोपणासाठी १५० खड्डे खोदले.

४) हुतात्मा स्मृती शिलालेख परिसराची स्वच्छता केली.

५) गावातील झाडांना रंगरंगोटी.

वरील कामांबरोबरच विविध विषयांवर प्रबोधनपर रॅली, ग्राम सर्वेक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रमही राबविण्यात आले. शिबिराचा समारोप दि. १२/०१/२०२५ रोजी मा. चंद्रशेखर जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी सर्व ग्रामस्थ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शिबिर यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. मगरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**प्रा. डॉ. आर. एम. पगार**

कार्यक्रम अधिकारी

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

***

# Report

## Department of English

English is taught at undrgraduate level in our college. The department of English always takes initiatives to eradicate fear of English from tribal students. Besides regular teaching-learning process, the department organizes various interesting activities like group discussions, classroom presentations and other interactive sessions. Students are always encouraged to use English at different situations without bothering about mistakes. They are also motivated to introduce themselves, their friend, and guests in English. They are also given tasks to propase a vote of thanks in english. Interviews skills are sharpened with the help of mock internews.

Dr. Dinkar Nerpagar, head of the department. Prof. Kiran Chaudhari is working in the department. He is pursuaing SET/NET. The department of English organized a certificate course in communication skills in English between 07/02/2025 to 03/03/2025 with a view to enable students to use English in everyday situations.

Dr. Dinkar Nerpagar presented a research paper in an international conference on **"NEP2020: Challenges in Implementation and Role of Teacher".** He has also published 'Paradigm Shift: Time to Change the Role of Teacher in Lang Lit, Online research journal with ISSN: 2349-5189 Impact Factor-5.61.

**प्रा. डॉ. डी. जे. नेरपगार**

इंग्रजी विभाग प्रमुख

***

## राज्यशास्त्र विभाग

राज्यशास्त्र विभागाअंतर्गत अध्यापनासोबतच इतरही उपक्रमांचे आयोजन केले होते.

१) संविधान दिनांक २६/११/२०२४ रोजी महाविद्यालयात संविधान दिन साजरा केला गेला यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. दिनेश हळदे यांनी भारतीय राज्यघटनेविषयी उपयुक्त माहिती ही दिली राज्यघटनेची प्रास्ताविका, मुलभूत हक्क, मुलभूत कर्तव्य यावर सखोल असं मार्गदर्शन केले.

२) राष्ट्रीय मतदार दिनांक २५/१/२०२५ रोजी राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनाचा कार्यक्रम महाविद्यालयात घेतला. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी करून मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी यावेळी प्रा. किशोर पवार यांनी आवाहन करून मार्गदर्शन केले.

३) दिनांक १५/१/२०२५ रोजी महाराष्ट्र शासन तंत्र शिक्षण विभाग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या परिपत्रकानुसार स्कुल कनेक्ट २.० संपर्क अभियान कार्यक्रम याचे आयोजन करण्यात आले होते. NEP 2020 ची अंमलबजावणीच्या अनुषंनागे विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलांबाबत विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने हे अभियान राबविले.

**प्रा. डी. डी. हळदे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख

***

## संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक व्याख्यानमाला

डांग सेवा मंडळ संचलित, डॉ. विजय बिडकर महाविद्यालय आणि पुणे विद्यापीठाचे बहि:शाल शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यामाने दिनांक ४/१२/२०२४ ते ६/१२/२०२४ दरम्यान संत गाडगेबाबा जेष्ठ नागरिक व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानमालेत पुढील वक्त्यांची व्याख्याने झालीत. १) श्री. संजीव अहिरे – 'संत कबीर जीवन दर्शन' ४/१२/२०२४, २) डॉ. रामचंद्र रसाळ – 'इस्राइल शेती तंत्रज्ञान' ५/१२/२०२४, ३) श्रीमती वृषाली सानप 'पहिली आदिवासी विद्रोही स्त्री – शबरी ६/१२/२०२४

***

## ग्रंथालय विभाग अहवाल

आजच्या स्पर्धात्मक युगात ग्रंथालयाचे महत्त्व अधिकाधिक वाढते आहे. ग्रंथालय ही एक वर्धिष्णू संस्था आहे. समृद्ध ग्रंथालय हा महाविद्यालयीन विविध घटकांपैकी ज्ञानसाधनेच्या दृष्टीने एक अविभाज्य घटक आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना ग्रंथांचा
जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी ग्रंथालय कार्य करीत असते. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेवून महाविद्यालयाने आपले ग्रंथालय समृद्ध केले आहे.

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून आजतागायत ग्रंथालयात एकूण ११८०० समृद्ध ग्रंथांचा संग्रह आहे. त्याची एकूण किंमत रुपये २२३९,८३२/– एवढी आहे. महाविद्यालयामध्ये शिकविल्या जाणाऱ्या विविध विषयांची क्रमिक पुस्तके, संदर्भ पुस्तके, विविध मान्यवरांचे चरित्र, प्रवासवर्णन, कथा, कादंबऱ्यांचा समावेश आहे. विविध प्रकारचे ज्ञानकोश, स्पर्धा परीक्षांना लागणारे संदर्भ इ. चा समावेश आहे. या सर्व वाचन साहित्याचा विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर यांना लाभ मिळतो आहे.

महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींकरता स्वतंत्र अभ्यासिका कक्ष सर्व सोयींनी युक्त उपलब्ध करून देण्यात आलेला आहे ग्रंथालयातील दर्जेदार वाचन साहित्याची वाढ व विकासामध्ये डांग सेवा मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती हेमलताताई बिडकर, संस्थेचे सचिव सौ. मृणालताई जोशी व प्राचार्य डॉ. एस. के. मगरे यांचे सतत मार्गदर्शन मिळत असते. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांना ग्रंथालय विभागाकडून जास्तीत जास्त सेवा देण्याचा प्रयत्न केला जातो आहे.

**प्रा. के. एच. पाटील**
**(ग्रंथपाल)**

***

## डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला

डांग सेवा मंडळ संचलित, डॉ. विजय बिडकर महाविद्यालय आणि पुणे विद्यापीठाचे बहि:शाल शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यामाने दिनांक २५/१०/२०२४ ते २७/१०/२०२४ दरम्यान **डॉ. बाबासाहेब जयकर** व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानमालेत पुढील वक्त्यांची व्याख्याने झालीत. १) डॉ. देवेंद्र साळवे 'महानायक सुभाषचंद्र बोस २५/१०/२०२४, २) डॉ. अभिमन बिरारी 'महात्मा फुले' २५/१०/२०२४, ३) डॉ. गिरीश पाटील 'सवयींविषयी बोलू काही' २५/१०/२०२४

***

## ''ज्ञान विज्ञान वाचन चळवळ व्याख्यानमाला''

डांग सेवा मंडळ संचलित, डॉ. विजय बिडकर महाविद्यालयात ज्ञान विज्ञान वाचन चळवळ व्याख्यानमाला दिनांक २२/०१/२०२५ ते २४/०१/२०२५ या कालावधीत संपन्न झाली. या व्याख्यानमालेत खालील वाक्यांची व्याख्याने झालीत. १) प्रा. सोमनाथ पावडे 'स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर २२/०१/२०२५, २) डॉ. अर्चना तोंडे 'करूणा गोखले लिखित बाईमाणूस २३/०१/२०२५, ३) डॉ. सीमा डेरले 'शिवाजी महाराजांचे चरित्र' २४/०१/२०२५

**प्रा. डॉ. डी. जे. नेरपगार**

विभाग प्रमुख

***

# विद्यार्थी विकास मंडळ वर्ष २०२४-२५

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अभोणा यांच्या संयुक्त विद्यमाने अभोणा महाविद्यालयामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना कार्यरत होती या अंतर्गत विद्यार्थिनींनी वेगवेगळी कामे केली.

### स्पर्धा परीक्षा व करिअर संधी कार्यशाळा

दिनांक ७/८/२०२४ रोजी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा व करिअर संधी यावर कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी आदिवासी संशोधन संस्था पुणे आणि डॉ. विजय बिडकर महाविद्यालय विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे या संस्थेचे नाशिक येथील प्रकल्प समन्वयक श्री. अविनाश शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करायची यावर मार्गदर्शन केले त्यावेळी त्यांनी नंदुरबार जिल्ह्यातील टीआरटीआयचे संचालक श्री. राजेंद्र भारूड यांचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी या क्षेत्राकडे वळले पाहिजेत तरच त्यांचे करिअर निश्चित घडेल असे त्यांनी यावेळी सांगितली. तसेच इतरही आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी प्रा. दिनेश हळदे यांनी केले तर आभार प्रा. किशोर पवार यांनी मानले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. बी. वाघेरे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी प्रा. दिनेश हळदे यांनी केले.

## भारतीय भाषा उत्सव संपन्न

दिनांक ११/१२/२०२४ रोजी महाविद्यलयात भारतीय भाषा उत्सव अंतर्गत महाविद्यालयातील प्रा. किशोर पवार यांनी यावेळी मार्गदर्शन केले. महाकवी सुब्रमण्यम भारती यांच्या जयंती निमित्त शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग शिक्षण मंत्रालय भारत सरकार यांच्यातर्फे दिनांक ४ ते ११ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये भारतीय भाषा उत्सव सप्ताह साजरा करण्यात येत आहे. यावर्षी भाषांच्या माध्यमातून एकता ही थीम आहे. हा उत्सव महाकवी भारती यांना श्रद्धांजली देण्यासाठी आणि आपल्या राष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत अंतर्भूत असलेल्या भाषिक विविधतेचा प्रचार व

प्रसार आणि उत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येत आहे असे यावेळी प्रा. पवार यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. सुरेश मगरे यांनी आपल्या मनोगतातून आपले भाषा व जात यांचे राजकारण कसे केले जाते याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमांचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी प्रा. दिनेश हळदे यांनी केले.

## निर्भय कन्या अभियान कार्यशाळा

अभोणा येथील डांग सेवा मंडळाच्या डॉ. विजय बिडकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने निर्भय कन्या अभियान अंतर्गत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेसाठी प्रथम सत्रात कळवण तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. राकेश हिरे यांनी हिंसाचार व महिला सक्षमीकरण यावर बोलताना कौटुंबिक हिंसाचारामध्ये महत्वाची कलम कोणती आहेत. कौटुंबिक हिंसाचार हा कसा होतो आणि त्याला जबाबदार कोण आहेत. अजा कौटुंबिक हिंसाचार फार वाढला आहे. आपलीच घरातील व्यक्ती कौटुंबिक हिंसाचारात समाविष्ट असलेल्या आपल्याला दिसून येते आणि दुसऱ्या सत्रात स्त्री–पुरुष समानता या विषयावर ॲड. श्रीमती अश्विनी राऊत यांचे व्याख्यान झाले यावेळी त्यांनी स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये कसा फरक केला जातो आपल्याला स्वातंत्र्य मिळून एवढे दिवस झाले तरीही स्त्रियांना दुय्यम प्रकारचे वागणूक दिली जाते हे त्यांनी विविध उदाहरणे देऊन स्पष्ट करून सांगितले.

तिसऱ्या सत्रात स्त्री आणि स्वसंरक्षण यावर कळवण महाविद्यालयातील प्रा. डॉ. हेमा मांडे यांचे व्याख्यान झाले यावेळी बोलताना त्यांनी मुलींनी स्वतःचे संरक्षण केले पाहिजे यासाठी आपण स्वतः स्वसंरक्षणासाठी काही गोष्टी बरोबर वापरल्या पाहिजे असे सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर पवार यांनी केले आणि प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. दिनेश हळदे यांनी केले आणि आभार प्रा. श्रीमती निकिता पवार यांनी मानले.

आधी स्वप्न पाहा नंतर त्या स्वप्नांचा पाठलाग करा, तरच यश तुमच्या मागे येईल, असे प्रतिपादन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे प्रकल्प समन्वयक अविनाश शिरसाठ यांनी केले.

येथील डांग सेवा मंडळ संचलित डॉ. विजय बिडकर महाविद्यालयात आदिवासी संशोधन

प्रशिक्षण संस्था आणि डॉ. विजय बिडकर महाविद्यालय विद्यार्थी विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने शासकीय योजने अंतर्गत झालेल्या ''स्पर्धा परीक्षा व करिअर संधी'' कार्यशाळेत ते बोलत होते.

श्री. शिरसाठ म्हणाले, उच्च शिक्षण घेऊन बेरोजगारी वाढली आहे. हे विचारात घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपण कुठे कमी पडत आहोत, हे प्रथम शोधलं पाहिजे, स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असताना तुमचे ध्येय आत्ताच निश्चित करा. तरच तुम्हाला त्याचा फायदा करून घेता येईल. असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. परशराम वाघेरे यांनी स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल, तर वाचन केले पाहिजे. मरगळ झटकून कामाला लागले पाहिजे असे आवाहन केले. विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. दिनेश हळदे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. प्रा. किशोर पवार यांनी आभार मानले.

## शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंग केल्यास कारावासाची शिक्षा !

जो कुणी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शैक्षणिक संस्थेच्या आत किंवा बाहेर रॅगिंगचा अपराध करतो, त्यात भाग घेतो, प्रोत्साहन देतो किंवा त्याचा प्रचार व प्रसार करताना आढळतो, त्यास दोन वर्ष सश्रम कारावास व दंड होतो. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील नियमांचे काटेकोरपणे पालन करून शिस्त राखणे गरजेचे आहे. तसेच अध्ययनात लक्ष घालून करिअरकडे लक्ष द्यावे, असे आवाहन सहाय्यक पोलिस निरीक्षक यशवंत शिंदे यांनी केले. येथील डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळातर्फे रॅगिंग प्रतिबंधक सप्ताह निमित्त रॅगिंग प्रतिबंधक कायदा पोलीस निरीक्षक यशवंत शिंदे यांचे व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. परशराम वाघेरे होते. प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. दिनेश हळदे यांनी केले.

**प्रा. डी. डी. हळदे**
विद्यार्थी विकास अधिकारी

***

# जिमखाना विभाग अहवाल वर्ष २०२४–२५

दरवर्षीप्रमाणे २१ जून आंतरराष्ट्रीय 'योगा' दिवस साजरा केला. दरवर्षी प्रमाणे यावर्षी म्हणजे २०२४/२५ मध्ये आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत विविध खेळात सहभाग नोंदवला त्यात क्रॉसकन्ट्री या खेळात संजना गावित ही विद्यार्थिनी अहिल्यानगर मिरजगाव येथे विभागिय पातळीवर खेळून आली. तसेच ४०० मि. रनिंग या खेळात रंजना चव्हाण ही विद्यार्थीनी सावित्रीबाई पुणे विद्यापिठात आपल्या महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले. हातोडाफेक या खेळात गोधडे नंदिनी, तर गोळाफेक या खेळात रोशन ठाकरे हा विद्यार्थी प्रथम आला. त्याचप्रमाणे थाळीफेक या प्रकारात गौतमी पवार ही विद्यार्थिनी द्वितीय आली. तर ११० मि. मध्ये हर्डल्स या प्रकारात द्वितीय सागर कोल्हे, खो–खो या खेळात ज्योत्सना वाघ Stand by सिलेक्शन झाले.

त्याचप्रमाणे इंट्रामोरल स्पर्धा घेतल्या त्यात गोळा फेक या प्रकारात जयश्री बहिरम् प्रथम आली, शिवाली वर्मा द्वितीय तर मुलांमध्ये संकेत चव्हाण प्रथम आला व राहुल भोये द्वितीय आला. रनिंग या खेळात सागर कोल्हे प्रथम आला तर सागर बोरसे द्वितीय आला. मुलीमध्ये संजना गावित ही प्रथम आली. त्याचप्रमाणे व्हॉलीबॉल संघ M.A. चा वर्ग विनर झाला व कबड्डी या खेळात F.Y.B.A. चा संघ विजयी झाला.

महाविद्यालयात ''शारिरीक क्रीडा दिन'' साजरा करण्यात आला. कार्यशाळा आयोजित करण्यात आली त्या एकदिवसीय कार्यशाळेच्या प्रमुख व्याख्याते डॉ. अरूण शिंदे सर होते तर डॉ. गोकुळ काळे, डॉ. रविंद्र चव्हाण, व श्री. माणिक भोये या चारही जणांनी आपल्या ओघवत्या शैलीमधुन विद्यार्थीना खिळवून ठेवले व सखोल ज्ञानदानाचे कार्य त्याच्यांकडून घडून आले.

या महाविद्यायाच्या शारिरीक शिक्षण संचालिका डॉ. पवार मीना निवृत्ती, यांना भारत सरकारचे पेटेंट मिळाले, ''ऑटोनोमस लाईन मार्किंग रोबोट फॉर प्रिसिजन स्पोर्टस् फिल्ड मार्किंग'' या विषयावर केले.

श्रीमती डॉ. पवार मीना निवृत्ती यांना आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ''पीस आणि स्पोर्टस्'' अवार्ड २०२५ फेब्रुवारी १४.

व्हीएतनाम येथे झालेल्या आतंरराष्ट्रीय परिषदेमध्ये डॉ. पवार मीना निवृत्ती यांना ''इंटरनॅशनल एज्युकेशनल एस्कलन्स'' अवार्ड २०२५ हा देवून गौरविण्यात आले. हो-चि-मिन्ह या शहरात व व्हीएतनाम या देशातमध्ये.

डॉ. पवार मीना निवृत्ती यांचे २०२४-२५ या वर्षी पुस्तक प्रकाशित झाले त्याचे नाव Fundamentals of Sports Training.

शिरपूर धुळे येथे झालेल्या परिषदेपध्ये त्यांना डॉ. पवार मीना निवृत्ती यांना Keynote Speaker म्हणून व Chari Person म्हणून त्यांना बहुमान मिळाला. तसेच याच परिषदेत त्यांनी Paper-Reading केले व त्यांचा लेख Universal Research Analysis ISSN July 2024 to Dec. 2024 या Research Journal मध्ये प्रसिद्ध झाला Impact Factor 6.20 आहे.

व्हीएतनाम येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये डॉ. पवार मीना निवृत्ती यांना त्यांचा पेपर सादर केला पेपरचे नांव The Role of Sports Communication In Modern Society International workshop on Yoga attendance certificate. World Society for peace Sports Workshop on Sports for Peace 2025 Certificate to Participate.

**डॉ. मीना निवृत्ती पवार**

**जिमखाना विभाग प्रमुख**

***

## यशवंतराव मुक्त विद्यापीठ, नाशिक

## अभ्यासकेंद्र अहवाल

डांग सेवा मंडळाचे, डॉ. विजय बिड़कर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणा (अभ्यासकेंद्र संकेतांक ५४१११) येथे जुन २००१ पासून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कला (G01 B.A.) शाखेचे अभ्यासकेंद्र सुरु

मुक्त विद्यापीठात लवचिक व्यवस्था असल्याने टीसी, एलसीची आवश्यकता नसते. विद्यार्थी एकाच वेळी दोन शिक्षण क्रम पूर्ण करू शकतात, त्याचा फायदा या स्पर्धात्मक युगात होतो. विद्यार्थ्यांना आपल्या सोयीच्या वेळेनुसार अभ्यास करण्याची मुभा आहे. या विद्यापीठाच्या पदव्यांना यूजीसी आणि राज्यसरकारची मान्यता आहे. त्यामुळे मुक्तविद्यापीठाच्या पदवी घेतल्यास एमपीएससी आणि यूपीएससी या स्पर्धात्मक परीक्षा देता येतात.

आमच्या अभ्यासकेंद्र अंतर्गत या पंचक्रोशीतील सरासरी ८०० विद्यार्थी दरवर्षी प्रवेशित शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम वर्ष कला मध्ये २७४, द्वितीय वर्ष कला मध्ये १५१, तर तृतीय वर्ष कला मध्ये विद्यार्थी प्रवेशित होते. यामध्ये ४४१ मुले आणि २७० मुली असे प्रमाण होते. आमच्या अभ्यासकेंद्राच्या निकालाची उज्ज्वल परंपरा आम्ही कायम राखली आहे. या अभ्यास केंद्रातील शिक्षण पूर्ण करून गेलेले बरेच विद्यार्थी शासकीय व निमशासकीय सेवेत आहेत.

या अभ्यासकेंद्र विभागात केंद्र प्रमुख म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ. एस. के. मगरे, केंद्र संयोजक के. पी. पवार व केंद्र सहाय्यक म्हणून श्री. सागर वाणी, शिक्षकेतर कर्मचारी म्हणून श्री. विष्णु बागुल काम पाहतात.

**प्रा. के. पी. पवार**

**केंद्र संयोजक**

***

## * सांस्कृतिक विभाग अहवाल २०२४–२५ *

डांग सेवा मंडळ नाशिक संचालित डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे येथे 'विजयोत्सव' वार्षिक स्नेहसंमेलन व गुणगौरव समारंभ उत्साहात संपन्न झाला. सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन डांग सेवा मंडळ संस्थेच्या अध्यक्षा हेमलताताई बिडकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बक्षीस वितरण कार्यक्रमात महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांना सत्कार प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी हेमलताताई बिडकर यांनी मार्गदर्शन केले. विविध उपक्रमांचे खालील प्रमाणे नियोजन करण्यात आले.

दि. ०३/०३/२०२५ – विविध क्रीडा स्पर्धा.

दि. ०४/०३/२०२५ – पारंपरिक वेशभूषा दिन

दि. ०५/०३/२०२५ – बॉलीवूड डे, ब्लॅक अॅण्ड व्हाईट डे

दि. ०६/०३/२०२५ – रांगोळी स्पर्धा, आनंद मेळा

दि. ०७/०३/२०२५ – वार्षिक स्नेहसंमेलन आणि बक्षीस वितरण

'विजयोत्सव' या विविध कला गुणदर्शन सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य, नाटिका, गीत गायन करून उपस्थितांचे मनोरंजन केले. जिमखाना विभाग प्रमुख डॉ. मीना पवार यांनी विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

**प्रा. डॉ. रवींद्र पगार**

सांस्कृतिक विभाग प्रमुख

***

## * प्रसिद्धी विभाग *

महाविद्यालयास शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर इतर अभ्यासानुवर्ती कार्यक्रम वर्षभर राबविले जातात. या सर्व कार्यक्रमांना लोकांसमोर आणण्याचे काम प्रसिद्धी विभाग करत असतो. महाविद्यालयात वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना छायाचित्रांसह वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्धी दिली जाते. आमच्या वर्षभराच्या कार्यक्रमांना प्रसिद्धी देणारे दै. सकाळ, दै. गांवकरी, दै. लोकमत, दै. दिव्य मराठी, दै. देशदुत, दै. आपलं राज्य आदि संपादकांचे व स्थानिक पत्रकार, श्री. किरण सुर्यवंशी, श्री. चेतन हिरे, श्री. देवेंद्र ढुमसे, श्री. सचिन मुठे, श्री. पद्मभुषण शहा, श्री. सुभाष शहा, श्री. रवींद्रकुमार जाधव यांचे आम्ही मनापासून आभारी आहोत.

**प्रा. डॉ. रवींद्र पगार**
प्रसिद्धी विभाग प्रमुख

## * आयुष्य जगण्याची सोपी पद्धत * ***

आयुष्य जगण्याची आपली सोपी पद्धत हवी
जिथे आपली कदर नाही,
तिथे कधीही जायचं नाही
जे आपल्याला पचत नाही
ते कधी खायचं नाही
जे खरं सांगूनही रागावतात
त्यांना मनवत बसायचं नाही
जे एकदा नजरेतून उतरले
त्यांचा त्रास करून घ्यायचा नाही
वेळ पाहुन बदलतो,
त्याला मित्र करायचं नाही
आणि कितीही संकटं आली तरी
कुणालाही घाबरायचं नाही.

* * * * * * * * * * * *

डांग सेवा मंडळ नाशिक संचलित

# डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे

## ✻ प्राध्यापक वृंद ✻

| | | |
|---|---|---|
| प्रोफे. डॉ. सुरेश कचरू मगरे | प्रभारी प्राचार्य | अर्थशास्त्र |
| प्रा. डॉ. श्रीहरी रामचंद्र थोरवत | प्राध्यापक | इतिहास |
| प्रा. डॉ. दिनकर जानकीराम नेरपगार | सहा. प्राध्यापक | इंग्रजी |
| प्रा. डॉ. श्रीमती मीना निवृत्ती पवार | क्रिडा संचालक | शारीरिक शिक्षण |
| प्रा. डॉ. रविंद्र मुरलीधर पगार | सहा. प्राध्यापक | मराठी |
| प्रा. कैलास हिम्मतराव पाटील | ग्रंथपाल | |
| प्रा. दिनेश दौलत हळदे | सहा. प्राध्यापक | राज्यशास्त्र |
| प्रा. भास्कर गोपाळ बोरसे | सहा. प्राध्यापक | मराठी |
| प्रा. किशोर पोपट पवार | सहा. प्राध्यापक | भूगोल |
| प्रा. मनोज निंबा सुर्यवंशी | सहा. प्राध्यापक | अर्थशास्त्र |
| प्रा. श्रीमती लता किसन बागुल | सहा. प्राध्यापक | इतिहास |
| प्रा. श्रीमती देवयानी मनोहर भोये | सहा. प्राध्यापक | वाणिज्य |
| प्रा. श्रीमती हर्षदा राजाराम राजभोज | सहा. प्राध्यापक | भौतिकशास्त्र |
| प्रा. श्रीमती निकीता राजेंद्र पवार | सहा. प्राध्यापक | अर्थशास्त्र |
| प्रा. श्रीमती रूपाली संजय चौधरी | सहा. प्राध्यापक | वाणिज्य |
| प्रा. श्रीमती सपना पंडित महाले | सहा. प्राध्यापक | वाणिज्य |
| प्रा. श्रीमती पुजा कैलास भालेराव | सहा. प्राध्यापक | अर्थशास्त्र |
| प्रा. चंद्रकांत लक्ष्मण मोराणकर | सहा. प्राध्यापक | गणित |
| प्रा. किरण जेजीराम चौधरी | सहा. प्राध्यापक | इंग्रजी |
| प्रा. श्रीमती श्रद्धा कारभारी पाटोळे | सहा. प्राध्यापक | रसायनशास्त्र |
| प्रा. सागर गोपीनाथ चव्हाण | सहा. प्राध्यापक | वनस्पतीशास्त्र |
| प्रा. यशराज रमेश चौधरी | सहा. प्राध्यापक | रसायनशास्त्र |
| प्रा. श्रीमती हर्षाली जिभाऊ ठाकरे | सहा. प्राध्यापक | प्राणीशास्त्र |
| प्रा. किरण वामनराव गायकवाड | सहा. प्राध्यापक | मराठी |

## * प्रशासकीय कर्मचारी *

| | |
|---|---|
| **श्री. आर. पी. पगारे** | मुख्य लिपीक |
| **श्रीमती एम. व्ही. बिडकर** | वरिष्ठ लिपीक |
| **श्री. एम. पी. जाधव** | कनिष्ठ लिपीक |
| **श्री. एस. सी. वाणी** | कनिष्ठ लिपीक (विनाअनुदानीत) |
| **श्री. पी. एस. मुठे** | कनिष्ठ लिपीक (विनाअनुदानीत) |
| **श्री. ए. बी. जाधव** | ग्रंथालय परिचर |
| **श्री. बी. व्ही. राऊत** | शिपाई |
| **श्री. ए. के. काटे** | शिपाई |
| **श्री. एम. व्ही. पाटील** | शिपाई |
| **श्री. एस. एस. नाकील** | शिपाई |
| **श्री. व्ही. बी. बागुल** | शिपाई / वॉचमन |
| **श्री. पी. एल. महाले** | प्रयोगशाळा सहाय्यक |
| **श्री. एस. आर. अहिरे** | प्रयोगशाळा सहाय्यक |

## * महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या (वर्ष २०२४-२५) *

| वर्ग | मुले | मुली | एकूण संख्या |
|---|---|---|---|
| प्रथम वर्ष कला | १५७ | ६९ | २२६ |
| द्वितीय वर्ष कला | ७७ | ६७ | १४४ |
| तृतीय वर्ष कला | ६३ | ३८ | १०१ |
| एम. ए. (I) | २१ | २० | ४१ |
| एम. ए. (II) | १७ | १६ | ३३ |
| प्रथम वर्ष विज्ञान | ५० | ५३ | १०३ |
| द्वितीय वर्ष विज्ञान | ४० | ४२ | ८२ |
| तृतीय वर्ष विज्ञान | २१ | २४ | ४५ |
| प्रथम वर्ष वाणिज्य | ३० | १७ | ४७ |
| द्वितीय वर्ष वाणिज्य | १५ | १६ | ३१ |
| तृतीय वर्ष वाणिज्य | १२ | १२ | २४ |
| | **५०३** | **३७४** | **८७७** |

## डॉ. बिडकर महाविद्यालयात रानभाज्यांचे प्रदर्शन



## दैनिक दिव्य मराठी



## दैनिक दिव्य मराठी

## सांस्कृतिक कार्यक्रमांतून संस्कृती व वारसाचे जतन



## रॅगिंगमध्ये सहभाग घेतल्यास दोन वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा



अभोणा । शैक्षणिक संस्थेच्या आत किंवा बाहेर रॅगिंगचा केल्यास दोन वर्षे सश्रम कारावास व दंड होतो. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील नियमांचे काटेकोरपणे पालन करून शिस्त राखणे गरजेचे आहे. अभ्यासात लक्ष घालून करिअरकडे लक्ष द्यावे, असे आवाहन सहाय्यक पोलिस निरीक्षक यशवंत शिंदे यांनी केले. डॉ. विजय बीडकर महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळातर्फे 'रॅगिंग प्रतिबंधक कायदा' या विषयावर शिंदे यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. परशराम वाघेरे होते. प्रास्ताविक प्रा. दिनेश हळदे यांनी केले. प्रा. किशोर पवार यांनी आभार मानले. डॉ. दिनकर नेरपगार उपस्थित होते.

## दैनिक आपलं राज्य

## व्यायाम, आनंदी व सकारात्मक विचार यातून आरोग्याची प्राप्ती : सुनील पावरा

डॉ. विजय बिडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त व्याख्यान



## दैनिक दिव्य मराठी

## डॉ. बीडकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या रॅलीतून जागृती



## दिव्य मराठी

## बीडकर महाविद्यालयात राबविले स्वभाव अन् संस्कार स्वच्छ अभियान, परिसर लख्ख



## दैनिक दिव्य मराठी

## अभोणा महाविद्यालयात वन संवर्धन विषयावर मार्गदर्शन



प्रतिनिधी | अभोणा

## दैनिक दिव्य मराठी



## बिडकर महाविद्यालयाचे चणकापूरला श्रमसंस्कार शिबिर



## लोकमत

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे दर्शन



## लोकमत

## अभोणा कला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे विविध क्रीडा स्पर्धेत यश

डांग सेवा मंडळ नाशिक संचलित

# डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे

## संस्थे मार्फत आदिवासी भागात चालवलेली कामे

१) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा उंबरठाण, ता. सुरगाणा
२) प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा आंबेगण, ता. दिंडोरी
३) प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा कुकुडणे, ता. सुरगाणा
४) प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा सुळे, ता. कळवण
५) प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा शिंदे (दि.), ता. सुरगाणा
६) प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा वारे, ता. दिंडोरी
७) प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा धांद्रीपाडा (यशवंत नगर), ता. सटाणा

## वसतिगृहे

१) जनता विद्यार्थी वसतिगृह मुल्हेर, ता. सटाणा
२) जनता विद्यार्थीनी वसतिगृह मुल्हेर, ता. सटाणा
३) जनता विद्यार्थी वसतिगृह अभोणा, ता. कळवण
४) जनता विद्यार्थीनी वसतिगृह अभोणा, ता. कळवण
५) जनता विद्यार्थी वसतिगृह पेठ, ता. पेठ
६) जनता विद्यार्थीनी वसतिगृह पेठ, ता. पेठ
७) दादासाहेब बिडकर विद्यार्थी वसतीगृह पेठ, ता. पेठ
८) जनता विद्यार्थी वसतिगृह ओतूर, ता. कळवण
९) जनता विद्यार्थी वसतिगृह बोरगांव, ता. सुरगाणा
१०) सर्वोदय विद्यार्थी वसतिगृह बाऱ्हे, ता. सुरगाणा
११) सर्वोदय विद्यार्थीनी वसतिगृह बाऱ्हे, ता. सुरगाणा

## माध्यमिक विद्यालये

१) डॉ. विजय बिडकर विद्यालय पेठ, ता. पेठ
२) जनता विद्यालय अभोणा, ता. कळवण
३) जनता विद्यालय मुल्हेर, ता. सटाणा
४) माध्यमिक विद्यालय ओतुर, ता. कळवण
५) माध्यमिक विद्यालय बाऱ्हे, ता. सुरगाणा

## महाविद्यालये

१) दादासाहेब बिडकर कला व वाणिज्य महाविद्यालय पेठ, ता. पेठ
२) डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणा, ता. कळवण
३) कला व वाणिज्य महाविद्यालय, उंबरठाण, ता. सुरगाणा
४) कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, मुल्हेर, ता. बागलाण

## इंग्लिश मिडीयम स्कूल

१) दादासाहेब बिडकर इंग्लिश मिडीयम स्कूल पेठ, ता. पेठ
२) शामलाताई बिडकर इंग्लिश मिडीयम, मुल्हेर
३) आयडीयल इंग्लिश मिडीयम स्कूल, अभोणा, ता. कळवण
४) न्यु इंग्लिश मिडीयम स्कूल, ओतूर, ता. कळवण
५) डॉ. विजय बिडकर इंग्लिश मिडीयम स्कूल, बाऱ्हे, ता. सुरगाणा

## कनिष्ठ महाविद्यालये

१) डॉ. विजय बिडकर कनिष्ठ महाविद्यालय व किमान कौशल्य विभाग पेठ, ता. पेठ
२) कनिष्ठ महाविद्यालय व किमान कौशल्य विभाग अभोणा, ता. कळवण
३) कनिष्ठ महाविद्यालय, मुल्हेर, ता. सटाणा
४) कनिष्ठ महाविद्यालय, ओतूर
५) कनिष्ठ महाविद्यालय, बाऱ्हे

## धान्य कोठार (ग्रेन बँक)

मुल्हेर, डांगसौंदाणे, ता. सटाणा

## सार्वजनिक वाचनालय

डॉ. विजय बिडकर सार्वजनिक वाचनालय
चणकापूर, ता. कळवण

## डॉ. विजय बिडकर खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था

अभोणा, ता. कळवण, जि. नाशिक

डांग सेवा मंडळ नाशिक संचलित

## डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे, ता. कळवण, जि. नाशिक



'साडी डे' मध्ये सहभागी विद्यार्थिनी



'एक पेड माँ के नाम' उपक्रमात वृक्षरोप वाटप




वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित 'ग्रंथ प्रदर्शन'



शैक्षणिक सहल




मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन मार्गदर्शन करतांना डॉ. तुकाराम भवर




वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात पारितोषिक देतांना मा. हेमलताताई बिडकर

डांग सेवा मंडळ नाशिक संचलित

# डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे, ता. कळवण, जि. नाशिक



'रानभाजी' प्रदर्शन




राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. परशराम वाघेरे



वार्षिक स्नेहसंमेलन सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य सादर करतांना विद्यार्थिनी




राष्ट्रीय सेवा योजना आयोजित आरोग्य तपासणी शिबीर



राष्ट्रीय सेवा योजना स्वच्छता अभियानात सहभागी स्वयंसेवक



वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित रांगोळी स्पर्धा

डांग सेवा मंडळ नाशिक संचलित

**डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अभोणे, ता. कळवण, जि. नाशिक**



क्रीडा विभाग आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना डॉ. अरूण शिंदे



'हर घर तिरंगा' उपक्रमात सहभागी विद्यार्थी




स्पर्धा परीक्षा 'करिअर संधी' विषयावर मार्गदर्शन करतांना मा. अविनाश शिरसाठ




अँटी रॅगिंग उपक्रमात मार्गदर्शन करतांना पोलीस निरीक्षक मा. यशवंत शिंदे




बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेत मार्गदर्शन करतांना प्रा. गिरीश पाटील



'निर्भय कन्या' अभियान कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना प्रा. हेमा मांडे




सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल सावित्रीबाइ फुले पुणे विद्यापीठातर्फे संस्थेच्या अध्यक्षा हेमलताताई बिडकर यांना जीवन साधना पुरस्काराने गौरविण्यात आले.



Super 9960609242